नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर - ४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २३० * * नागपूर * | बुधवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

अग्राग्रलेख
खरीखरी..

## कागदावर निवडणूक

आपल्या देशात जवळजवळ वीस वर्षापासून कागदावरचे म्हणजे मतपत्रिकेवरचे मतदान बंद झाले. सध्या ज्या मतदानाच्या इलेक्ट्रॉनिक वेंडिंग म्हणजेच ईव्हीएम मशीन आहेत. त्यात फेरफार होतो असा विरोधकांचा दावा आहे. खरे खोटे कुणालाच सांगता येत नाही. ही यातली खरी गोम आहे. जगातील बहुतेक पुढारलेल्या देशात कागदाच्या मतपत्रिकेवरच मतदान घेण्यात येते. भारतामध्ये सरकार म्हणते ईव्हीएम मशीन मध्ये गडबडीचा प्रश्नच नाही. विरोधक म्हणतात, या ईव्हीएम मध्ये गडबडच गडबड आहे. हारले म्हणजे गडबड आणि जिंकले म्हणजे विजयाची बडबड असे सत्ताधारी म्हणतात. त्याला प्रत्युत्तर म्हणून विरोधक सर्वोच्च न्यायालयात गेले होते. सर्वोच्च न्यायालयाने हे मागणी चुटकीसरशी फेटाळून लावली. विरोधकांच्या म्हणण्यात तथ्य नाही असे नाही. आजच्या घडीला भारतासारख्या देशात कागदावरचे मतदान घेणे शक्य आहे काय, याचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. पडलेली मते आणि मोजण्यात न आलेली मते यांच्या तफावत आहे. हे अनेकदा दिसून आले आहे. आज याविषयी कोणताही पक्ष मग तो सत्ताधारी असो की विरोधी असो, उघडपणे बोलायला तयार नाही. आजच सुप्रीम कोर्टाने स्पष्टपणे याचिकाकर्त्याला जराही भाव दिला नाही?. सर्वोच्च न्यायालयातील काही वकील अत्यंत आक्रमक आहेत. निवडणूक आयोग काही ऐकून घ्यायला तयार नाही. आता महाराष्ट्राचे बडे नेते शरद पवार साहेब आणि इतर विरोधक वकिलांची मोठी फौज उभी करणार आहेत. त्यासाठी जन आंदोलनही उभारण्यात येणार आहे, अशी बातमी आहे. यामधून आपल्या देशातील जनतेला या ईव्हीएम मशीनचे तोटे आणि बनवेगिरी समजावून सांगणार आहेत. महाराष्ट्राच्या निवडणुकीचे जे काही निकाल लागले. त्यामुळे विरोधी पक्ष जवळजवळ निकालात निघालेले आहेत. काँग्रेस सारखा देशव्यापी पक्षही विधानसभेच्या 288 जागापैकी 29 जागाही जिंकू शकत नाही. याचा अर्थ काय घ्यावा. विरोधी पक्ष नेतेपद मिळवण्यासाठी सभागृहातील एकूण सदस्यांच्या 10% आमदार किंवा खासदार आले पाहिजेत. असा नियम आहे. 2014 व 2019 सालामध्ये काँग्रेसला दहा टक्के खासदार निवडून आणता आले नव्हते. त्यामुळे संसदेमध्ये काँग्रेसला विरोधी पक्षनेते पद मिळाले नव्हते. आता शंभर खासदार निवडून आल्याने आपोआपच लोकसभेत काँग्रेस हा विरोधी पक्ष बनला आहे. पण नुकत्याच झालेल्या विधान सभेच्या निवडणुकीत काँग्रेसला किंवा इतर पक्षांपैकी कोणालाही दहा टक्के आमदार निवडून आणता आलेले नाहीत. ही वस्तुस्थिती आहे. आता निकाल लागले आणि कितीही आरडाओरड केली तरी त्याचा फायदा होईल, असे वाटत नाही. पुढील पाच वर्षे आपल्याला आजच्याच परिस्थितीत राजकारण करावे लागणार आहे. कुणी कितीही बोंबा मारल्या, तरी 'बैल गेल्यावर झोपा' करून काय फायदा? एकूणच हा गंभीर विषय आता आणि सरकार पक्ष किंवा विरोधी पक्ष दोघांसाठी महाकठीण आहे. आगे आगे देखेंगे, होता है क्या?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### भाजप निरीक्षक पाठवणार : आमदारांचे मत घेऊन नाव जाहीर करणार

# मुख्यमंत्र्यांची घोषणा अधांतरी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या निकालाला तीन दिवस उलटूनही मुख्यमंत्र्यांच्या नावावर निर्णय होऊ शकला नाही. त्यासाठी भाजप निरीक्षक पाठवणार असून, ते आमदारांचे मत जाणून घेऊन मुख्यमंत्र्यांच्या नावाची घोषणा करतील.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांची भेट घेऊन त्यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारही उपस्थित होते. विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरपर्यंत होता. नव्या मुख्यमंत्र्यांच्या शपथविधीची तारीख अद्याप ठरलेली नाही. तोपर्यंत शिंदे हेच हंगामी मुख्यमंत्री राहतील.

एकनाथ शिंदे यांच्या राजीनाम्यानंतर मुंबईत भाजप आमदारांची बैठक बोलावण्यात आली आहे. त्यात फडणवीस यांची नेतेपदी निवड होणार आहे. यानंतर शिंदे, फडणवीस आणि अजित पवार सह्याद्री अतिथीगृहावर पत्रकार परिषद घेऊ शकतात.

काही मीडिया रिपोर्टनुसार, नवीन मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांचे नाव जवळपास निश्चित झाले आहे. फडणवीस मुख्यमंत्री झाल्यास पूर्वीप्रमाणेच नव्या सरकारमध्येही दोन उपमुख्यमंत्री असतील.

नव्या सरकारचा अजेंडा ठरवण्यासाठी तिन्ही पक्षांची एक समिती स्थापन केली जाऊ शकते, ज्याचे प्रमुख एकनाथ शिंदे असू शकतात. मात्र, शिवसेनेचे प्रवक्ते कृष्णा हेगडे यांनी याचा इन्कार केला.



**मुख्यमंत्री शिंदे यांचा राजीनामा**

महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ आज संपला. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजभवनावर जात आपल्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर ते काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून काम पाहतील. नव्या सरकारचा शपथविधी होई पर्यंत ते काळजीवाहू मुख्यमंत्री पदावर राहतील.

### शपथविधी डिसेंबरमध्ये... दानवेंचे भाकित

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
महायुतीच्या मुख्यमंत्री पदासाठी ३० नोव्हेंबरपर्यंत नाव निश्चित होईल आणि त्यानंतर डिसेंबरमध्ये शपथविधी होईल, असे भाकित भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी केले आहे. मुख्यमंत्री ठरवण्याची जबाबदारी एकट्याची नाही. यावर तिनही पक्षांचे नेते चर्चा करतील, एकनाथ शिंदे महायुतीत नाराज नाहीत, असेही दानवे म्हणाले.

मुख्यमंत्रीपद आणि शपथविधीचे घोडे कुठेही अडलेले नाही. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र निवडणूक लढले आहेत. लवकरच भाजपचा गटनेता निवडला जाईल. यानंतर तीनही पक्षांचे नेते एकत्र बसून पक्षश्रेष्ठींकडे आमदारांचे म्हणणे मांडतील , ते देतील तो निर्णय मान्य असेल, असे दानवे यांनी स्पष्ट केले.

### फडणवीसांच्या नावावर दिल्लीश्वरांचे शिक्कामोर्तब

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :
भाजपच्या दिल्लीतील नेतृत्वाने महाराष्ट्राचे नवे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब केल्याची माहिती आहे. तत्पूर्वी, बरीच चर्चा व वाटाघाटी केल्याचे समजते.



विधानसभा निवडणुकीत भाजपला सर्वाधिक १३२ जागा मिळाल्या. त्यामुळे भाजपच्या नेत्यांनी मुख्यमंत्रीपदासाठी फडणवीस यांच्या नावाचा आग्रह धरला. त्यानुसार, महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय दिल्लीत झाल्याची माहिती आहे.

### महाविकास आघाडीचे आता 'मिशन ईव्हीएम'



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २६ :
नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांचा दारुण पराभव झाला आहे. मात्र आता महाविकास आघाडीच्या वतीने यासाठी ईव्हीएम मशीनला दोष देण्यात येत आहे.

ईव्हीएम मशीन मध्ये गडबड करून भारतीय जनता पक्षाने हा विजय मिळवला असल्याचा दावा काही नेते करत आहेत. त्यातच आता शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि उद्धव ठाकरे यांची शिवसेना देखील ईव्हीएम विरोधात मिशन उघडण्याच्या तयारीत आहेत.

शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आज राज्यभरातील पराभूत उमेदवारांची बैठक बोलवण्यात आली होती. या बैठकीमध्ये सर्व उमेदवारांना महत्त्वाच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामध्ये ईव्हीएम संदर्भातील माहिती गोळा करण्याचे आदेश देण्यात आले असून त्यासाठी वकिलाची एक फौज उभी करण्याची सूचना देखील करण्यात आली आहे. या माध्यमातून कायदेशीर लढाई देखील लढली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

दुसरीकडे उद्धव ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने देखील राज्यभरातील पराभूत उमेदवारांची एक बैठक बोलण्यात आली होती. ईव्हीएम मशीनच्या आकडेवारी बद्दल आपापल्या मतदारसंघातून अपडेट माहिती गोळा करण्याचे आदेश पराभूत उमेदवारांना देण्यात आले आहे. आगामी काळात ईव्हीएम मशीन विरोधात आघाडीच्या वतीने जन आंदोलन उभे करण्यात येणार आहे. त्या पार्श्वभूमीवर ही माहिती महत्त्वाची असल्याचे मानले जात आहे.






### निवडणूक बॅलेट पेपरद्वारे घ्या... कोर्टाकडे मागणी

## न्यायालयाने फेटाळली याचिका

■ वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. २६ :
निवडणुकीत बॅलेट पेपर मतदान प्रणाली पुन्हा सुरू करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळली.

याचिकाकर्ते केए पॉल म्हणाले, चंद्राबाबू नायडू आणि वायएस जगनमोहन रेड्डी यांसारख्या नेत्यांनीही इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनशी छेडछाड करण्यावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यावर न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती पीबी वराळे यांच्या खंडपीठाने म्हटले की, 'जेव्हा चंद्राबाबू नायडू किंवा जगनमोहन रेड्डी निवडणुका हरतात, तेव्हा ते म्हणतात की ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाते आणि जिंकल्यावर ते काहीही बोलत नाहीत.' ते आम्ही कसे पाहू शकतो, असे खंडपीठाने सांगितले. आम्ही ते नाकारत आहोत. हे सर्व वादविवाद करण्याचे ठिकाण नाही.

खंडपीठाने केए पॉल यांना विचारले की, तुम्ही या राजकीय क्षेत्रात का येत आहात? तुमचे कार्यक्षेत्र खूप वेगळे आहे. पॉल एका संस्थेचे अध्यक्ष आहेत, ज्यांनी 3 लाखांहून अधिक अनाथ आणि 40 लाख विधवांची सुटका केली आहे, हे येथे उल्लेखनीय.

**अमेरिकेतही बॅलेट पेपरद्वारे मतदान**

पॉल म्हणाले की, ईव्हीएममध्ये छेडछाड केली जाऊ शकते. अमेरिकेसारख्या देशातही मतदान बॅलेट पेपरद्वारेच होते. आपण त्याचे पालन केले पाहिजे. ईव्हीएम लोकशाहीला धोका आहे. एलन मस्क यांनीही ईव्हीएमशी छेडछाड झाल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे.

याचिकाकर्ते केए पॉल यांनीही खंडपीठाकडून निवडणूक आयोगाला निर्देश देण्याची मागणी केली. ते म्हणाले की, असे उमेदवार निवडणुकीदरम्यान मतदारांना पैसे, दारू आणि इतर गोष्टींचे आमिष दाखवून दोषी आढळल्यास त्यांना किमान पाच वर्षांसाठी अपात्र ठरवावे.

16 ऑक्टोबर रोजी काँग्रेसच्या वतीने प्रिया मिश्रा आणि विकास बन्सल यांनी हरियाणा विधानसभा निवडणुकीदरम्यान 20 जागांवर मतदान-मोजणीत अनियमितता झाल्याचा आरोप करत सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.

निवडणूक आयोगाने हरियाणात ईव्हीएमचा वापर करून निवडणुका घेतल्याचे याचिकेत म्हटले आहे. त्याच आधारे निकालही जाहीर झाले. परंतु, काही एव्हट 99 टक्के बॅटरी क्षमतेवर काम करत होते, तर काही 60-70 आणि 80 टक्क्यांपेक्षा कमी बॅटरी क्षमतेवर काम करत होते. मतमोजणीच्या दिवशीही काही ईव्हीएममध्ये 99 टक्के बॅटरी होती.

17 ऑक्टोबर रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला फटकारले होते. अशी याचिका दाखल केल्यास तुम्हाला दंडही ठोठावला जाऊ शकतो, असे न्यायालयाने म्हटले होते. तुम्ही कागदपत्रे द्या, आम्ही बघू.

तत्कालीन सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती मनोज मिश्रा आणि न्यायमूर्ती जे. बी. याचिका फेटाळताना पार्डीवाला यांच्या खंडपीठाने विचारले होते की, आम्ही नव्याने निवडून आलेल्या सरकारचा शपथविधी थांबवावा असे तुम्हाला वाटते का?

दरम्यान, पाल यांची याचिका सुद्धा सर्वोच्च न्यायालयाने आज फेटाळून लावली आहे.

### मालगाडीचे २३ डबे घसरले

**६ ट्रेन रद्द ९ डायव्हर्ट**

■ वृत्तसंस्था, रायपूर, दि. २६ :
छत्तीसगडमधील गौरेला-पेंड्रा-मारवाही जिल्ह्यात मंगळवारी कोळशाने भरलेली मालगाडी रुळावरून घसरली. इंजिनसह 23 डबे रुळावरून घसरले आणि उलटले. मालगाडी बिलासपूरच्या दिशेने जात असताना भंवरटंक रेल्वे स्थानकाजवळ अपघात झाला.

अपघाताची माहिती मिळताच रेल्वे कर्मचारी आणि अधिकारी घटनास्थळी पोहोचले. मदतकार्य सुरू झाले आहे. मालगाडीचे डबे उलटल्याने रुळावर कोळशाचा ढीग साचला असून, त्यामुळे या मार्गावरून जाणाऱ्या ६ गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. मार्ग 9 वळवण्यात आल्या आहे.

या अपघातात अप आणि डाऊन दोन्ही मार्गांचे पूर्ण नुकसान झाले आहे. मार्गावरील वाहतूक पूर्ववत होण्यासाठी 2 दिवसांपेक्षा जास्त वेळ लागू शकतो. या अपघातात ओएचईच्या तारा आणि सिग्नल खांबांचेही नुकसान झाले. या अपघातात कोट्यवधी रुपयांचे नुकसान होण्याची भीती रेल्वेला आहे.

### लॉरेन्सने घडवून आणले चंदीगडचे स्फोट

■ वृत्तसंस्था, चंदीगड, दि. २६ :
3 डिसेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या चंदीगड दौ?्यापूर्वी मंगळवारी सकाळी सेक्टर-26 मधील दोन क्लबबाहेर स्फोट झाले. लॉरेन्स गँगने या स्फोटांची जबाबदारी स्वीकारली आहे. याबाबत गोल्डी ब्रारने सोशल मीडियावर पोस्ट टाकली आहे. प्रोटेक्शन मनी न देणे हे स्फोटाचे कारण असल्याचे त्यांनी सांगितले.

सेव्हिल बार अँड लाउंज आणि डीओरा क्लबच्या बाहेर झालेल्या स्फोटामुळे क्लबच्या बाहेरील काचा फुटल्या. मीडिया रिपोर्ट्सनुसार, प्रसिद्ध रॅपर बादशाह देखील सेव्हिल बार आणि लाउंज क्लबच्या मालकांमध्ये भागीदार आहे.




## मराठा आरक्षण फॅक्टर 'विधानसभे'त फेल

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :
मराठा आरक्षणाचे गढ ठरलेल्या मराठवाड्यातच जनतेच्या दरबारी मराठा आरक्षण फॅक्टर फेल झाल्याचे समोर आले आहे.

विभागात महायुतीचे सर्वाधिक 26 मराठा आमदार विजयी झालेत. तर महाविकास आघाडीचे केवळ 3 मराठा आमदार निवडून आलेत. त्यामुळे मनोज जरांगे यांच्या आरक्षण मागणीला त्यांच्या भागातच मतदारांनी सपेशल नाकारत आपला कौल महायुती आणि त्यातही भाजपच्या बाजूने दिल्याचे दिसते.

**मराठवाड्यात महायुतीचे २६ मराठा आमदार विजयी**



मराठवाड्यात एकूण 46 मतदार संघ आहेत. त्यात सर्वाधिक 29 मराठा आमदार विजयी झालेत. तर ओबीसी 9, एससी 5, अल्पसंख्याक 2, तर एका जागेवर आदिवासी समाजाचा उमेदवार विजयी झालाय.

मराठा आरक्षणाच्या सर्व मागण्या मान्य झाल्या म्हणत आंदोलन थांबवणाऱ्या आणि त्यानंतर पुन्हा सरकारविरोधात वारंवार आंदोलन करणाऱ्या मनोज जरांगे यांनी बीड शहर, केज, परतूर, फुलंब्री, हिंगोली शहर, पाथरी, हदगाव या 7 मतदारसंघामध्ये उमेदवार उभे करण्याचा निर्धार केला होता. तर भोकरदन, गंगापूर, कळमनुरी, गंगाखेड, जिंतूर, औसा या 6 मतदारसंघांमध्ये उमेदवार पाडापाडी मोहीम राबवण्याचा इशारा दिला होता.

मात्र, जरांगे आणि त्यांची मराठा आरक्षणाची मागणी या दोन्हींची जादू विधानसभा निवडणुकीत तरी चालली नाही.

# ठाणे जिल्ह्यात मनसेला उतरती कळा

ठाणे, दि. २६ : प्रतिनिधी



ठाणे जिल्ह्यातील विधानसभेच्या एकूण १८ पैकी १२ जागांवर निवडणूक लढलेल्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला एकाही जागेवर विजय मिळवता आलेला नाही. कल्याण ग्रामीणचे माजी आमदार प्रमोद पाटील आणि ठाणे शहरातील उमेदवार अविनाश जाधव हे विजयी होतील, हा मनसे नेत्यांचा दावा फोल ठरला असून या दोन्ही ठिकाणी मनसेचा पराभव झाला आहे. १२ पैकी ५ उमेदवारांना १० हजारांच्या आत तर, ४ उमेदवारांना २० हजारांच्या आत मते मिळाल्याने अनेक उमेदवारांची अनामत रक्कमही जप्त झाली आहे. या निवडणूक निकालानंतर ठाणे जिल्ह्यात मनसेला उतरती कळा लागल्याची चर्चा रंगली आहे.

ठाणे जिल्ह्यात एकूण १८ विधानसभा मतदार संघ आहे. त्यापैकी १२ मतदार संघात मनसेने उमेदवार उभे केले होते. ठाणे जिल्ह्यातील ठाणे आणि भिवंडी महापालिकांमध्ये यापूर्वी मनसेचे नगरसेवक होते, मात्र गेल्या काही महापालिका निवडणुकीमध्ये मनसेचे पीछेहाट झाली. असे असले तरी पाच वर्षांपूर्वी झालेल्या म्हणजेच २०१९ मध्ये विधानसभा निवडणुकीत कल्याण ग्रामीण मतदार संघातून मनसेचे माजी आमदार प्रमोद पाटील हे निवडून आले होते. तर, ठाणे शहरातील उमेदवार अविनाश जाधव यांचा १९ हजार मतांनी पराभव झाला होता. त्यांना दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. यामुळेच, यंदाच्या निवडणूकीत कल्याण ग्रामीणमधून प्रमोद पाटील हे विजयी होतील आणि त्याचबरोबर अविनाश जाधव हे सुद्धा विजयी होतील, असे दावे मनसे नेत्यांकडून करण्यात येत होते.

राज्यातील ज्या जागांवर उमेदवारांचा विजय होऊ शकतो, अशा ठिकाणी सभा घेणार असल्याचे सांगत मनसे प्रमूख राज ठाकरे यांनी कल्याण ग्रामीण आणि ठाणे शहर मतदार संघात प्रत्येकी दोन जाहीर सभा घेतल्या होत्या. ठाण्यात शर्मिला ठाकरे यांनी चौक सभा घेतल्या होत्या. एकूणच प्रचारातील वातावरण निर्मितीमुळे मनसेची प्रचारात हवा दिसून येत होती. प्रत्यक्ष निकालात दोन्ही जागांवर मनसेचा पराभव झाला आहे. तर उर्वरित १० जागांवर मनसेचा दारुण पराभव झाला असून अनेक उमेदवारांची अनामत रक्कम जप्त झाली आहे. जिल्ह्यात मनसेला एकही जागा मिळू शकलेली नसून या निवडणूक निकालानंतर जिल्ह्यात मनसेला उतरती कळा लागल्याची चर्चा रंगली आहे.

मनसेचे कल्याण ग्रामीणमधील उमेदवार प्रमोद (राजू) पाटील यांना ७४ हजार ७६८ मते, तर ठाणे शहरमधील उमेदवार अविनाश जाधव यांना ४२ हजार ५९२ मते मिळाली. कल्याण पश्चिममधील उमेदवार उल्हास भोईर यांना २२ हजार ११४ मते मिळाली. भिवंडी ग्रामीणमधील उमेदवार वनिता कथोरे यांना १३ हजार ८१६ मते, ओवळा माजीवडामधील उमदेवार संदीप पाचंगे यांना १३ हजार ५५२ मते, कळवा मुंब्रामधील उमेदवार सुशांत सूर्यराव यांना १३ हजार ९१४ मते, बेलापूरमधील उमेदवार गजानन काळे यांना १७ हजार ७०४ मते मिळाली. या चार उमेदवारांना २० हजारांचा पल्लाही गाठता आलेला नाही. शहापूरमधील उमेदवार हरिश्चंद्र खांडवी यांना ५ हजार ६४८ मते, भिवंडी पूर्वमधील उमेदवार मनोज गुळवी यांना १ हजार ३ मते, मुरबाडमधील उमदेवार संगीता चेंदवणकर यांना ७ हजार८९४ मते, मीरा-भाईंदरमधील उमेदवार संदीप राणे यांना ५ हजार २४३ मते, ऐरोलीमधील उमेदवार निलेश बाणखेले यांना ६ हजार ९०८ मते मिळाली. या पाच उमेदवारांना १० हजारांचा पल्लाही गाठता आलेला नाही.

# महायुती तुटणार, प्रत्येक पक्ष आता स्वतंत्र लढणार ?

## सहा महिन्यांत निवडणुकांची शक्यता

पुणे, दि. २६ : प्रतिनिधी

विधानसभेच्या निवडणुकांमध्ये भाजप, शिवसेना (शिंदे), राष्ट्रवादी (अजित पवार ) यांच्या महायुतीला अभूतपूर्व यश मिळाले. राज्यात महायुतीच्या २८८ पैकी २३५ जागा विजयी झाल्या आहेत. तर पुणे शहर आणि जिल्ह्याचा विचार करता महायुतीला २१ पैकी १८ जागा जिंकता आल्या आहेत. जनतेने महायुतीला कौल दिल्याने गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पुढील सहा महिन्यांच्या आत होण्याची शक्यता आहे.

राज्यातील महापालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या आहेत. काही निवडणुका या तीन वर्षांपासून तर काही निवडणुका दोन ते अडीच वर्षांपासून रखडलेल्या आहेत. इतर मागासवर्ग समाजाचे (ओबीसी) आरक्षण आणि प्रभागरचना याबाबत न्यायालयात दाखल झालेल्या याचिकांमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती मिळालेली आहे. त्यातच गेल्या अडीच वर्षांपूर्वी राज्यात ज्या पद्धतीने सरकार स्थापन झाले, ते पाहता या निवडणुका यापूर्वी घेण्याचा प्रयत्न केला असता, तर त्याचा मोठा फटका राज्यात सत्ताधारी असलेल्या महायुतीला बसला असता, अशी भीती राज्यकर्त्यांच्या मनात असल्याने या निवडणुका लांबत गेल्या आहेत.

विधानसभा निवडणुकीमध्ये राज्यातील जनतेने जो विश्वास महायुतीवर दाखवून त्यांना विजयी केले आहे. हे पाहता सध्याचे वातावरण महायुतीसाठी पोषक असल्याचे स्पष्ट झाले आहे. याचा फायदा घेत रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका तातडीने घेण्याचा प्रयत्न महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांचा असणार आहे. या माहितीला महायुतीमधील वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी दुजोरा दिला. पुढील सहा महिन्यांत या निवडणुका होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

राज्यातील विधानसभा निवडणुकीच्या निकालावर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे भवितव्य ठरणार होते. निवडणुकीत महायुती अथवा महाविकास आघाडीला कसे यश मिळते, यावर या निवडणुका पुढील वर्षात होणार का? हे देखील ठरणार होते. या निवडणुकीत महायुतीला मिळालेले यश पाहता गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुका तातडीने घेण्याचा प्रयत्न महायुतीकडून केला जाणार आहे.

राज्यातील अनेक महापालिकांच्या प्रभागरचना तसेच जिल्हा परिषद, पंचायती समिती यांच्या गट आणि गणरचना निश्चित झालेल्या आहेत. त्यामुळे आता त्यावर पुढची निवडणुकीची प्रक्रिया सुरू करावी लागणार आहे. यासाठी न्यायालयात आवश्यक ती भूमिका मांडून या निवडणुकांवरील स्थगिती उठवावी लागणार आहे. राज्यात आणि केंद्रात महायुतीचे सरकार असल्याने ही स्थगितीदेखील आता लवकरच उठविली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**पुण्यात होणार नव्याने प्रभाग रचना**

पुणे महापालिकेत प्रभागरचना यापूर्वी निश्चित करण्यात आली आहे. मात्र, राज्य सरकारने फुरसुंगी आणि उरुळी देवाची ही दोन गावे महापालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपरिषद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता पुणे महापालिकेला पुन्हा नव्याने प्रभागरचना करावी लागणार असल्याचे स्पष्ट आहे.

**महायुतीत निवडणूक होणार, की स्वतंत्र लढणार?**

महायुतीच्या सरकारला विधानसभेच्या निवडणुकीत यश मिळाले आहे. त्यामुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत या तीनही पक्षांकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छुकांची मोठी संख्या असणार आहे. महायुतीमध्ये निवडणूक लढवायची झाल्यास अनेक प्रभागांमध्ये इच्छुक उमेदवारांची संख्या अधिक असल्याने बंडखोरीला तोंड द्यावे लागणार आहे. या निवडणुकीत भाजपला मिळालेले मताधिक्य आणि विजयी उमेदवारांची संख्या लक्षात घेता महापालिकेच्या निवडणुकीत महायुती नक्की टिकणार का? महायुतीतील प्रत्येक पक्ष स्वतंत्र निवडणूक लढणार, असा प्रश्न देखील उपस्थित केला जात आहे.

# ‘औषधनिर्माणशास्त्र’ ची रखडलेली प्रवेश प्रक्रिया सत्ता स्थापनेनंतर

पुणे, दि. २६ : प्रतिनिधी

राज्यातील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांची मान्यता, प्रवेश क्षमतेतील वाढीसंदर्भात राज्य शासनाची मान्यता विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे प्रलंबित आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया लांबणीवर पडली असून, आता नवे सरकार अस्तित्वात आल्यावरच शासन निर्णयांची प्रक्रिया होऊ शकणार आहे. मात्र, यात प्रवेश प्रक्रियेला विलंब होऊन विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू होण्यास फटका बसल्याचे स्पष्ट होत आहे.

राज्यात समाइक प्रवेश परीक्षातर्फे (सीईटी सेल) औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. त्यानुसार सीईटी सेलने ही प्रवेश प्रक्रिया सुरू केली होती. दोन फेऱ्यांमध्ये पदविका आणि पदवी अभ्यासक्रमाच्या सुमारे ६० टक्के जागांवर प्रवेश देण्यात आले. फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाने (पीसीआय) नवीन फार्मसी महाविद्यालयांना परवानगी दिली. तसेच, काही महाविद्यालयांची प्रवेश क्षमता वाढवण्यात आली. मात्र, विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू लागल्याने या संदर्भातील शासन निर्णय प्रसिद्ध झालेला नाही. त्यामुळे पुढील प्रवेश प्रक्रिया ठप्प झाली. आता नवे सरकार अस्तित्त्वात आल्यानंतर शासन निर्णय प्रसिद्ध केल्यावर प्रवेश प्रक्रिया सुरू होईल. मात्र, उर्वरित प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यास किमान दोन महिन्यांचा कालावधी लागणार आहे. त्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांचे पहिले सत्र पूर्ण करून परीक्षा घेण्यास आणखी विलंब होणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक प्रा. रामदास झोळ म्हणाले, की औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या दोन फेऱ्या झाल्या. त्यातून सुमारे ५० ते ६० टक्के जागा भरण्यात आल्या. आता तिसऱ्या फेरीनंतर रिक्त जागांवर संस्थास्तरावर प्रवेश दिले जातील. वास्तविक या अभ्यासक्रमाच्या जागा रिक्त राहात असल्याने प्रवेश प्रक्रिया थांबवण्यापेक्षा असलेल्या जागांवर प्रवेश देऊन प्रक्रिया सुरू ठेवणे गरजेचे होते. यात विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे. दरम्यान, शासनाच्या निर्देशानुसार पुढील प्रक्रिया राबवण्यात येणार असल्याचे सीईटी सेलकडून स्पष्ट करण्यात आले.

# चंद्रकांतदादांनी विरोध करूनही त्यांच्याच मतदारसंघात दिलजीत दोसांझचा कार्यक्रम

पुणे, दि. २६ : प्रतिनिधी

कोथरूड येथील काकडे फार्म परिसरात रविवारी दिलजीत दोसांझ यांचा म्युझिक कॉन्सर्ट कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम रद्द करण्याच्या सूचना राज्याचे मंत्री आणि कोथरूडचे आमदार चंद्रकांतदादा पाटील यांनी पोलीस आयुक्त आणि उत्पादन शुल्क विभागाला दिल्या होत्या. मात्र पाटील यांच्या सूचना असतानाही कोथरूड मध्ये हा कार्यक्रम ' निर्विघ्न ' पार पडल्याचे समोर आले आहे.

कोथरूड येथील काकडे फार्म परिसरात दिलजीत दोसांझ यांचा म्युझिक कॉन्सर्ट कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला जवळपास ५० हजाराहून अधिक नागरिक येण्याची शक्यता होती. तसेच दिलजीत दोसांझ यांच्या आजवरच्या कार्यक्रमाची एकूणच पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर स्थानिक नागरिकांनी या कार्यक्रमाला विरोध दर्शवला होता. हा कार्यक्रम घेण्यात येऊ नये यासाठी मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यासह विविध राजकीय पक्षाच्या मंडळींनी आणि सामाजिक संघटनांनी या कार्यक्रमाला कडाडून विरोध केला होता. हा कार्यक्रम होऊ नये यासाठी प्रसंगी आंदोलन करण्याचा इशाराही दिला होता.

दिलजीत दोसांझ यांचा म्युझिक कॉन्सर्टला कोथरूडचे भाजपचे जेष्ठ नेते आमदार मंत्री चंद्रकांत पाटील यांनी देखील विरोध केला होता. हा कार्यक्रम रद्द करण्याच्या सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या होत्या. आमदार पाटील यांनी यामध्ये लक्ष घालून ठोस भूमिका घेतल्याने हा कार्यक्रम रद्द होईल अशी चर्चा होते. मात्र हा कार्यक्रम झाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आमदार पाटील यांनी आवश्यक त्या सूचना दिल्यानंतरही हा कार्यक्रम झाल्याने यामागे कोणती 'शक्ती ' आहे, असा प्रश्न सर्वसामान्य कोथरूडकर नागरिकांना पडला आहे. या कार्यक्रमाच्या आयोजनामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊन नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागल्याची तक्रारी नागरिकांकडून केली जात आहे.

दिलजीत दोसांझ यांच्या म्युझिक कॉन्सर्ट चा कार्यक्रम कोथरूडमध्ये झाला तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोठा मोर्चा काढण्यात येईल आणि या मोर्चाचे नेतृत्व मी स्वतः करेन अशी भूमिका आमदार चंद्रकांत पाटील यांनी घेतली होती. चंद्रकांत दादांचा सूचना असताना हा कार्यक्रम कोथरूड मध्ये झाल्याने यामध्ये नक्की काय घडले असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. चंद्रकांत पाटील यांच्या सूचना असताना पोलीस प्रशासनाने हा कार्यक्रम रद्द का नाही केला? अशी विचारणा येथील नागरिकांकडून केली जात आहे.

**काय म्हणाले होते चंद्रकांत दादा?**

या कार्यक्रमाबाबत आमदार चंद्रकांत पाटील यांनी एका निवेदनाद्वारे भूमिका मांडत म्हणाले की, पुण्यात कोथरूडमधील काकडे फार्म येथे होणाऱ्या दिलजीत दोसांझ च्या म्युझिक कॉन्सर्टला माझा स्थानिक आमदार म्हणून तसेच एक नागरिक म्हणून पण माझा विरोध आहे. फक्त दारू विक्रीसाठी विरोध नाही, तर या कार्यक्रमामुळे ट्रॅफिक जाम आणि कर्कश आवाजाला सुद्धा माझा विरोध आहे. त्यामुळे हा कार्यक्रम रद्द करण्यात यावा,अशा सुचना मी पोलीस आयुक्त, उत्पादन शुल्क विभाग आणि जिल्हाधिकारी यांना दिल्या आहेत. तसेच असे कार्यक्रम समाजाला लागलेली किड आहे. त्यामुळे कोथरूडमध्ये हा कार्यक्रम झाला तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोठा मोर्चा काढण्यात येईल आणि या मोर्चाचे नेतृत्व मी स्वतः करेन,असे देखील या निवेदनात म्हटले होते.

दरम्यान दिलजीत दोसांज 'कॉन्सर्ट' या कार्यक्रमाचा मद्य सेवन परवाना रद्द करण्यात आला. राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाचे चरणसिंह राजपूत यांनी याबाबत स्पष्टीकरण दिले.

# 50 खोके एकदम ओके...राज्यात गाजलेली घोषणा पहिल्यांदा देणारा आमदारही निवडणुकीत पराभूत

जालना, दि. २६ : प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर शिवसेनेत फूट पडली आणि पक्षाच्या ५६ पैकी ४० आमदारांनी शिंदे यांची साथ देणे पसंत केले. उद्धव ठाकरेंपासून दूर होण्यासाठी या आमदारांना प्रत्येकी ५० कोटी रुपये देण्यात आल्याचा आरोप महाविकास आघाडीतील विविध नेत्यांकडून करण्यात आला होता. त्यातच काँग्रेसचे तत्कालीन आमदार कैलास गोरंट्याल यांनी शिंदेसोबत गेलेल्या आमदारांना डिवचण्यासाठी "५० खोके...एकदम ओके" अशी घोषणा माध्यमांसमोर दिली. नंतरच्या काळात राज्यभरात ही घोषणा बऱ्याच काळ चर्चेत होती. मात्र विधानसभा निवडणूक येईपर्यंत हा विषय मागे पडला आणि सरकारच्या लाडकी बहीण योजनेनं महाविकास आघाडीच्या सर्वच मुद्द्यांना चितपट केलं. तसंच ही घोषणा देणारे कैलास गोरंट्याल हेदेखील जालना विधानसभा मतदारसंघातून पराभूत झाले आहेत.

राज्याचे लक्ष लागलेल्या जालना विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत शिंदेसेनेचे उमेदवार माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनी ३१ हजार ६५१ इतक्या मताधिक्याने बाजी मारली. तर काँग्रेसचे उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांचा पराभव झाला. जालना विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत २६ उमेदवार उभे होते. त्यातही काँग्रेसकडून आ. कैलास गोरंट्याल, शिंदेसेनेकडून अर्जुन खोतकर यांच्यातच सरळ लढत होत होती. वंचितचे डेव्हिड घुमारे, भाजपचे बंडखोर अपक्ष उमेदवार अशोक पांगारकर, काँग्रेसचे बंडखोर अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज यांच्या उमेदवारीमुळे निवडणुकीतील चुरस वाढली होती.

प्रचारादरम्यान निवडणुकीच्या उमेदवारांनी एकमेकांवर टीकेचे बाण सोडत वातावरण चांगलेच तापविले होते. उमेदवारांनी शहरी, ग्रामीण भागातील प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून प्रचार केला. सभा, कॉर्नर बैठकांवरही लक्ष देण्यात आले होते. प्रचाराच्या या धामधुमीनंतर २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. या मतदान प्रक्रियेत जालना विधानसभा मतदारसंघात ६४.३९ टक्के मतदान झाले होते. तर शनिवारी झालेल्या मतमोजणीनंतर या मतदार संघात शिवसेनेचा भगवा फडकला असून, शिंदेसेनेचे अर्जुन खोतकर यांनी ३१ हजार ६५१ मते अधिक घेत विजय मिळविला. खोतकर यांना १ लाख ४ हजार ६६५ इतकी तर पराभूत उमेदवार गोरंट्याल यांना ७३ हजार १४ मते मिळाली आहेत.

या निवडणुकीत काँग्रेसचे बंडखोर आणि अपक्ष उमेदवार अब्दुल हाफिज यांना ३० हजार ४५४ मते घेतली असून, ते तिसऱ्या क्रमांकावर राहिले आहेत. वंचितचे उमेदवार डेव्हिड घुमारे यांना ६,३२२, भाजपचे बंडखोर आणि अपक्ष उमेदवार अशोक पांगारकर यांना २,२२७ मते मिळाली. इतर पक्षाचे उमेदवार आणि अपक्ष उमेदवारांना मात्र अपेक्षित मते मिळालेली नाहीत. एकूणच या निकालानंतर अर्जुन खोतकर, अभिमन्यू खोतकर यांच्यासह महायुतीतील मित्र पक्षांच्या पदाधिकारी, समर्थकांसह शिवसैनिकांनी मोठा जल्लोष केला. मतमोजणी केंद्रासह खोतकर यांच्या निवासस्थान परिसरातही एकच जल्लोष केला जात होता. खोतकर समर्थकांनी रात्री उशिरापर्यंत शहरातील विविध भागांत एकच जल्लोष करीत फटाक्यांची आतषबाजी केली.

**गोरंट्याल यांच्या पराभवाचे कारण...**

काँग्रेसचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांचा ३१ हजार ६५१ मतांनी पराभव झाला. तर काँग्रेस पक्षातील बंडखोर उमेदवार अब्दुल हाफिज यांनी ३० हजार ४५४ मते घेतली. लोकसभेप्रमाणेच विधानसभा निवडणुकीत निकाल लागेल, ही मविआची आशा विधानसभेच्या निकालात फोल ठरली. दरम्यान, जनतेने दिलेला कॉल आपल्याला मान्य असून, यापुढेही आपण जनतेच्या सेवेत कार्यरत राहणार आहोत. आजवर पाणीप्रश्न सोडविण्यासह मेडिकल कॉलेज मंजूर करून सुरू करण्यात यश आले आहे. यापुढेही जनसेवा सुरूच राहील, असे कैलास गोरंट्याल यांनी सांगितले.

# अंबरनाथमध्ये औषध कंपनीला आग; शेजारच्या दोन कंपन्यांनाही आगीची झळ

अंबरनाथ, दि. २६ : प्रतिनिधी

अंबरनाथ पूर्वेतील आनंद नगर अतिरिक्त औद्योगिक वसाहतीत असलेल्या एका औषध निर्मिती कंपनीला रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास भीषण आग लागली. या कंपनीत असलेले रसायने यांच्यामुळे आग लागल्याचे प्राथमिक वृत्त आहे. कंपनीतून काही रसायने बाहेर वाहून आल्याने शेजारच्या दोन कंपन्यांनाही आगीची झळ बसली. रात्री उशिरापर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न अग्निशमन दलाच्या वतीने सुरू होते.

रेसिनो ड्रग प्रायव्हेट लिमिटेड असे या कंपनीचे नाव असल्याची माहिती अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी दिली. रात्री साडे नऊच्या सुमारास रसायनामुळे आग लागल्याने कंपनीने पेट घेतला. याची माहिती मिळताच अग्निशमन दानाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेत आग विझवण्यास सुरुवात केली. कंपनीतून रसायने बाहेर वाहून येत असल्याने शेजारच्या कंपन्यांनाही आगीची झळ बसल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. तसेच कंपनी बाहेरच्या नाल्यामध्ये रसायन पसरल्याने येथेही काही काळ भडका उडाला होता. त्यामुळे येथे गोंधळाची स्थिती होती. रात्री अकरा वाजेपर्यंत आगीवर नियंत्रण मिळवण्यात आले नव्हते. कंपनीत कर्मचारी अडकल्याची किंवा कोणत्याही जीवितहानीची माहिती रात्री उशिरापर्यंत मिळाली नाही. मात्र भीषण आगीत कंपनीचे मोठे नुकसान झाले आहे.

# मराठवाड्यात 46 पैकी 40 जागांवर महायुतीचा भगवा

छत्रपती संभाजीनगर, दि. २६ : प्रतिनिधी

आरक्षण मागणीच्या भूमीत महाविकास आघाडीस हादरा देत भारतीय जनता पक्षाने अग्रेसर राहत मराठाड्यातील ४६ पैकी ४० जागा महायुतीस मिळाल्या. महाविकास आघाडीस केवळ पाच जागांवर समाधान मानावे लागले. भाजपची विजयाची कमान सलग तिसऱ्या निवडणुकीमध्ये चढी राहिली. २०१४ मध्ये भाजपला १५ जागा मिळाल्या होत्या. तेव्हापासून लढवलेल्या २० पैकी १९ जागांवर भाजपचा विजय झाला. आरक्षण आंदोलनात ‘भाजप’ ला पाडा हा नारा आता हवेत विरल्याचे निकालानंतर स्पष्ट झाले. लातूर शहरातून अर्चना पाटील चाकूर अटीतटीच्या लढतीमध्ये पराभूत झाल्या अन्यथा सर्व उमेदवार निवडून आले. महिला मतदारांचे शेकडा प्रमाण ७० टक्क्यांहून अधिक असणाऱ्या २० जागांवर महायुतीच्या उमेदवारांचा दणदणीत विजय झाला. विधानसभेच्या निवडणुकीमध्ये मराठवाड्यातील धनंजय मुंडे, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, संजय बनसोडे, अतुल सावे हे सारे मंत्री विजयी झाले. यातील अब्दुल सत्तार, तानाजी सावंत व अतुल सावे या मंत्र्यांची विजयासाठी दमछाक झाली. धनंजय मुंडे यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्यापेक्षा तब्बल एक लाख ४० हजार अधिक मतांनी विजय मिळवला. सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनीही मोठ्या फरकाने विजय मिळवला. या निवडणुकीमध्ये काँग्रेसला मोठा फटका बसला. २०२९ मध्ये १० जागांवर असणाऱ्या काँग्रेसचे नेते अमित देशमुख हेही पहिल्या फेऱ्यांमध्ये मागे होते. मात्र, अंतिम निकाल त्यांच्या बाजूने लागला. एमआयएमच्या प्रवासाला पूर्णविराम नांदेडमधून सुरू झालेल्या एमआयएमच्या मराठवाड्यातील प्रवासाला या निवडणुकीमध्ये पूर्णविराम मिळाला. लोकसभेत पराभूत झाल्यानंतर इम्तियाज जलील यांनी औरंगाबाद पूर्व मतदारसंघातून पुन्हा एकदा नशीब आजमावले होते. पहिल्या काही फेऱ्यांमध्ये ७० हजारहून अधिक मतांची आघाडी घेतल्यानंतर ते २१६१ मतांनी पराभूत झाले.

**नांदेड लोकसभेची जागा काँग्रेसने कायम राखली**

भाजपने आघाडी घेतलेल्या नांदेड लोकसभेच्या पोटनिवडणुकीत अखेरीस काँग्रेसचे रवींद्र चव्हाण हे १४५७ मतांनी विजयी झाले. दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांचे पुत्र रवींद्र यांना ५ लाख ८६ हजार तर भाजपचे संतूकराव हंबर्डे यांना ५ लाख ८५ हजार मते मिळाली.

साखरेच्या राजकारणातील काँग्रेसचे एकमेव नेते अमित देशमुख यांची भाजपच्या अर्चना चाकूरकर यांनी चांगलीच दमछाक केली. अमित देशमुख नऊ हजार मतांनी निवडून आले. गेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये ‘नोटा’ला दुसऱ्या क्रमांकाची मते असणाऱ्या लातूर ग्रामीणमध्ये धीरज देशमुख यांना रमेश कराड यांनी पराभूत केले. विधान परिषद सदस्य रमेश कराड यांना २०१९ मध्ये निवडणुकीमध्ये उतरायचे होते. पण तेव्हा उमदेवारी मिळाली नाही. धीरज देशमुख यांचा सात हजारांनी झालेला पराभव देशमुख कुटुंबीयांवरील ग्रामीण भागातील नाराजीमुळे असल्याचे सांगण्यात येत आहे. लातूरमधील साखरेच्या राजकारणाला बसलेला हा मोठा धक्का मानला जात आहे. अमित देशमुख यांचीही मतदारसंघात चांगलीच दमछाक झाली. पहिल्या काही फेऱ्यांमध्ये अमित देशमुख मागे पडले होते. संभाजीनगरमध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष भुईसपाट विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्ष संभाजीनगर जिल्ह्यातून भुईसपाट झाला. कन्नडचे आमदार उदयसिंह राजपूत पराभूत झाले. संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल, अब्दुल सत्तार, विलास संदीपान भुमरे, प्रा. रमेश बोरनारे ही मंडळी निवडून आली. उदयसिंह राजपूत यांचा पराभव करून संजना जाधव निवडून आल्या. या निवडणुकीमुळे संभाजीनगरचा बालेकिल्ला शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाचा, असे निकालानंतर स्पष्ट झाले आहे.



मुंबई अहमदाबाद महामार्गावर हालोली गावाच्या हद्दीतील पाडोस पाड्याच्या हद्दीत कंटेनर चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात होऊन कंटेनर ट्रक रस्त्यालगत उलटला होता. सकाळी झालेल्या अपघातात ट्रक चालक जखमी झाला आहे.

# नाना पटोले यांच्याबद्दल अपशब्द, शिवीगाळ

## व्हायरल ऑडियो क्लिपने खळबळ

■ महासागर प्रतिनिधी,

भंडारा , दि. २६ : राज्यातील विधानसभा निवडणुकीचे निकाल (दि.२३) नोव्हेंबर रोजी लागले. साकोली विधानसभेत लागलेल्या निकालानंतर या मतदारसंघातील वातावरणच तापलेले आहे. साकोलीचे नवनिर्वाचित आमदार नाना पटोले यांच्याबद्दल बोलताना अपशब्दांचा वापर करत थेट मोबाईल वरून शिवीगाळ करण्यात आल्याने एकच खळबळ उडाली. भाजपचे जिल्हाध्यक्ष आणि राष्ट्रवादीचे एक नगरसेवक यांच्यात झालेल्या या संवादाची कॉल रेकॉर्डिंग व्हायरल झाली असून यासंदर्भात काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून लाखनी पोलीस



ठाण्यात तक्रार करण्यात आली आहे. साकोली विधानसभेची निवडणूक अत्यंत अटीतटीची झाली. निकालानंतर येथील वातावरण तापलेले असताना एक ऑडियो क्लिप व्हायरल झाली ज्यामुळे चर्चेला उधाण आले आहे. राष्ट्रवादी (अजित पवार) गटाचे लाखनी नगरपंचायतीचे स्वीकृत नगरसेवक धनु व्यास यांनी भाजप भंडारा जिल्हाध्यक्ष यांच्याशी मोबाईलवर संवाद करतांना आमदार नाना पटोले यांच्याबद्दल मोबाईलवर अपशब्दात बोलत शिवीगाळ केली. नगरसेवक धनु व्यास यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष यांना शनिवारी २३ नोव्हेंबर रोजी रात्रीच्या सुमारास भ्रमनध्वनीवर संपर्क साधला होता. यावेळी जिल्हा अध्यक्ष यांनी विधानसभा निवडणुकीत नाना पटोले निवडून आल्यामुळे त्यांचे अभिनंदन करायला हवे असे बोलणे सूरू असताना मोबाईल फोनवर आमदार नाना पटोले यांच्याबद्दल नगरसेवक धनु व्यास यांनी अपमानजनक अश्लील भाषेचा वापर करीत शिवीगाळ केली. या फोनवरील संभाषणाची ऑडियो क्लिप समाज माध्यमावर मोठ्यप्रमाणावर व्हायरल झाली आहे. या प्रकारामुळे जिल्ह्यासह लाखनी तालुक्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

या घटनेची दखल घेत, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष योगराज झलके यांच्या मार्गदर्शनात शंभरहुन अधिक नाराज कार्यकर्त्यांनी (दि.) नोव्हेंबर रोजी लाखनी पोलिस ठाण्यात धनु व्यास यांचे विरोधात तक्रार दिली आहे. अश्लील संवादामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांच्या भावना दुखावल्या असून, संपूर्ण राज्यात मोबाईलची कॉल रेकॉर्डिंग वायरल झाली आहे. एकंदरीत, आमदार नाना पटोले यांची प्रतिमा मलीन करण्याचा हा डाव तर नाही ना? असा सवाल जनतेत उपस्थित केल्या जात आहे.

या घटनेचा काँग्रेसतर्फे निषेध करण्यात आला असून, लाखनी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. भाजप जिल्हाध्यक्ष यांच्याशी मोबाईलवर झालेला संवादाची रेकॉर्डिंग एका पेन ड्राइव्ह मध्ये कैद करून पोलिसांच्या स्वाधिन करण्यात आली आहे. नाना पटोले यांना शिवीगाळ करणाऱ्या नगरसेवक धनु व्यास यांचेवर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी काँगेस पक्षाकडून तक्रारीद्वारे करण्यात आली आहे.

# भाजपमध्ये मंत्री पदासाठी अंतर्गत स्पर्धा

### मुनगंटीवार, भांगडिया, जोरगेवार एकमेकांचे स्पर्धक

■ महासागर प्रतिनिधी,

चंद्रपूर, दि. २६ : जिल्ह्यात भाजपचे पाच आमदार निवडून आल्याने मंत्री पदासाठी पक्षांतर्गत स्पर्धा वाढली आहे. यामध्ये सलग सातव्यांदा विधानसभेत जाण्याचा विक्रम करणारे सुधीर मुनगंटीवार, तिसऱ्यांदा आमदार झालेले किर्तिकुमार उर्फ बंटी भांगडीया, सलग दुसऱ्यांदा व भाजपकडून पहिल्यांदा आमदार झालेले किशोर जोरगेवार या तीन जणांमध्ये स्पर्धा आहे. या जिल्ह्यातील बल्लारपूर, चिमूर, चंद्रपूर, राजुरा व वरोरा या पाच मतदार संघात अनुक्रमे सुधीर मुनगंटीवार, किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडीया, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे व करण देवतळे असे पाच आमदार विजयी झाले आहेत. यामध्ये सर्वात जेष्ठ, अनुभवी तथा लोकप्रिय लोकप्रतिनिधी सुधीर मुनगंटीवार आहेत.

विधानसभेत सलग सात वेळा जाणारे विदर्भातील एकमेव आमदार आहेत. तसेच पालकमंत्री म्हणूनही मुनगंटीवार यांनी आजवरची सर्वोत्तम कामगिरी करीत चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यातील दहा पैकी नऊ जणांवर भाजपचे आमदार निवडून आणण्यात



महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यामुळे मंत्री पदासाठी त्यांचे नाव आघाडीवर असून स्थानिक भाजप कार्यकर्ते देखील मुनगंटीवार यांचा दांडगा अनुभव व कल्पकता लक्षात घेता चांगल्या खात्याची जबाबदार त्यांच्याकडे सोपवावी अशी मागणी करीत आहेत.

त्यापाठोपाठ चिमूरचे आमदार बंटी भांगडीया यांचे नाव आहे. चिमूर क्रांती भूमीत भांगडिया सलग तिसऱ्यांदा विजयी झाले आहेत. त्यामुळे त्यांचाही मंत्री पदावर दावा आहे. तिसऱ्या क्रमांकावर चंद्रपूरचे आमदार किशोर जोरगेवार आहेत. जोरगेवार सलग दुसऱ्यांदा विजयी झाले असले तरी भाजपच्या तिकीटवर प्रथमच निवडून आले आहेत.

मात्र त्यांनाही मंत्री पदाचे डोहाळे लागले आहेत. कॅबिनेट नाही तर किमान राज्यमंत्री पदी तरी जोरगेवार यांची वर्णी लावा अशी मागणी त्यांच्या समर्थकांनी जोरकस पने लावून धरली आहे. वरोरा येथील करण देवतळे तथा राजुराचे देवराव भोंगळे प्रथमच निवडून आले आहेत. यातील भोंगळे हे मुनगंटीवार समर्थक आहेत. तर देवतळे यांचा कल मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांच्याकडे अधिक आहे. त्यामुळे अहिर ज्यांच्या बाजूनं उभे राहतील तिकडे देवतळे झुकतील अशीही राजकीय वर्तुळात चर्चा आहे. सध्यातरी मंत्री पदासाठी भाजपात जोरदार अंतर्गत स्पर्धा सुरू आहे.

या स्पर्धेत कोण विजयी होणार हे मुख्यमंत्री पदाच्या शपथविधीनंतर स्पष्ट होणार आहे. केवळ मंत्री पदासाठी नाही तर पालकमंत्री पदासाठी देखील जिल्ह्यात स्पर्धा होणार आहे. त्यामुळे मंत्री पदाची लॉटरी कुणाला लागणार, कोणाचे नशीब फळफळणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### वडेट्टीवार यांनी विरोधी पक्ष नेते पद गमावले

ब्रम्हपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांचे विरोधी पक्ष नेते पद जाणार यावर शिक्कामोर्तब झाले आहे. कारण विरोधी पक्ष नेते पदासाठी आवश्यक संख्याबळ काँग्रेसकडे नाही. परिणामी विरोधी पक्ष नेते पद काँग्रेसला गमवावे लागणार आहे.

# जावई आणि लेकीने आता सासरी जावे: धर्मरावबाबा आत्राम

■ महासागर प्रतिनिधी,

गडचिरोली,दि. २६ : निवडणूक संपली आता जावई आणि लेकीने सासरी निघून जावे, त्यांचे इथे कोणतेही काम नाही. विधानसभा निवडणुकीत विरोधात उभ्या राहणाऱ्या भाग्यश्री हलगेकर यांना धर्मरावबाबा आत्राम यांनी दिलेला वडीलकीचा सल्ला जिल्ह्यात सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे नेते धर्मरावबाबा आत्राम यांना मुलगी भाग्यश्री हलगेकरने बंड करून आव्हान दिल्याने अहेरी विधानसभेत वादळ उठले होते. शरद पवार गटाने मंत्री धर्मरावबाबा आत्राम यांच्या विरोधात भाग्यश्री यांना उमेदवारी दिली. त्यामुळे अहेरी विधानसभेत वडील विरुद्ध मुलगी, दुसरीकडे बंडखोर उमेदवार पुतण्या अम्ब्रीशराव आत्राम, अशी तिरंगी लढत झाली.

प्रचारादरम्यान एकमेकांची उणीदुणी काढण्यात आली. टोकाचा राजकीय संघर्ष दिसून आला. समाजमाध्यमावर काही वादग्रस्त ऑडिओ क्लिप सार्वत्रिक झाल्याने चांगलाच वाद निर्माण झाला होता. त्यामुळे राजकीय वर्तुळाचे अहेरीकडे लक्ष लागले होते. बंडखोरामुळे मतदानात झालेले विभाजन पाथ्यावर पडल्याने अनेकांचे अंदाज चुकवून





अखेर धर्मरावबाबा आत्राम १६ हजाराच्या मताधिक्याने विजयी झाले. आत्राम यांचा पुतण्या अम्ब्रीश आत्राम आणि मुलगी भाग्यश्री यांना अनुक्रमे दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकावर समाधान मानावे लागले. या विजयाने धर्मरावबाबा आत्राम यांनी आपले राजकीय वजन पुन्हा एकदा दाखवून दिले. विजयानंतर ते मुलगी आणि जावई पुन्हा एकत्र येणार का, अशी चर्चा सुरु झाली होती. मात्र, आत्रामांनी जावई आणि मुलीला सासरी जाण्याचा सल्ला देत सर्व शक्यतांवर एकप्रकारे विराम लावला आहे.

### बाप तो बाप होता है

यंदा पहिल्यांदाच आत्राम राजघराण्यातील तिघांनी विधानसभा निवडणूक लढवली होती. यापैकी पुतण्या भाजप बंडखोर म्हणून अम्ब्रीशराव आत्राम हे आमदार राहिले आहेत, तर भाग्यश्री आत्राम (हलगेकर) यांनी यापूर्वी गडचिरोली विधासभेतून निवडणूक लढवली होती. तेव्हा देखील त्यांना पराभवाचे तोंड पाहावे लागले होते.

निकालानंतर दिलेल्या प्रतिक्रियेत धर्मरावबाबांनी बाप तो बाप होता है हे सांगून विरोधकांचे तोंड बंद केले, अशी चर्चा अहेरी मतदारसंघात आहे. दुसरीकडे, भाजप नेतृत्वाने बंडखोरी केलेल्या अम्ब्रीश आत्राम यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात खदखद आहे. त्यामुळे निवडणुकीनंतर तरी कारवाई करणार का, असा प्रश्न अजित पवार गटाकडून उपस्थित करण्यात येत आहे.

# पुतण्याने विळ्याने केली काकाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी,

बार्शीटाकळी , दि. २६: शेतातील पाइपलाइनवरून बैलगाडी का घातली, या क्षुल्लक कारणावरून वाद घालत पुतण्याने काकाची हत्या केल्याची घटना बार्शीटाकळी तालुक्यातील बोरगाव खुर्द येथे रविवारी सायंकाळी साडेपाच ते सहाच्या सुमारास निर्गुणा नदीच्या पुलावर घडली. याप्रकरणी पिंजर पोलिसांनी खुनाचा गुन्हा नोंदवून आरोपीस अटक केली आहे. पिंजर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरगाव खुर्द येथील शेतकरी गोपाळ मोतीराम ढोरे (४८) हे २४ नोव्हेबर रोजी सायंकाळी साडेपाच ते सहाच्या सुमारास शेतातून बैलगाडी घेऊन घराकडे जात असताना नदीवरील पुलावर त्यांचा पुतण्या विशाल विलास ढोरे (२२) याने त्यांच्याशी शेतातील पाइपलाइनवरून बैलगाडी का घातली तसेच शेतात बैल का चरावयास सोडला, यावरून वाद घालत निर्गुणा नदीच्या पुलावर लोखंडी विळ्याने काका गोपाळ ढोरे



यांच्या डोक्यात सपासप मारून ठार मारले. याप्रकरणी तेजस तुळशिराम ढोरे (१४) याच्या फिर्यादीवरून पिंजर पोलिसांनी खुनाचा गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली. घटनेची माहिती मिळताच पिंजर पोलिस ठाण्याचे ठाणेदार गंगाधर दराडे, उपनिरीक्षक गजानन रहाटे, बीट जमादार दत्तात्रय चव्हाण, सुमेध मोहळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आरोपीला अटक केली. ठाणेदार दराडे आणि पीएसआय गजानन रहाटे पुढील तपास करत आहेत.

# तीन आमदारांना मंत्रिपदाचे वेध! कुणाची वर्णी लागणार?

■ महासागर प्रतिनिधी,

अमरावती, दि. २६: जिल्ह्यातील आठपैकी सात जागांवर महायुतीने विजय संपादन करून जिल्ह्याच्या राजकारणावर वर्चस्व प्रस्थापित केले आहे. आता नव्या सरकारमध्ये महायुतीमधून मंत्रिपदासाठी तीन जणांची दावेदारी पुढे आली आहे. यात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या सुलभा खोडके, युवा स्वाभिमान पक्षाचे रवी राणा आणि भाजपचे प्रताप अडसड यांचा समावेश आहे. विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील काँग्रेसचे वर्चस्व उध्वस्त करीत महायुतीच्या उमेदवारांनी घवघवीत यश संपादन केले. धामणगाव रेल्वे, तिवसा, अचलपूर, मेळघाट आणि मोर्शी या पाच मतदारसंघांत भाजपने तर अमरावतीत राष्ट्रवादी काँग्रेसने आणि बडनेरात युवा स्वाभिमान पक्षाने यश मिळवले. रवी राणा हे चौथ्यांदा निवडून आले आहेत. या निवडणुकीत भाजपने त्यांना बळ दिले असले, तरी त्यांनी अमरावती आणि दर्यापूरमध्ये महायुतीच्या धर्माचे पालन केले नाही, अशी टीका त्यांच्यावर झाली. अमरावतीत महायुतीच्या उमेदवार सुलभा खोडके यांना पाठिंबा देण्याऐवजी माजी





खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणांनी भाजपचे बंडखोर उमेदवार जगदीश गुप्ता यांचा प्रचार केला. खोडके आणि राणा दाम्पत्यातील राजकीय संघर्ष जुना असला, तरी आता दोघेही महायुतीचे घटक आहेत. त्यामुळे मंत्रिपदाच्या शर्यतीत देखील या संघर्षाचे प्रतिबिंब झळकेल, असे संकेत आहेत. लोकसभा निवडणुकीत विरोध केला, हे कारण पुढे करून राणा दाम्पत्याने अमरावतीत खोडके यांच्या तर दर्यापुरात शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे अभिजीत अडसूळ यांच्या विरोधात भूमिका घेतली. त्यावरून एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी राणा यांना समजही दिली होती. पण, त्यांनी विरोधी भूमिका कायम ठेवली. राणा हे देवेंद्र फडणवीस यांच्या निकटचे समजले जातात, त्यामुळे मंत्रिपदाच्या शर्यतीत त्यांचे नाव पुढे आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते संजय खोडके हे अजित पवारांच्या निकटचे. पक्षाची निवडणुकीतील व्यूहरचना आणि धोरणात्मक निर्णयात त्यांच्या शब्दाला किंमत दिली जाते, त्यामुळे सुलभा खोडके यांना मंत्रिपद मिळावे, यासाठी अजित पवार समर्थक आग्रही आहेत. भाजपचे प्रताप अडसड हे दुसऱ्यांदा आमदार झाले आहेत. गेल्या निवडणुकीत ते जिल्ह्यात निवडून आलेले भाजपचे एकमेव आमदार होते. त्यांनाही मंत्रिपदाची आस आहे. मेळघाटचे आमदार केवलराम काळे यांनी सहा महिन्यांपूर्वी काँग्रेसमधून भाजपमध्ये प्रवेश केला होता. २००४ मध्ये केवलराम काळे काँग्रेसच्या उमेदवारीवर आमदार बनले होते. मोर्शीचे आमदार उमेश यावलकर, अचलपूरचे आमदार प्रवीण तायडे आणि तिवसाचे आमदार राजेश वानखडे हे प्रथमच निवडून आले आहेत.

# पाणीपुरवठा विभाग प्रभारींवरच सुरु

अमरावती, दि. २६: जिल्हा परिषदचा पाणीपुरवठा उपविभाग मागील एका वर्षापासून प्रभारी अधिकाऱ्यांवर सुरू आहे. यामुळे जलजीवन मिशनच्या कामाला खिळ बसली असल्याचे यानिमित्ताने दिसून येत आहे. त्यामुळे नवनिर्वाचित आमदारांनी यात लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांतून केली जात आहे. जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा उपविभागामार्फत जलजीवन मिशनची कामे तालुक्यात गावागावांत सुरू आहेत. परंतु, प्रभारी अभियंता असल्याने होत असलेली कामे संथगतीने सुरू आहेत. मंजूर असलेली जलजीवन मिशनची कामे गतवर्षी उपअभियंता कुमटे जेव्हापासून या कार्यालयातून बदली झाली. तेव्हापासून ते आजपर्यंत जिल्हा परिषद पाणीपुरवठा उपविभाग हे प्रभारी अभियान त्यावरच सुरू आहे. प्रभारी अभियंता सुनील चव्हाण यांच्याकडेसुद्धा सात महिन्यांचा कारभार होता. त्यांच्या कार्यकाळात देखील कामे सुरू होती. मात्र अपेक्षित गती कामाला मिळालीच नाही. त्यानंतर एच.डी. सोनी प्रभारी आजवर कार्यभार सांभाळत आहेत. परंतु, त्यांच्याकडे उमरखेड महागावचाही अतिरिक्त कार्यभार आहे. त्यामुळे त्यांचे लक्ष पुसद तालुक्यातील कामाकडे जास्त नसल्याने कामाला गती येताना दिसत नाही. याकडे गांभीर्याने लक्ष देऊन कायम अधिकारी या विभागाला देण्यात यावा, अशी मागणी होत आहे. कायम अधिकारी दिल्यास तालुक्यातील जलजीवनच्या कामांचा गती मिळण्यासाठी ही मागणी होत आहे.

# विवेकानंद आश्रमात शुकदास महाराज जयंती सोहळ्याचे आयोजन

### आरोग्य शिबिर, स्पोर्ट अकॅडमीचा होणार शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी,

हिवरा आश्रम , दि. २६: विवेकानंद आश्रमाचे संस्थापक निष्काम कर्मयोगी शुकदास महाराजांचा जयंती सोहळा कार्तिक वैद्य त्रयोदशीला दरवर्षी आश्रमात साजरा करण्यात येतो. यावर्षी गुरूवार २८ नोव्हेंबर रोजी हा सोहळा पार पडणार आहे.

कार्यक्रमाची सुरूवात ग्रामसफाई व गावातून दिंडी परिक्रमेने होईल. सकाळी ४ वाजता समाधी स्थळी विधिवत शास्त्रोक्त पूजन होवून भाविकांना समाधीचे दर्शन घेता येईल. विद्यार्थ्यांच्या अंगी वक्तृत्व शैली निर्माण व्हावी, त्याला विषय प्रतिपादन करता यावे, यासाठी मागील ३७ वर्षापासून जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले जाते.

यावर्षी हवामान बदल या



विषयावर जिल्हाभरातून १०० बाल वक्ते वक्तृत्व स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

त्यातील विजयी स्पर्धकांना रोख रक्कम व प्रशस्तीप्रत्र,चषक व प्रमाणपत्र दिल्या जाते. त्यानंतर ज्ञानपीठ शाळेत बालक पालकांसाठी आनंद मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ज्ञानपीठ क्रीडा विभागाच्या वतीने परिसरातील विद्यार्थ्यांना सैन्य व पोलिस दलातील नोकरीसाठी संत शुकदास करीअर अकॅडमीचा शुभारंभ करण्यात येणार आहे.

दुपारी १०वाजता अपंग, कर्णबधिर विद्यालयात हस्तकला पदर्शन, विद्या मंदिर शाळेत विज्ञान प्रदर्शन भरवले जाणार आहे. तसेच ग्रामीण रुग्णालयात रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून गरजू रुग्णांना संस्थेमार्फत मोफत चष्मे व औषधींचे वितरण करण्यात येणार आहे. दुपारी४ ते ६ या दरम्यान मुली व महिलांसाठी कॅन्सर जनजागृती लक्षणे, उपाययोजना व तपासणीचे मुलींच्या वसतिगृहात आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ७ वाजता भक्तीगीत गायन, रात्री, ८वाजता हभप गजाननदादा शास्त्री पवार महाराज यांचे प्रवचन होणार आहे. रात्री ४ ते १० विवेकानंद जयंती उत्सवाची पहिली सभा होणार आहे. या कार्यक्रमाचा भाविकांनी लाभ घ्यावा.

### गुरुपुष्यामृतनिमित्त श्रीं'च्या दर्शनासाठी गर्दी:शेगावला भक्तिमय स्वरूप

शेगाव: धन्य आज दिन संत दर्शनाचा, अनंत जन्माचा सीन गेला, या अमृतमय अभंगाचा जय जयकार करीत श्री संत गजानन महाराजांच्या समाधीचे आज २१ नोव्हेंबर गुरुवार कार्तिक शुद्ध ६ रोजी गुरुपुष्यामृत या अमृत योग दिनी हजारो भाविकांनी श्रींच्या समाधीचे दर्शन घेतले. तर अनेक भाविकांनी श्री गजानन महाराज विजय ग्रंथाचे पारायण केले. आज गुरुपुष्यामृत योग दिनी संत श्री गजानन महाराजांच्या दर्शनासाठी राज्यभरातून हजारो भाविक भक्त शेगावात दाखल झाले होते.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **ASHOK KUMAR**. NOW MY NEW NAME IS **ASHOK RAMCHAND CHAWLA.**
**ADD** : 36, SURYA NAGAR, BHANDARA ROAD BHANDEWADI NAGPUR

MY OLD NAME WAS **SHOYEB BHAI IZZY.** NOW MY NEW NAME IS **SHOEB IZZY.**
**ADD** : 184 KHADAN NEAR OLD LAL IMLI NAGPUR 440018

MY OLD NAME WAS **AMIN SAHEB BI BHAIMIYA PATEL**. NOW MY NEW NAME IS **AMINABI MOHIUDDIN DESHMUKH.**
**ADD** : 15 DIGHORI SQUARE ADARS NAGAR UMRED RAOD NAGPUR 440024

MY OLD NAME WAS **GAGANDEEP SINGH**. NOW MY NEW NAME IS **GAGAN DEEP SINGH PELIA**.
**ADD** : 327 NEAR GURUDWARA BABA BUDDHAJI NAGAR,TEKA NAKA NAGPUR 440017

MY OLD NAME WAS **AMAR KUMAR POPTANI**. NOW MY NEW NAME IS **AMARLAL POPTANI.**
**ADD** : 668 SAI COLONY GOWARDHAN NAGAR, TUMSAR 441912

MY OLD NAME WAS **RUBINA IRFAN MAKKI.** NOW MY NEW NAME IS **RUBINA BANU IRFAN BAWANI.**
**ADD** : PLOT NO,264 KAWRAPETH NAGPUR

MY OLD NAME WAS **TARANNUM SYEDA KHAN.** NOW MY NEW NAME IS **TARANNUM ZEHRA MOHAMMAD ASLAM KHAN** .
**ADD** : PLOT NO.2 SABINA SOCIETY PATEL NAGAR NAGPUR


# बार्शीटाकळीत गतिरोधक नसल्याने अपघाताची भिती

■ महासागर प्रतिनिधी,

बार्शीटाकळी , दि. २६: अकोला शहरातून अमरावती, वाशीम व यवतमाळ जिल्ह्यात जाण्यासाठी व नागपूर मुंबई या समृद्धी महामार्गावर जाण्यासाठी, सध्या सोयीचा मार्ग बार्शीटाकळी शहरातून जातो. या रस्त्यावरून प्रवाशी वाहनासोबतच गौण खनिजाचे ट्रक, लांब पल्ल्याची माल वाहतूक करणाऱ्या गाड्या ये-जा करत असतात. पोलिस विभागाचे सुद्धा याकडे लक्ष नसते. वाहतूक पोलिस केवळ बाहेर जिल्ह्यातील वाहनांच्या नंबर प्लेट पाहून त्यांना थांबवून आपले भले करुन घेण्यात मग्न असल्याचे दिसून येत आहे.

प्रत्येक १५-२० मिनिटाला व रेल्वे फाटक उघडल्यानंतर वाहतुकीचा खोळंबा होणे, हे नित्याचेच झाले आहे. कुणी कसेही वाहन चालवतो. गतिरोधक नसल्यामुळे वाहनांच्या वेगावर नियंत्रण येत नाही. रेल्वे फाटक उघडल्यावर पुढे जाण्याच्या शर्यतीत सुसाट वाहने पिटाळतात. त्यातच बायपास चौकात पेट्रोल पंप असल्यामुळे पंपातून बाहेर पडणारा वाहनचालकसुद्धा मुख्य रस्त्यावर येतो.

त्यातून अनेकदा अपघात घडलेले आहेत. यावर उपाय म्हणजेच पेट्रोल पंपावर जाण्या-येण्याच्या रस्त्यावर व बायपास चौकात पिंपळखुटा फाट्या अगोदर



गतिरोधक तयार करणे अत्यंत जरूरी आहे. याबाबत अनेकदा मागणी करुनही ढिम्म प्रशासनाने अद्याप याची दखल घेतलेली नाही.

गतिरोधक बसवणार बार्शीटाकळी शहरातून जाणाऱ्या वर्दळीच्या मुख्य रस्त्यांवर शक्य तेवढ्या लवकर या ठिकाणी गतिरोधक बनवण्यात येईल.
**-पद्माकर वानखडे, अभियंता, राष्ट्रीय महामार्ग**


## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
### Tender Notice

Commissioner NMC invites Offline Tenders for the following work. These Offline Tenders can be Submitted by the Registered Contractors of NMC. The terms and conditions of Tenders are available in the Tender Form. The sale and purchase of Tender Form can be done at Executive Engineer (DPDC) office, 5th Floor, 'A' Wing , NMC Civil Line Nagpur .

| Tender No. | Name of the work | Tender Amount (Rs.) |
|---|---|---|
| 1/2024-25/ DPDC | Ground Levelling Near Aastha Residency at Rodkar Layout at Prabhag No-29 Mouza Hudkeshwar | 7,92,100/- |
| 02/2024-25/ DPDC | Construction of Interlocking Block Paverment From H/O Thavkar to H/O Sakharkar at Vidya Nagar in PR. No. 26 | 8,24,434/- |
| 03/2024-25/ DPDC | Providing and Fixing I Block From H/O Nimje to Malode at Vidya Nagar in Prabhag no. 26 | 8,25,256/- |
| 04/2024-25/ DPDC | Providing and Laying of Storm Drain Line at Balaji Nagar Near H/O Choudhary to H/O Katre Kirana, Kalamna Pr. No 04 | 8,28,838/- |
| 05/2024-25/ DPDC | WBM of Road at Balaji Nagar Near H/O Salim Waigh to Savita Mondekar in Prabhag No. 04 | 8,06,028/- |
| 06/2024-25/ DPDC | WBM of Road at Balaji Nagar Near H/O Sumitra Mankar to Shiv Mandir in Prabhag No. 04 | 8,06,860/- |
| 07/2024-25/ DPDC | WBM of Road at Balaji Nagar Main Road to Sandip Choudhary in Prabhag No. 04 | 8,06,820/- |
| 08/2024-25/ DPDC | Const. of Shed at Dev Nagar in Pipla fata Near Hanuman Mandir in Pr. No. 29 | 8,30,254/- |
| 09/2024-25/ DPDC | Providing and Laying of I Blocks Near Shiv Mandir at Rawde Layout , Ganjre Lawn at pr. No. 29 | 8,18,211/- |
| 10/2024-25/ DPDC | Construction of Cement Concrete Road at Shivaji Colony H/o Rakhunde to H/o Pangud at Pr. No. 29 | 8,14,414/- |
| 11/2024-25/ DPDC | Construction of Cement concrete Road at Gayatri Nagar Jaydurga Society , GNSN Zingabai Takli Near H/o Montra to H/O Gunthewar in pr. No. 11 | 8,14,414/- |
| 12/2024-25/ DPDC | Providing and Laying of I Blocks Near H/o Chimantwar to H/o Ajay Lambat at Prabhag No.31 | 8,17,734/- |
| 13/2024-25/ DPDC | Providing and Fixing Paverblock Near Chowkoni Maidan at Hanuman Nagar in Pr. No. 31 | 8,25,280/- |
| 14/2024-25/ DPDC | Providing and Fixing I block From H/o Bobade to H/o Bhoyar at Hanuman Nagar in Pr. No. 31 | 8,25,987/- |
| 15/2024-25/ DPDC | Levelling of Ground at Garden Premises in Pritam Vihar Society Pr. No. 02 | 7,62,783/- |

**Note - (1)** Right to reject any or all Tenders without assigning any reasons is reserved by the Municipal Commissioner N.M.C. Nagpur. **(2)** Eligibility criteria and mode of submission shall be as stated in Tender Form. **(3)** Tender Sale & Submission End Date (16:00 hrs.) : 04 Dec 2024. **(4)** Tender Opening Date ( If Possible 16: 00 hrs. ) : 05 Dec 2024.

**Executive Engineer (DPDC)**
**N.M.C., Nagpur**

**Advt No : 699/PR, Dt : 26/11/2024**

# एक जागा देऊ शकला नाहीत?

**महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाले. सगळं चित्र स्पष्ट झालं आहे. कोणाचा पाय किती खोलात आहे, मतदारराजाला कोणावर जास्त विश्वास आहे? या सगळ्या प्रश्नांची उत्तर मिळाली आहेत. साडेसात वर्षांच्या सत्ताकाळामुळे प्रस्थापित महायुती सरकारविरोधी लाट अपेक्षित होती. पण उलट घडलं. राज्यातील जनतेने महायुतीच्या पारड्यात भरभरुन मत टाकली. मागच्या दोन इलेक्शनपेक्षा २०२४ विधानसभा निवडणुकीत महायुतीने सर्वाधिक जागा जिंकल्या. भाजपने एकट्याने स्वबळावर १३२ जागा जिंकल्या. यामध्ये लाडकी बहिण असेल किंवा अन्य कल्याणकारी योजनांच योगदान असेल, पण विरोधकांचा साफ धुव्वा उडाला. विरोधी पक्षांना विरोधी पक्षनेतेपद मिळवण्याइतपतही जागा जिंकता आलेल्या नाहीत. म्हणजे विरोधक आपल्याबद्दल जनतेच्या मनात साधा विश्वासही निर्माण करु शकले नाहीत, असा हा कौल सांगतो. महाविकास आघाडी अपयशी ठरली, पण या सगळ्यात ठसठशीतपणे नजरेत भरलं, ते महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अपयश.**

-------------------

२३ नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर झाले. २२ नोव्हेंबरच्या संध्याकाळपर्यंत अनेक मनसैनिकांना आणि या पक्षाच्या पाठिराख्यांना मनसे यंदाच्या विधानसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करेल, अशी अपेक्षा होती. पण, २०१४ आणि २०१९ या दोन विधानसभा निवडणुकीपेक्षाही मोठ अपयश यंदाच्या निवडणुकीत मनसेच्या पदरात पडलं.

त्या दोन निवडणुकीत शरद सोनवणे आणि राजू पाटील यांच्या रुपाने मनसेचा एकमेव आमदार निवडून आला होता. २०२४ च्या यंदाच्या विधानसभा निवडणुकीत तर मनसेला खातही उघडता आलेलं नाही.

त्यापेक्षाही गंभीर बाब म्हणजे मनसे पक्षाने इतकी सुमार कामगिरी केलीय की, मनसेच रेल्वे इंजिन चिन्ह सोडा, पण पक्ष म्हणून त्यांची मान्यता रद्द होऊ शकते, अशी स्थिती आहे. याला कारण आहे या निवडणुकीत मनसेला मिळालेली केवळ १.८ टक्के मतं. मनसेने यंदाच्या निवडणुकीत १२५ जागा लढवल्या होत्या. जागा जिंकण सोडा, पण मनसेला लोकांची मत सुद्धा मिळवता आलेली नाही, हे विदारक सत्य आहे.

२००९ च्या विधानसभा निवडणुकीत मनसेचे सर्वाधिक १३ आमदार निवडून आले होते. त्यावेळी त्यांना ५.७८ टक्के मत मिळाली होती. २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत ३.१५ टक्के आणि २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत २.२५ टक्के. तेच यंदाच्या निवडणुकीत १.८ टक्के मतं.

मागच्या दोन निवडणुकीत मोदी फॅक्टर गृहीत धरु, त्यामुळे मनसेची कामगिरी खराब झाली. पण यंदाच्या विधानसभा निवडणुकीत अशी स्थिती नव्हती. यंदा मनसेला अनुकूल वातावरण दिसतं होतं. सोशल मीडियावर मनसेला पाठिंबा दिसत होता.

**वरातीत नाचायला सगळे पण...**

राज ठाकरेंनी राज्यभरात ४९ प्रचारसभा घेतल्या. पूर्ण ताकदीने निवडणूक लढवली. राज ठाकरेंच्या सर्व सभांना गर्दी झाली, त्यांनी प्रचारात मांडलेल्या मुद्यांवर लोकांमध्ये भरपूर चर्चा झाली. कार्यालयीन किंवा चहाच्या टपरीवर रंगणाऱ्या गप्पांमध्ये मनसे आणि राज ठाकरेंचे मुद्दे किती योग्य आहेत, या बद्दल भरभरुन बोललं गेलं. पण प्रत्यक्षात वरातीत नाचायला सगळे पण लग्नाच्या मांडवात अक्षता टाकताना कोणी नाही, अशी मनसेची स्थिती झाली.

**शिंदे मागून आले.. पुढे निघून गेले**

मुंबईत फक्त शिवडी विधानसभा मतदारसंघातून बाळा नांदगावकर यांनी 67 हजार मतं मिळवली. ते दुसऱ्या स्थानावर राहिले. माहीमसह मुंबईतील अन्य मतदारसंघात मनसेचे सर्वच उमेदवार तिसऱ्या स्थानावर फेकले गेले.

२००४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर मनसेवर मत विभाजनाचा फटका बसला होता. मनसेमुळे शिवसेना-भाजपचे उमेदवार पडले होते. पण आता तो शिक्का बसावा, इतकी सुद्धा लक्षणीय मत मिळवता आलेली नाहीत. उलट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मुंबईत फारसा प्रभाव नसताना सहाआमदार निवडून आणले. खरच याचा मनसेच्या नेतृत्वाने विचार केला पाहिजे.




**राज ठाकरेंची चूक काय?**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे नेहमी चर्चेत असतात. त्यांच्या भाषणांना, विचारांना मीडियामधून भरपूर प्रसिद्धी मिळते. त्यांचा चाहतावर्ग सुद्धा भरपूर आहे. पण प्रत्यक्ष जमिनीवर मनसेचे कार्यकर्ते लोकांपर्यंत पोहोचत नाही.

शिवसैनिकांवर मतदारांचा जो विश्वास आहे, तशा विश्वास अजून मनसैनिकांना कमावता आलेला नाही. मनसे अध्यक्षांची सतत बदलणारी भूमिका हे सुद्धा विश्वास गमावण्यामागच एक कारण आहे. पक्ष स्थापनेनंतर विकास, त्यानंतर मराठीचा मुद्दा आता हिंदुत्व. म्हणजे खूप कमी काळात पक्षाची भूमिका बदलत गेली आहे.

मनसे वाढत नाही, या प्रश्नावर राज ठाकरे म्हणतात, शिवसेनेला स्थापना झाल्यानंतर सत्तेत पोहोचायला बरीच वर्ष लागली. पण या काळात शिवसेना वाढत होती. या उलट २००९ ला मनसेचे एकाचवेळी १३ आमदार निवडून आले. २०१२ ला नगरसेवक सुद्धा चांगल्या संख्येने निवडून आले. पण त्यानंतर मनसेला उतरती कळा लागली, ती अजूनही कायम आहे.

**मनसेमुळे उबाठाचे फावले**

मनसे नसती तर उद्धव ठाकरे यांचा खेळ दहा जागांवर आटोपला असता, अशी निकालाची आकडेवारी सांगते.

महाराष्ट्र विधानसभा निवडणूकात राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा एकही आमदार निवडून आला नसला तर त्यांनी उद्धव ठाकरे यांचा मोठा फायदा केला आहे. राज्यात उद्धव ठाकरे यांच्या युबीटीने जिंकलेल्या २० जागांमध्ये १० जागा अशा आहेत. ज्यात मनसेच्या उमेदवाराला मिळालेल्या मतांमुळे विजयाचे अंतर निश्चित केले आहे. त्यापैकी ८ जागा मुंबईतील होत्या आणि दोन इतर ठिकाणच्या आहेत.

या दहा जागांवर जर मनसेने निवडणूक लढविली नसती तर उद्धव ठाकरे यांच्या जागा घटून दहा राहिल्या असत्या. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला पर्यायाने महायुतीला दहा अतिरिक्त जागा मिळाल्या असत्या. त्यामुळे निवडणूकीचे गणितच बदलले असते.

मुंबईतील माहीम, वरळी, विक्रोळी, जोगेश्वरी पूर्व, दीडोंशी, वर्सोवा, कालिना आणि वांद्रे पूर्व तर महाराष्ट्रातील वणी आणि गुहागर या जागांवर मनसे उमेदवारांमुळे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेचा विजय झाल्याचे दिसते.

मुंबईच्या माहिम मतदारसंघात राज ठाकरे यांचे पुत्र अमित ठाकरे उभे होते. त्यांना ३३,०६२ मते मिळालीत. उबाठाचे विजयी उमेदवार महेश सावंत यांना ५०,२१३ मते तर शिंदे गटाचे हरलेले उमेदवार सदा सरवणकर यांना ४८,८९७ मते मिळालीत. १,३१६ मतांनी सावंत जिंकले. मनसेचा उमेदवार नसता तर शिंदे गटाचे सरवणकर विजयी झाले असते.

वरळी मतदारसंघात उबाठाचे आदित्य ठाकरे यांना ६३,३२४ मते मिळालीत. शिंदे गटाचे पराभूत उमेदवार मिलिंद देवरा यांना ५४,५२३ मते मिळाली. ८,८०१ मतांनी आदित्य ठाकरे जिंकले. मनसेचे पराभूत उमेदवार संदीप देशपांडे यांनी १९,३६७ मते घेतली. देशपांडे नसते तर कदाचित आदित्य ठाकरेंना झटका बसला असता. इतर काही मतदारसंघातही अशीच स्थिती राहिली आहे.

मनसेच्या उमदेवारांनी शिंदे गटाला आठ जागांवर निर्णायक नुकसान केले आहे. त्यापैकी बहुतांश जागा मुंबईतील आहेत, त्यामुळे युबीटीला आपला मुंबईतील स्थान राखता आले. वरळी, माहीम, वांद्रे पूर्व जागा महत्वाच्या ठरल्या. जर मनसेने दहा जागावर निवडणूक लढली नसती तर येथे शिंदे गटाचा फायदा झाला असता. त्यामुळे उद्धव ठाकरे यांच्या दहा जागा कमी झाल्या असत्या. महायुतीच्या जागा २३० वरुन २४० झाल्या असत्या.

मनसेमुळे कुणाचा फायदा आणि कुणाचा लाभ हा भाग बाजुला ठेवला तरी राज ठाकरे यांचा एकही आमदार निवडून येवू नये, ही मोठीच नामुष्की आहे. देश आणि राज्यातील अनेक गंभीर विषय आणि मुद्यांवर राज ठाकरे रोखठोक भूमिका मांडतात. प्रसंगी खळ्ळ खट्ट्याक हा त्यांच्या पक्षाचा आवडता छंद असल्याचे दिसते. पण, पराजय तो पराजयच. या पराभवातून राज ठाकरे काय धडा शिकतात आणि नव्या दमाने कशी उभारी घेतात, ते मुंबई मनपाच्या व अन्य निवडणुकीत दिसेल.

●●●●●●●

# पोलीस ठाण्यात व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे हा गुन्हा नाही

**पोलीस ठाण्यात व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे हा गुन्हा नाही, असा महत्वपूर्ण निवाळा उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यापुर्वी दिला आहे. सरकारी गोपनीयता कायद्याच्या अंतर्गत निषिद्ध ठिकाणांमध्ये पोलीस ठाणे मोडत नाही, असे उच्च न्यायालयाने ऑक्टोबर २०२२ मध्ये एका प्रकरणाचा निकाल देताना म्हटले आहे . नेमक काय आहे प्रकरण आणि निकाल याबददल अधिक सविस्तरपणे समजुन घेण्याचा प्रयन्त करुया...**

-------------



ॲड. दत्तात्रय दिनकर फडतरे
पुणे. 7588072685

पोलीस ठाण्यात छळवणूक झाल्याच्या तक्रारी अलीकडच्या काळात वाढल्या आहेत. पोलीस यंत्रणा निष्कारण ताब्यात घेऊन त्रास देते, अशा तक्रारी अनेकांच्या असतात. मात्र त्यांच्या तक्रारीला पुष्टी देणारा पुरावा हाती नसतो. त्यामुळे त्यांच्या तक्रारी कायम बेदखल राहत असतात.पोलीस ठाण्यात व्हिडिओ रेकॉर्डिंग करणे हा गुन्हा नाही, असा महत्वपूर्ण निवाळा उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला .सरकारी गोपनीयता कायद्याच्या अंतर्गत निषिद्ध ठिकाणांमध्ये पोलीस ठाणे मोडत नाही, असे उच्च न्यायालयाने त्या निकालपत्रात म्हटले आहे.

**2018 मध्ये दाखल करण्यात आलेला गुन्हा रद्द**

मार्च 2018 मध्ये पोलीस ठाण्यामध्ये व्हिडिओ रेकॉर्डिंग केल्याप्रकरणी रवींद्र उपाध्याय नावाच्या व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सरकारी गोपनीयता कायद्यांतर्गत या कारवाईचा बडगा उगारण्यात आला होता.

चार वर्षानंतर म्हणजेच , ऑक्टोबर 2022 मध्ये, तो गुन्हा रद्द करण्यात आला. या प्रकरणी पोलिसांनी केलेल्या कारवाईवर उच्च न्यायालयात प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले होते. त्याची गंभीर दखल न्यायमूर्ती मनीषा पीटाळे आणि न्यायमूर्ती वाल्मीकी मेनेजेस यांच्या खंडपीठाने घेतली होती.

**पोलीस ठाण्यातील रेकॉर्डिंग गुन्हा नाही**

पोलीस ठाण्याचा सरकारी गोपनीयता कायदाखाली निश्चित केलेल्या निश्चित ठिकाणांमध्ये समावेशच होत नाही. त्यामुळे पोलीस ठाण्यात केले गेलेले व्हिडिओ रेकॉर्डिंग गुन्हा म्हणता येणार नाही, असे खंडपीठाने निकाल पत्रात नमूद केले .

उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सरकारी गोपनीयता कायद्यामधील कलम तीन आणि दोन (८) या कलमांचा हवाला दिला आहे. ही दोन्ही कलमे निषिद्ध ठिकाणी हेरगिरी करण्याशी संबंधित आहेत.

दोन्ही कलमांचा विचार करता अर्जदार रवींद्र उपाध्यायविरुद्ध पोलिसांनी दाखल केलेला गुन्हा वैध मानता येणार नाही, असेही नागपूर खंडपीठाने स्पष्ट केले.

**काय होते प्रकरण?**

पोलीस तक्रारीनुसार, उपाध्याय हे त्यांच्या शेजाऱ्यासोबत झालेल्या वादात पत्नीसह वर्धा पोलीस ठाण्यात गेला होते. त्यावेळी त्याने तक्रार नोंदवतानाच पोलीस ठाण्यातील चर्चेचे व्हिडिओ रेकॉर्डिंग केले होते.

या प्रकरणी पोलिसांनी त्यांच्या विरोधात गुन्हा नोंदवत नंतर आरोपपत्रही दाखल केले होते. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने ही कारवाई चुकीची ठरवत अर्जदार रवींद्र उपाध्याय यांना मोठा दिलासा दिला .

**पारदर्शकतेसाठी कुणीही 'व्हिडिओ रेकॉर्डिंग' करू शकते**

सर्वसामान्य नागरिक तक्रार देण्यास गेल्यास पोलीस ठाण्यातील कर्मचारी तासनतास बसवून ठेवतात. काहीही कारणं सांगून तक्रार घेण्यास टाळाटाळ करतात, अशा सामान्य नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत.

पोलिसांकडून विनाकारण धमकावणे, लाचेची मागणी होत असल्याचेही बोलले जाते.दरम्यान, याबाबत कुणी 'व्हिडिओ रेकॉर्डिंग' करत असेल त्यांना गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली जाते. 'रेकॉर्डिंग' करण्यास मज्जाव केला जातो.

'रेकॉर्डिंग' करतो म्हणून पोलीस फोनही जप्त करतात. मात्र पारदर्शकतेसाठी कुणीही 'व्हिडिओ रेकॉर्डिंग' करू शकते, असे तत्कालीन नागपूर पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी जून २०२३ मध्ये एका व्हिडीओदवारे स्पष्ट केले होते.

ते पुढे म्हणाले व्हिडिओ रेकॉर्डिंग करताना फक्त महिला कर्मचाऱ्यांची मानहानी होणार नाही, त्यांच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचणार नाही याची काळजी घ्यावी. अन्यथा, पोलीस ठाण्यात, रस्त्यावर कर्मचारी काम करताना कुणीही 'व्हिडिओ रेकॉर्डिंग' करू शकतात. त्याला पोलीस कर्मचारी, अधिकाऱ्यांकडून आक्षेप घेता कामा नये, अशी स्पष्ट सूचना त्यांनी त्यावेळी दिली होती.

●●●●●●●

# 'लाडक्या' बहिणी आणि 'सुज्ञ' मतदारांचा करिष्मा!

प्रदीप व्ही. खोलमकर
नाशिक. ८७६७५९२९८०

शनिवार दि. २३ रोजी विधानसभा निवडणुकीची मतमोजणी पार पडली; आणि बहुचर्चित निवडणुकीची सांगता झाली.

एक्झिट पोल्स, राजकीय विश्लेषक आणि सर्वसामान्य माणसाचा अंदाज 'महायुती' १६०ते १६५ जागा जिंकून सरकार स्थापन करेल, असा होता. परंतु, २०१४ च्या मोदी लाटेपेक्षाही फडणवीस नावाची मोठी 'त्सुनामी' महाराष्ट्रात आली; आणि 'द्विशतका'च्या पुढेही गेली. यात 'मविआ' वाहून गेली.

सुरुवातीला 'महायुती' आणि 'मविआ'मध्ये 'कांटेकी टक्कर' होईल, तसेच मनसे, तिसरी आघाडी आणि जरांगे फॅक्टरचाही प्रभाव पडेल, असे सर्वांनाच वाटत होते. पण, 'लाडक्या' बहिणी आणि 'सुज्ञ' मतदारांनी या सर्व शक्यतांना फाटा दिला. शतकाच्या पुढे एका पक्षाचे आमदार निवडून आणण्याची 'हॅटट्रिक' करून भाजप हा आजपर्यंतचा एकमेव पक्ष ठरला आहे.

'महायुती'च्या या 'ऐतिहासिक' विजयाचे थोडक्यात विश्लेषण करायचे झाल्यास, याचे श्रेय राज्यातील 'लाडक्या' बहिणी आणि 'सुज्ञ' मतदारांना द्यावे लागेल. तसेच, 'महायुती'ने अडिच वर्षांतील केलेली विकासकामे, एकनाथ शिंदे, अजित पवार आणि विशेषतः आधुनिक अभिमन्यू देवेंद्र फडणवीस यांनी दाखवलेला संयम, सहनशिलता हे मुद्देही लक्षात घ्यावे लागतील.

योगिराज यांनी दिलेला 'बटेंगे तो कटेंगे' आणि मोदी यांनी दिलेला 'एक है तो सेफ है' या नाऱ्यांमुळे हिंदूची मते वळविण्यात भाजप १००% यशस्वी ठरला, हे नाकारून चालणार नाही.

लोकसभेत फेक नॅरेटिव्हमुळे मिळालेल्या यशामुळे 'मविआ'ला प्रचंड अहंकार झाला होता. विधानसभेत आपलाच विजय होईल, अशी भोळीभाबडी आशा उराशी बाळगून, तिन्ही पक्षांचे नेते 'मुर्खांच्या नंदनवनात फिरत' होते. त्याचाच परिणाम म्हणून 'मविआ'चा आश्चर्यजनक 'लाजिरवाणा' पराभव झाला.

मोदी, शहा, फडणवीस आणि भाजपद्वेषाची काविळ झालेला सकाळचा भोंगा नेहमीप्रमाणेच तोंडावर आपटला. '१६५ ते १७० जागा जिंकून आम्ही सरकार स्थापन करूच. पण, ६ महिन्यांत मोदींचे सरकारही डळमळीत होईल' अशी निरर्थक फुशारकी मारणा-या राऊताला 'सूज्ञ' मतदारांनी चांगलीच झणझणीत चपराक मारली आहे. एवढे होऊनही सुधारेल तो राऊत कसला?

म्हणतात ना 'निर्लज्जम सदासुखी' किंवा 'कुत्र्याचे शेपूट वाकडे ते वाकडेच' किंवा 'कोल्ह्याला द्राक्षे आंबटच' या युक्तीप्रमाणे या बेलघेवड्याने जुनाच ईव्हीएमचा रडीचा मुद्दा उपस्थित करुन फेर निवडणुकीची अशक्य मागणी केली आहे. तसेच, मोदी, शहा आणि अदाणी यांनी हा निकाल ठरवून लावला आहे, असे नसलेल्या अकलेचे तारेही या अतिविद्वान संपादकाने (?) तोडले आहेत.

झारखंड मध्येही निवडणूक झाली. तेथे भाजपला अपेक्षित यश मिळाले नाही. तेथे ईव्हीएमचा प्रश्न का उपस्थित केला नाही?

उध्दव ठाकरे म्हणाले की, 'मला महाराष्ट्राने साथ का दिली नाही'? हे तपासावे लागेल. त्यांना सांगावेसे वाटते की, डोके खाजून मेंदूला (असेल तर) ताण देण्याची गरज नाही. लोकसभेच्या अनपेक्षित विजयाचा अहंकार, सकाळच्या भोंग्याचा अपप्रचार आणि गेल्या ३ वर्षांपासून 'माझा बाप, पक्ष, चिन्ह चोरले आणि गद्दार, खोके, खालच्या पातळीवर केलेली टीका, टोमणे, खोचक बोलणे, त्याच त्या 'अर्थहीन' बाळबोध आणि हास्यास्पद शब्दांच्या कोट्या.

मुख्यमंत्री असताना अधिकार आणि कायद्याचा गैरवापर करत, सर्वसामान्य माणसाला वेठीस धरण्यासाठी केलेली 'हुकुमशाही', कोरोना काळात 'प्रेतावरच्या टाळूवरचे लोणी खाणारा भ्रष्टाचार', बारामतीच्या 'करामती' काकाला हाताशी धरून शिंदे सरकार पाडण्यासाठी जरांगे नावाचे उभे केलेले बुजगावणे जनता विसरली नाही.

तुम्हाला 'स्मृतिभ्रंश' झाल्याने तुम्ही विसरला असाल. कदाचित विसरण्याचे नाटकही केले असेल पण, आम्ही जनता ते विसरलो नव्हतो. सगळ्यात महत्वाचे म्हणजे, तुम्ही स्वतःच्या आणि मुलाच्या स्वाथार्साठी बापाच्या विचारांना तिलांजली देत, आमच्या कौलाचा अनादर करत, आमच्या पाठीत 'कायम खंजीर खुपसणाऱ्याकडून' खंजीर खुपसला, याचे खुप वाईट वाटले.

तुम्हाला धडा शिकवण्याची आम्ही वाटच बघत होतो. आणि आम्ही 'सुज्ञ' मतदारांनी ती संधी साधली. आश्चर्य याचे वाटते की, महाराष्ट्राशी एवढी गद्दारी करून पुन्हा मतांची भीक मागण्याचा 'बेशरमपणा' दाखवलाच कसा? जनाची नाही तर मनाचीही काही वाटली नाही?

'एकतर मी राहील, नाहीतर तू' असे आव्हान तुम्ही मोठ्या गुर्मीत फडणविसांना दिले होते. त्याचे उत्तर तुम्हाला कायमचे घरी बसवून मतदारांनी दिले आहे. आता संजय राऊत याला समजावून सांगा की, 'शरद पवारांना समजायला १०० जन्म घ्यावे लागतील' असे त्याचे म्हणणे आहे. पण, 'देवेंद्र फडणविसांना समजायला तुम्हाला आयुष्यही कमी पडेल'. असे त्याला सांगा. आणि २५ वषार्चे सत्तेचे स्वप्न पाहणाऱ्या राऊताला आता फुकटची खासदारकीही मिळणार नाही.

हे सगळे घडले केवळ अहंकार आणि स्वसार्थ यामुळे. अजूनही वेळ गेलेली नाही. अहंकार आणि स्वसार्थ सोडून जनतेचा विचार केला नाही, तर कायमचे दुकान बंद झालेच म्हणून समजा. बघुया तिन्ही पक्ष यातून काही बोध घेतात का? की 'पालथ्या घड्यावर पाणीच पडते'.

●●●●●●●●●

# अस्थमावर उपचार का नाहीत?

अस्थमा हा फुफ्फुसाचा आजार असून त्याच्यावर कोणताही उपचार नाही.या आजाराला केवळ नियंत्रणात ठेवणे आपल्या हातात असते. एकदा हा आजार वाढला की तो आयुष्यभर आपला पिच्छा सोडत नाही.

जगभरात अस्थमाचे 26.2 कोटी रुग्ण आहेत. अनेक दशकांहून जुना असलेला हा आजार अमेरिकेपासून भारत आणि दक्षिण आफ्रीकेत पसरलेला आहे. या आजारावर कोणताही उपचार नाही. जसा मधुमेह कधी बरा होत नाही. अशाच प्रकारे अस्थमा हा केवळ नियंत्रणात ठेवता येऊ शकतो त्यावर उपचार नाहीत. वाढत्या वयाबरोबर हा आजार गंभीर होत असतो. अनेक गंभीर प्रकरणात हा मृत्यूचे कारण ठरु शकतो.



अस्थमा हा आजार लहान मुलांमध्ये जास्त पाहायला मिळतो असे दिल्लीच्या जीटीबी हॉस्पिटलमध्ये मेडिसिन विभागाचे डॉ. अजित कुमार सांगतात. ज्येष्ठांना देखील हा आजार होतो. एकदा का हा आजार झाला की तो आयुष्यभर बरा होत नाही, अस्थमा हा एक गंभीर आजार आहे. यात अनेक प्रकारच्या पेशी, प्रोटीन आणि हार्मोन्सचा समावेश असतो. एलर्जिक अस्थमा, नॉन-एलर्जिक अस्थमा सवार्साठी वेगवेगळे उपचार प्रणाली आहेत. एलजीर्मुळे होणा?्या या आजारासाठी कोणतेही एक असे औषधही तयार झालेले नाही जे या आजाराला संपूर्ण बरे करु शकेल.

**नियंत्रित करणे सोपे**

अस्थमावर कोणताही उपचार नसला तरी त्याला सहज नियंत्रणात ठेवता येऊ शकते असे डॉ. अजित सांगतात.यासाठी इन्हेलर्स कॉर्टिकोस्टेरॉईड्स आणि इम्युनोथेरपीसारखी औषधे आहेत. इन्हेलर्स श्वासनिलिकेतील सूज कमी करतात आणि अस्थमाची लक्षणे कमी करतात.

इम्युनोथेरपीच्या मदतीने इम्युनिटीला चांगले करता येते. ज्यामुळे रुग्णाला या आजाराशी लढता येते. अस्थमाचा आजार सुरुवातीलाच ओळखता आला तर चांगले असते. कारण जण लक्षणे बिघडली तर या आजाराला नियंत्रित करणे खूपच कठीण होऊ शकते.

अस्थमा आजाराला सुरुवातीलाच ओळखण्यासाठी तुम्हाला त्याच्या लक्षणांची माहिती असायला हवी. जर तुम्हाला जास्त खोकला येत असेल, सारखा-सारखा खोकला होत असेल, खोकताना श्वास घ्यायला त्रास होत असेल, खोकला आणि छातीत घरघर होत असेल किंवा छातीत अखडल्यासारखे वाटत असेल तर ही अस्थमाची सुरुवातीची लक्षणे असू शकतात.

जर तुम्हाला यापैकी काही लक्षणे दिसत असतील तर लागलीच डॉक्टराची भेट घ्या. डॉक्टर फुफ्फुसाची तपासणी करुन अस्थमाला ओळखू शकतात. तसेच डॉक्टर रक्ताची चाचणी करुनही अस्थमाची तपासणी करु शकतात.

●●●●●●●●●

# न्यायालयाचे आदेश डावलणारी राजकीय बॅनरबाजी!

शहरे आणि गावांत नाक्यानाक्यांवर लावण्यात येणाऱ्या बेकायदेशीर होर्डिंग्समुळे शहरांचे आणि गावांचे विद्रुपीकरण होत असल्याचे उच्च न्यायालयाने प्रशासनाच्या वेळोवेळी लक्षात आणून दिले आहे.

विधानसभेचा निकाल लागल्यानंतर विजयी उमेदवारांचे अभिनंदन करणाऱ्या होर्डिंग्स सर्वत्र लावण्यात येतील हे लक्षात घेऊनच उच्च न्यायालयाने राज्य सरकार, महापालिका, नगर परिषद आणि पोलिसांना सतर्क राहून कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश निवडणुकीचा निकाल लागण्यापूर्वीच दिले होते.

न्यायालयाच्या निर्देशांचे पालन न केल्यास त्यास युडीडीचे प्रधान सचिव, पालिका आयुक्त, नगर पालिका प्रशासनाचे संचालक, जिल्हाधिकारी, पोलीस आस्थापना, मुख्य कार्यकारी अधिकारी वैयक्तिकरित्या जबाबदार असतील असेही न्यायालयाने बजावले आहे.

असे असतानाही निवडणूक निकालानंतर त्याच रात्री सर्वत्र विजयी उमेदवारांचे अभिनंदन करणारे होर्डिंग्स शहरासह गावागावांत दिसून आले. यातील बरेचसे होर्डिंग्स हे विजयी झालेल्या उमेदवाराने किंवा राजकीय पक्षाने स्वतः लावलेले नाहीत, तर त्यांच्या हितचिंतकांनी अभिनंदन करण्यासाठी स्वखर्चाने लावले आहेत असे होर्डिंग्सवरील शुभेच्छुकांची नावे आणि चेहरे यावरून दिसून येत असले तरी प्रत्यक्षात ते कोणाकडून प्रायोजित केले जातात हे सर्वांनाच ठाऊक आहे.



जगन घाणेकर
घाटकोपर, मुंबई.
९६६४५५९७८०

निवडणुकीमध्ये बहुमताने निवडून देऊन जनतेने त्यांचे प्रतिनिधी निवडले आहेत; मात्र विजयाच्या उन्मादात न्यायालयाच्या आदेशांनाच डावलले जात असेल, तर ही मंडळी आपल्या कार्यकाळात कायद्याचा योग्य तो मान ठेवतील का अशी शंका येते.

निवडून आलेले लोकप्रतिनिधी जसे आनंदात असतात तसे त्यांचे शब्द झेलणारे, यांच्यावर प्रेम करणारे आणि त्यांच्या शब्दाखातर काहीही करण्याची तयारी असणारे त्यांचे कार्यकर्तेही आनंदात असतात. या आनंदाच्या भरात लावण्यात आलेल्या होर्डिंग्सबर कारवाई करणे म्हणजे त्यांच्या रोषाला सामोरे जाणे हे प्रशासकीय अधिकाऱ्यांनाही माहित असल्याने हे सर्व अनधिकृत आहे आणि त्यावर कारवाई करण्याचे न्यायालयाचे आदेश आहेत हे माहित असतानाही कोणीही त्यावर कारवाई करण्यास धजावत नाहीत.

काहीनाकाही निमित्त साधून राजकीय पक्षांकडून नाक्या-नाक्यांवर होर्डींग्स, बॅनर्स आणि फलक लावणे आता नित्याचे झाले आहे. केवळ शहरांतच नव्हे तर ग्रामीण भागातही ही क्रेझ आज कायम आहे. पालिका प्रशासन, नगर परिषदा एकीकडे नगर-शहरांचे आणि गावांचे सौंदर्य वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहेत, तर दुसरीकडे रस्त्यांवर होर्डिंग्स लावून परिसर बकाल करण्यामध्ये राजकीय पक्षांत चढाओढ लागलेली आहे.

मुंबई विद्रूप करणाऱ्या राजकीय बॅनरबाजीवर थेट उच्च न्यायालयानेच बंदी घातली आहे. तरीही बॅनरबाजी करणाऱ्या मंडळींवर तिळमात्र फरक पडलेला नाही. सण, उत्सव जवळ आले कि ही बॅनरबाजी जोमात असते. नाक्यांवर लावण्यात येणारे बहुतांश होर्डिंग्स आणि बॅनर्स विनापरवाना लावलेले असतात. पुढाऱ्यांतील कलह आणि राजकीय पक्षांतील वादही बऱ्याचदा या बॅनरबाजीतून चव्हाट्यावर आणले जातात. त्यांना उत्तर देण्यासाठी पुन्हा दुसऱ्या पक्षाकडून बॅनरबाजी केली जाते. अनधिकृतपणे केलेल्या बॅनरबाजीवर सुद्धा अनेकदा राजकीय मंडळींकडून अधिकार दाखवले जातात.

अनधिकृत होर्डिंग्स आणि बॅनर यांवर कारवाई करण्यासाठी गेलेल्या पालिका कर्मचाऱ्यांना पक्षाच्या कार्यकर्त्यांकडून मारहाण झाल्याचे प्रसंगही मुंबईत अनेकदा घडले आहेत त्यामुळे न्यायालयाचे आदेश असूनही अशा अनधिकृत बॅनरबाजीवर कारवाई करताना पालिका कर्मचाऱ्यांवर बंधने येतात.

आपल्या पक्षाचे होर्डिंग काढून त्याजागी दुसऱ्या पक्षाने होर्डिंग लावले म्हणूनही कार्यकर्त्यांमध्ये भांडणे आणि मारामाऱ्या होतात. ज्याचा ताण विनाकारण पोलीस प्रशासनावर पडतो. सण-उत्सवांव्यतिरिक्त राजकीय पुढाऱ्यांचे, पदाधिकाऱ्यांचे आणि कार्यकर्त्यांचे वाढदिवस, विवाहसोहळे यानिमित्तानेही बॅनरबाजी सुरूच असते.

परिसरात कोणी मंत्री, राजकीय पुढारी, महनीय व्यक्ती येणार असेल तेव्हा प्रमख रस्त्यापासून समस्त परिसर होर्डिंग्स आणि बॅनर्सने भरला होतो. या बॅनरबाजीमुळे शहराचे विद्रुपीकरण होत आहे, न्यायालयाकडून त्यावर वेळोवेळी ताशेरे ओढले जात आहेत याबाबत राजकीय नेतेमंडळींना पूर्णपणे कल्पना असूनही कोणताही राजकीय नेता आपल्या कार्यकर्त्यांना अशी बॅनरबाजी न करण्याबाबत सांगत नाही. त्यामुळे ही पोस्टरबाजी थांबणार तरी केव्हा असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण झाला आहे.

●●●●●●●●●

## अशोकायन

### संशयात्मा..!

**निकाल असा कसा लागला**
**विश्वास बसत नाही गडे**
**अपयशाचं खापर कुणाच्या**
**तरी डोक्यावर फोडू गडे ..**

**एवढे तुम्ही तर्कतीर्थ तरी**
**जनता कां बरं नाकारते**
**निष्पक्ष चिंतन केलं तर**
**उत्तर सापडेल गडे..!**

**इतरांना वठणीवर आणण्याचा**
**तुम्ही घेतलाय ठेका**
**पण स्वमध्ये बदल करण्याचा**
**कधी विचार नाही केला..**



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



# आस वळीवाची...

असे बरसते ऊन
तृणही न राहिले एक
भेगाळल्या या धरेचे
क्लांत निःश्वास ऐक
रे घना आता
विलंब नको पळाचा
नभी दाटून कुंभ
वर्षाव हो वळीवाचा

# कॅलिडोस्कोप

## टेस्लाची कार बदलली बैलगाडीत!

एका व्यक्तीने चक्क ४० लाख रुपये किमतीची टेस्ला कंपनीची कार बैलगाडीमध्ये बदलली आहे. 'टेस्ला'ची कार जगभरामध्ये चर्चेत आहे. या कारला तिच्या फीचर्समुळे जगभर पसंती दिली जाते, तसेच या गाडीला खूप मागणी आहे; पण आता चीनमधील एक व्यक्ती याच टेस्ला कारवर इतकी नाराज झाली, की त्याने टेस्लाच्या कारचे बैलगाडीत रूपांतर केले.

चीनमधील एका व्यक्तीने सेकंड हँड टेस्ला मॉडेल ३ विकत घेतले. तिची किंमत १०१,००० युआन (११ लाख रुपये) आहे; परंतु ती खरेदी केल्यानंतर त्याला समजले की, ते चार्ज करणे शक्य नाही. त्याच्या या तक्रारीवर कोणताही तोडगा न निघाल्याने त्याने संतप्त होऊन बैलासह गाडी



ओढून निषेध केला. चीनमधील टेस्लाच्या अधिकृत वेबसाइटनुसार, चीनमध्ये या मॉडेलची सध्याची किंमत ३३५,९०० युआन (सुमारे ४० लाख रुपये) पासून सुरू होते. कार घेतल्यानंतर, जेव्हा ती व्यक्ती गाडी चालवत होती, तेव्हा त्याला समजले की, कारमध्ये काही समस्या आहे. त्यामुळे ती चार्ज होऊ शकली नाही. गुआजी नावाच्या कंपनीच्या मदतीने या व्यक्तीने कार खरेदी केली होती. गुआजीने २३ ऑक्टोबर रोजी एक अधिकृत निवेदन जारी केले की कार विकणारा एक कार डीलर होता आणि त्याने सुमारे ३० वेळा हीच कार विक्री आणि खरेदी केली होती.

## हनीट्रॅपच्या माध्यमातून एडस्!

आजकाल हनी ट्रॅपच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. त्याच्या जाळ्यात अनेक तरुण-तरुणी अडकले. नुकतीच उत्तराखंडमधून एक धक्कादायक बातमी समोर आली. ड्रग्जच्या आहारी गेलेल्या प्रियकरासह एकूण २० जण एचआयव्ही पॉझिटिव्ह झाले. हा प्रकार उघड झाल्याने खळबळ उडाली आहे.



उत्तराखंडमधील नैनिताल जिल्ह्यातील रामनगर भागात ही घटना उघडकीस आली. अवघ्या पाच महिन्यांमध्ये १९ जणांना एचआयव्हीची लागण झाल्याचे आढळून आले. मिळालेल्या माहितीनुसार, गुलरघाटी परिसरातील १७ वर्षीय तरुणीला अंमली पदार्थांचे व्यसन होते. ती ड्रग्ससाठी हतबल व्हायची तेव्हा ती मुलांना बोलावायची. तिच्या संपर्कामुळे अनेक मुलांना एचआयव्हीची लागण झाली. यामध्ये १५ महिलांचा समावेश असल्याचे सांगण्यात येत आहे.

नैनिताल जिल्ह्यामध्ये एचआयव्ही पॉझिटिव्ह प्रकरणे वाढत आहेत आणि रामनगर सर्वात वाईट आहे. रामनगरमध्ये १७ महिन्यांत ४५ लोक एचआयव्ही पॉझिटिव्ह आढळले. एप्रिल ते ऑक्टोबर या कालावधीत १९ जणांना एचआयव्हीची लागण झाली आहे. यामध्ये ३० पुरुष आणि १५ महिलांचा समावेश आहे. ३० पुरुषांपैकी २० तरुणांना सिडिक पदार्थ सेवन केलेल्या आईच्या संपर्कात आल्याने संसर्ग झाला होता. मिळालेल्या माहितीनुसार, रामनगर येथे राहणारी अल्पवयीन मुलगी सिडयुक्त पदार्थ प्राशन करून शहरातील कोणत्याही गल्लीबोळात बिनधास्तपणे फिरताना दिसत आहे. ड्रग्जसाठी पैसे गोळा करण्यासाठी तिने लोकांना आमिष दाखवून शरीरसंबंध करायला लावले.

## डेटवर जाणे पडले महागात!

गाझियाबादमधील एक तरुण डेटवर गेल्यावर फसवणुकीचा बळी ठरला आहे. एका व्यक्तीने सांगितले, की तो डेटला जाणार होता. मेसेजमध्ये त्याला कौशांबी या मेट्रो स्टेशनवर भेटायला बोलावले. मात्र तिथे त्याच्यासोबत असे काही घडले, ज्यामुळे त्याचा जीव धोक्यात आला. स्टेशनवरून त्या व्यक्तीला कौशांबी हॉटेलच्या पहिल्या मजल्यावर असलेल्या टायगर कॅफेमध्ये नेण्यात आले. कॅफेमध्ये पोहोचल्यावर, त्या



कनेक्टिव्हिटी होती ना कोणताही साइनबोर्ड. परिस्थिती गडबड असल्याचे लक्षात येताच त्याने ताबडतोब त्याचे लाईव्ह लोकेशन आपल्या मित्रासोबत शेअर केले आणि मेसेजद्वारे संपूर्ण परिस्थिती सांगितली. नंतर कॅफेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्यासमोर १६,४०० रुपयांचे बिल ठेवले. जे मुलीने ऑर्डर केलेल्या कोल्ड्रिंकचे बिल होते. त्यासाठी त्याने नकार दिल्याने कर्मचाऱ्यांनी त्याला बाहेर जाण्यापासून रोखले आणि जबरदस्तीने ५० हजार रुपयांची मागणी केली. चांगली गोष्ट म्हणजे त्याने सर्व परिस्थिती आपल्या मित्राला सांगितली होती. त्यामुळे त्याच्या मित्राने पोलिसांशी संपर्क साधला आणि लगेच कारवाई करण्यात आली. या कारवाईत डेटिंग घोटाळ्यात सहभागी असलेल्या एका गटाचा पर्दाफाश करण्यात आला. त्यांनी वेगवेगळ्या डेटिंग ॲप्सवर प्रोफाइल तयार केले होते. ती अज्ञात पुरुषांना टायगर कॅफेमध्ये घेऊन जायची, जिथे त्यांच्याकडून खाण्यापिण्यासाठी मोठ्या प्रमाणात पैसे आकारले जात होते. यानंतर संपूर्ण रक्कम भरेपर्यंत लोकांना ओलीस ठेवण्यात येत होते.

## इथे आहेत मृतदेह आणि ममी

एखाद्या संग्रहालयात गेल्यावर ममी आणि मृतदेहांचं प्रदर्शन बघायला मिळालं तर? इटलीतल्या सिलसिली या बेटावरच्या पालेर्मो कॅपुचिन संग्रहालयात ममी आणि मृतदेहांचा संग्रह करण्यात आला आहे. त्यामुळे या संग्रहालयात जरा जपूनच पाऊल ठेवायला हवं. इथे आठ हजार मृतदेह आणि १२५२ ममी आहेत. सोळाव्या शतकात



ख्रिस्ती भिक्षूकांनी या परिसरात मृतदेह पुरण्याचं तसंच ममी तयार करण्याचं काम सुरू केलं होतं. आज जिथे संग्रहालय आहे. त्याचं रूपांतर संग्रहालयात करण्यात आलं. या मृतदेहांना ममीच्या माध्यमातून सुरक्षित ठेवण्यात आलं. १९२० पासून या भागात मृतदेह पुरण्याचं काम बंद करण्यात आलं आणि संग्रहालयाच्या निर्मितीला वेग आला. या विचित्र संग्रहालयाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी ख्रिस्ती भिक्षुकांकडेच आहे. यातल्या काही ममी पूर्ण अवस्थेत आहेत तर काहींची अवस्था बिकट झाली आहे. इजिप्तमधल्या ममी खूप प्रसिद्ध आहेत. मात्र ममी हा शब्द अरबी भाषेतल्या मुमियापासून तयार झाला आहे. मुमिया म्हणजे मेणाच्या लेपात सुरक्षित ठेवण्यात आलेल्या चीजवस्तू. ममी तयार करण्यासाठी ७० दिवसांचा कालावधी लागतो. अशा या वस्तूसंग्रहालयात पर्यटकांना थरारक अनुभव घेता येईल हे नक्की.



## पेट्रोल टँकरचा गाईंच्या तस्करीसाठी वापर

गाय तस्करांनी गाईंची तस्करी करण्यासाठी पेट्रोल टँकरचा वापर केला आणि त्यात गायी नेण्यास सुरुवात केली. ही माहिती मिळताच बुलडोझरने कंटेनर फोडला असता लोकांना धक्का बसला. पेट्रोलच्या टँकरमधून गायींची वाहतूक केली जात होती. या ट्रकच्या मागील बाजूस एक पेट्रोल कंटेनर जोडला आहे. तो पाहिल्यानंतर कोणालाही वाटेल, की या ट्रकमधून पेट्रोल किंवा डिझेलचा पुरवठा होत आहे; पण याठिकाणी गाय तस्करांनी गाईची बेकायदेशीर वाहतूक करण्यासाठी पेट्रोल कंटेनरमध्ये त्यांना भरले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर फोडण्यात आले. आतील गायी पाहून लोक हैराण झाले. बुलडोझरच्या सहाय्याने कंटेनर तोडून गायींची सुटका करण्यात आली. बुलडोझरने कंटेनर फोडताच त्यामध्ये गायींचा कळप होता. त्यांना जबरदस्तीने बांधून घेऊन जात होते. डब्यात ज्या पद्धतीने गायी लपवून ठेवण्यात आल्या आहेत, त्यानुसार हे गोवंश तस्करीचे प्रकरण असून त्याबद्दल लोकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पोलिसांनी आरोपींची नावे उघड करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## बिनची कमाल

चीनमधला एक धावपटू बेई बिन याने अनोखा विक्रम केला. त्याने उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यंतचं २४,११० किलोमीटरचं अंतर धावून पूर्ण केलं. म्हणजे तो अंटार्टिका खंडातून आर्टिक खंडात पोहोचला. हे अंतर त्याने ४३३ दिवसांमध्ये पूर्ण केलं. बेई प्रत्येक दिवशी सरासरी ५६ किलोमीटर अंतर धावला. २४,११० किलोमीटर अंतर म्हणजे ४२ किलोमीटरच्या ५७४ मॅरेथॉन स्पर्धांमध्ये धावणं! या काळात बेई बिन १३ देशांमधल्या ६५ शहरांमधून धावला. यात अमेरिका, कॅनडा, चिली, मेक्सिको, ग्वाटेमाला, कोस्टरिका, अर्जेंटिना, पेरूसारख्या देशांचा समावेश आहे. या धावपटूने मार्च २०१८ मध्ये या प्रवासाला सुरूवात केली. या दरम्यान त्याला निसर्गाच्या आव्हानाला सामोरं जावं लागलं. काही ठिकाणी तापमान उणे दहा अंशांपर्यंत तर काही ठिकाणी ४० ते ४५ अंश सेल्सियस होतं. मात्र प्रतिकूल परिस्थितीतही त्याने हार मानली नाही. एवढा लांबचा पल्ला गाठण्याची तयारी त्याने तीन वर्षांपूर्वीपासूनच सुरू केली. २०११ मध्ये त्याने दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. त्यामुळे दोन ध्रुवांमधलं अंतरही यशस्वीपणे पार करण्याचा विश्वास त्याला होता. या धावेच्या तयारीसाठी बिनने दररोज ६० ते ७० किलोमीटर धावायचं ठरवलं. दोन ध्रुवांमधलं हे अंतर पार करण्यासाठी बिन पहाटे पाच वाजता धावायला सुरूवात करायचा. थोडी फार विश्रांती घेत तो रात्री ९ वाजेपर्यंत धावायचा. बिनने याआधीही धावण्याचा विक्रम केला आहे. २०११ मध्ये त्याने १५० दिवसांमध्ये दहा हजार किलोमीटरचं अंतर पार केलं होतं. अशा या विक्रमवीर बिनचं कौतुक करावं तेवढं कमी आहे.



## चुकीची पोस्ट केली तर...

सोशल मीडियावर बरीच आक्षेपार्ह विधानं केली जातात. समाजात फूट पाडणाऱ्या पोस्ट्स केल्या जातात. त्यावर अंकुश लावण्यासाठी बरेच प्रयत्न होतात. मात्र ऑस्ट्रिया सरकारने या प्रकरणी दोषी आढळणाऱ्यांना वेगळीच शिक्षा देण्याचं ठरवलं आहे. दोषी लोकांना न्यू आर्ट या एनजीओतर्फे सुरू करण्यात आलेला सहा महिन्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करावा लागणार आहे. २०१८ मध्ये ७३ लोकांनी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. 'डायलॉग इन्स्टेड ऑफ हेट' या नावाचा हा अभ्यासक्रम आहे. पुढच्या दोन महिन्यांमध्ये हा अभ्यासक्रम संपूर्ण देशभरात सक्तीचा करण्यात येणार आहे. चुकीच्या पोस्ट्स प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांविरोधात कोर्टात खटले चालवण्याऐवजी हा अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा मार्ग अवलंबण्यात आला आहे. ऑस्ट्रियातल्या राजकीय पक्षाच्या एका नेत्यालाही या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा लागला. या नेत्याने देशातल्या शरणार्थींविरोधात चुकीचं विधान केलं होतं. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लोकांचे विचार बदलतील आणि ते विवेकी मार्गाने वाटचाल करतील अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.





## हे आहेत नवे विद्यार्थी

महाराष्ट्रात मराठी शाळा बंद पडत आहेत. प्रादेशिक भाषेतल्या शाळांचीही हीच अवस्था आहे. शाळा वाचवण्यासाठी, विद्यार्थीसंख्या वाढवण्यासाठी बरेच प्रयत्न केले जातात. फ्रान्समध्येही एक शाळा वाचवण्यासाठी भन्नाट उपाय करण्यात आला. या देशातल्या क्रेत्स ऑन बेलडॉन नावाच्या शहरातली ही एक प्राथमिक शाळा आहे. शाळेत फक्त २६१ विद्यार्थी शिक्षण घेत असून इथले काही कक्ष बंद होण्याच्या मार्गावर आहेत. काही पालकांनी शाळेतल्या मुलांच्या घटत्या संख्येबद्दल तक्रारही केली होती. त्यानंतर विद्यार्थीभरतीची मोहीम हाती घेण्यात आली. आता हे नवे विद्यार्थी कोण आहेत, हे जाणून घेतल्यावर तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसेल. या शाळेत मेंढ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. १५ मेंढ्या या शाळेतल्या वर्गांमध्ये बसणार आहेत. या शहराची लोकसंख्या फक्त चार हजार असल्यामुळे शाळेतल्या विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. शाळेतल्या प्रवेशासाठी स्थानिक मेंढपाळाने मेंढ्या पुरवल्या आहेत. या मेंढ्यांचा जन्मदाखलाही शाळेत सादर करण्यात आला. या मेंढ्यांच्या शाळेतल्या प्रवेशासाठी एक पालक गेल लावेल यांनी पुढाकार घेतला होता. या शाळेत ११ इयत्ता आहेत. इयत्तांची संख्या १० करण्याला त्यांचा विरोध होता. यामुळे प्रत्येक वर्गात २४ ते २६ मुलं बसतील. मुलांची संख्या वाढली की त्यांच्याकडे लक्ष देता येणार नाही, असा आक्षेप गेल यांनी घेतला होता.

## सबकुछ महिला!

महिलांनी सर्वच क्षेत्रात बाजी मारली असली तरी ठराविक कामांमध्ये पुरुषांची मक्तेदारी पहायला मिळते. बांधकाम व्यवसायात आजही महिलांचं प्रमाण खूप कमी आहे. त्यातही महिला रंगकाम, सुतारकाम, गवंडीकाम करत नाहीत. मात्र केरळमधल्या महिलांनी या क्षेत्रातही मुसंडी मारली आहे. काही महिलांनी एकत्र येऊन ऑल वूमन कंस्ट्रक्शन कंपनी स्थापन केली असून या कंपनीतली प्रत्येक जबाबदारी महिलांच्या खांद्यांवर आहे. ३० महिलांनी एकत्र येऊन पिंक लॅडर नावाची कंपनी सुरू केली. पिंक लॅडरला कॉंट्रॅक्ट दिलं की सर्व महिला कामाला लागतात. बांधकामाच्या साईटवर सर्व महिला काम करताना दिसतात. १ नोव्हेंबर २०१८ या



दिवशी पिंक लॅडरची सुरूवात झाली. आत्तापर्यंत त्यांनी दोन घरांचं बांधकाम केलं आहे. इतर तीन घरांचं कामही पिंक लॅडरला मिळालं असून त्यांचं काम सुरू आहे. पिंक लॅडर ही कंपनी सरकारी योजनेतून सुरू झाली आहे. महिलांना मिळणाऱ्या मानधनाबाबत बराच भेदभाव केला जातो. कामाच्या ठिकाणी महिलांबाबत होणार भेदभाव बघून या महिलांनी कंबर कसली आणि ही बांधकामक्षेत्रातली कंपनी सुरु केली. १०० टक्के साक्षरता असणाऱ्या केरळमधल्या एका मॉलमध्येही सर्व महिला कर्मचारी आहेत. या मॉलमध्ये १०० दुकानं आहेत. या सर्व दुकानांची मालकी महिलांकडे आहे. महिला सक्षमीकरणाच्या दिशेने केरळने टाकलेलं हे एक पाऊलच म्हणावं लागेल.

# पटोलेंना राजीनामा देण्याची गरज नाही

## काँग्रेस हायकमांडकडून पाठराखण

■ मनोज बागडे
नागपूर, दि. २६ :

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राजीनामा देण्याची ही योग्य वेळ नाही. हा फक्त प्रदेशाध्यक्षपदाचा मुद्दा नसून हा निवडणुकीत झालेल्या हेराफेरीचाही मुद्दा आहे. त्यामुळे आता तुम्ही राजीनामा देऊन मीडियासमोर चुकीचा नरेटिव्ह सेट करु नका, असे काँग्रेस हायकमांडकडून सांगण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी नाना पटोले यांना प्रदेशाध्यक्ष पदावर कायम राहा, असे सांगतानाच हायकंमाडच्या निर्णयाची प्रतीक्षा करा. विधानसभेच्या पराभवाचा आढावा घेऊन योग्य तो निर्णय घेतला जाईल, असा सल्ला दिल्याची माहिती आहे.

काँग्रेस हायकमांडने पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना दिल्लीत बोलवले. त्यांच्या हायकमांडसोबतच्या चचेर्नंतर ते प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देणार अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तर काही माध्यमांमध्ये नाना पटोले यांनी राजीनामा दिला अशा बातम्या सुरू आहेत.

नाना पटोलेंनी राजीनामा दिलेला नाही. यासंदर्भातल्या बातम्या असत्य असून त्या खोडसाळपणे पसरवल्या जात आहेत. असे काँग्रेसच्या मिडिया सेलकडून सांगण्यात आले होते. त्यातच आता काँग्रेस हायकमांडने दिलेल्या आदेशानुसार पुढील निर्णय होईपर्यंत नाना पटोले हेच प्रदेशाध्यक्षपदी कायम राहणार आहेत.

दरम्यान 2024 विधानसभा निवडणुकीत काँग्रेसचे दिग्गज पराभूत झाले. काँग्रेसचे 2019 मध्ये 44 आमदार निवडून आले. पण या निवडणुकीत काँग्रेसला 16 च उमेदवार निवडून आणता आले.

दुसरीकडे नाना पटोले हे सर्वात कमी मतांनी विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये दुसऱ्या स्थानी आहेत. भंडारा जिल्ह्यातील साकोली विधानसभा मतदारसंघातून नाना पटोले यांनी भाजपचे उमेदवार अविनाश ब्राह्मणकर यांचा केवळ 208 मतांनी पराभव केला.



या निवडणुकीत पटोले यांनी आग्रह धरत काँग्रेससाठी अतिरिक्त जागा मिळविल्या होत्या. अनेक निष्ठावंतांना डावलून त्यांनी विचित्र पद्धतीने उमेदवार दिले. यामुळे, पूर्व विदर्भात अनेकजण नाराज झालेत तर काहींनी बंडखोरी देखील केली.

नाना पटोले यांनी १९९५ मध्ये पहिल्यांदा काँग्रेसच्या प्रमिला कुटे यांच्याविरूद्ध बंडखोरी करीत लाखांदूर मतदारसंघातून विधानसभेची निवडणूक लढविली होती. त्यात ते पराभूत झाले. पक्षाने त्यांना निलंबीतही केले होते. मात्र, १९९९ मध्ये काँग्रेसने त्यांना तिकीट दिले आणि ते पहिल्यांदा आमदार झाले. २००४ मध्ये याच मतदारसंघातून ते दुसऱ्यांदा आमदार झाले.

वर्ष २००८ मध्ये मतदारसंघांच्या पुनर्रचनेचे काम सुरू असताना, लाखांदूर मतदारसंघ साकोलीत विलीन होणार असल्याचे संकेत मिळाले होते. त्यावेळी, काँग्रेसचेच सेवक वाघाये हे साकोलीचे आमदार होते. वाघाये यांचे त्यावेळी राजकीय वजन अधिक असल्याने साकोलीतून आपल्याला तिकीट मिळणार नाही, हे नाना पटोलेंनी हेरले. २००८ च्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात त्यांनी विधीमंडळ परिसरात धानाची पेंडी पेटवून खळबळ उडवून दिली होती. याचवेळी त्यांनी आमदारकीचाही राजीनामा दिला.

२००९ मध्ये त्यांनी अपक्ष उमेदवार म्हणून लोकसभेची निवडणूक लढविली. मात्र, पराभूत झाले. नंतर काही महिन्यातच भाजपात प्रवेश करीत साकोली मतदारसंघातून आमदार झाले. २०१४ मध्ये त्यांनी भाजपाकडून लोकसभेची निवडणूक लढविली आणि खासदार झाले. परंतु, तीन वर्षानंतर खासदारकीचा राजीनामा देत पुन्हा काँग्रेसमध्ये परतले.

२०१९ मध्ये त्यांनी साकोलीमधून विधानसभा निवडणूक लढविली आणि चौथ्यांदा आमदार झाले. याच वर्षी राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाले आणि नाना पटोले यांना विधानसभा अध्यक्षपदाची माह त्यांच्या गळ्यात पडली. परंतु, वर्षभरातच त्यांनी हे पद सोडले. पुढे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणून संपूर्ण महाराष्ट्राची जबाबदारी त्यांच्यावर देण्यात आली. लोकसभा निवडणुकीत त्यांची कामगिरी सरस ठरली असली तरी विधानसभा निवडणुकीत प्रदेशाध्यक्ष पूर्णतः अपयशी ठरले.

## २० पैकी दोनच आमदार त्यांच्यासोबत राहतील
# उद्धव ठाकरेंची स्थिती असराणी सारखी

### बावनकुळेंचा टोला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २६ :

उद्धव ठाकरे यांची परिस्थितीत शोले चित्रपटातील असराणी यांच्या सारखी झाली असल्याचे भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे यांच्या निवडून आलेल्या वीस आमदारांपैकी केवळ दोन आमदार त्यांच्यासोबत राहतील, बाकी सगळे निघून जातील, असे देखील बावनकुळे म्हणाले.



उद्धव ठाकरे यांचे केवळ वीस आमदार निवडून आले आहेत. मात्र आगामी काळात ते २० आमदार देखील त्यांना मानायला तयार राहणार नाहीत, यातील केवळ २ आमदार त्यांच्यासोबत राहतील, बाकी निघून जातील, असेही बावनकुळे म्हणाले.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनाही बावनकुळे यांनी टोला लगावला. नाना पटोले यांनी त्यांच्या मतदारसंघात बराच वेळ घालवला, जिथे ते मुख्यमंत्री होण्याच्या मार्गावर असल्याचा दावा करत होते. प्रत्येक ठिकाणी प्रचार करताना त्यांनी वारंवार मीच मुख्यमंत्री होणार असल्याचा उल्लेख केला होता. आता त्यांच्या मतदारसंघात कमी वेळ का घालवत आहेत? असा प्रश्न उपस्थित करीत पटोले यांनी आता मूल्यांकन करायला हवे, असेही ते म्हणाले.

आगामी महानगर पालिका, जिल्हा पंचायत आणि नगर पालिका निवडणुकीसाठी पक्षाने तयारी सुरू केली असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले. त्यांनी राज्यातील जनतेची फसवणूक केल्याचा आरोप करत महाविकास आघाडीचा महापौर कुठेही निवडून येणार नसल्याचे म्हटले आहे.

आम्ही आगामी महानगर पालिका, जिल्हा पंचायत, आणि नगर पालिका निवडणुका विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या जनादेशाच्या आधारे लढवू. महाविकास आघाडीचा महापौर कोठेही निवडून येणार नाही, कारण त्यांची संख्या कमी झाली आहे. ज्या प्रकारे त्यांनी महाराष्ट्रातील जनतेची दिशाभूल केली आहे, त्यांना जनतेने नाकारले असल्याचे ते म्हणाले.

## पर्यावरणातील बदल विषयावर महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयातर्फे
# संयुक्त राष्ट्रसंघात संशोधन सादर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

प्राचीन भारतीय शास्त्रांनुसार विश्व हे काळचक्रानुसार वर-खाली होत असते. रज-तमोगुणाचे प्राबल्य वाढल्यामुळे त्याचा नकारात्मक प्रभाव पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश या पंचमहाभूतांवर पडतो. परिणामस्वरूप पृथ्वीवरील नैसर्गिक आपत्तींचे प्रमाण वाढते. त्यामुळे जागतिक पातळीवर केवळ स्थुलातील उपायांविषयी प्रयत्न केले जात आहेत; पण ते पुरेसे नाहीत. आध्यात्मिक पातळीवरही प्रयत्न होणे अत्यावश्यक आहेत. मंत्रोच्चार, अग्नीहोत्र, यज्ञ, साधना आदींद्वारे आपण आपल्या आयुष्याची आणि पर्यावरणाची आध्यात्मिक शुद्धी होऊ शकते आणि त्याद्वारे पर्यावरणाचे संतुलन राखले जाऊ शकते, असे प्रतिपादन महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाचे शॉर्न क्लार्क यांनी केले.

ते अझरबैजानची राजधानी बाकू येथे संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या सीओपी२९ या आंतरराष्ट्रीय परिषदेत बोलत होते. महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय आणि ह्यस्पिरिच्युअल सायन्स रिसर्च फाऊंडेशन यांच्या वतीने शॉर्न क्लार्क यांनी सामाजिक सजगतेमुळे पर्यावरणाची हानी अल्प करता येईल का ? या विषयावरील संशोधन सादर करतांना यज्ञाचे काही व्हिडिओ आणि छायाचित्रेही सादर केली. हे संशोधन डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे.

शॉन क्लार्क यांनी पुढे सांगितले की , आध्यात्मिक शुद्धतेचा अर्थात सात्त्विकतेचा पंचमहाभूतांवर परिणाम होतो, हे अनेक उदाहरणांवरून सिद्ध झाले आहे. नियंत्रित वातावरणात केलेल्या एका प्रयोगात मंत्रोच्चारामुळे ज्योतीची उंची वाढते, असे लक्षात आले.

सध्या पृथ्वीवर होत असलेले पर्यावरणातील पालट हे ९८ टक्के चक्रिय (सायक्लिकल) बदलांमुळे आहेत, तर केवळ २ टक्के मानवामुळे घडून येत आहेत. पॅरिस येथील परिषदेत पर्यावरणातील बदलांविषयी जी काही प्रारूपे आणि अंदाज बांधण्यात आले होते, त्यापेक्षा पुष्कळ अधिक वेगाने व तीव्रतेने पर्यावरणाचा ऱ्हास होतांना दिसत आहे. वर्ष २००६ मध्येच या विषयावर आध्यात्मिक संशोधन करणाऱ्या महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाने पर्यावरणाच्या या तीव्र ऱ्हासाचे कारण केवळ स्थूलातील नसून सूक्ष्मातील आध्यात्मिकही आहे, असे अनुमान काढले होते.

गेल्या ८ वर्षांत महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाने २० राष्ट्रीय आणि ९६ आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदांमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत. यांपैकी १४ आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषदांमध्ये विश्वविद्यालयाला उत्कृष्ट सादरीकरणाचे पुरस्कार मिळाले आहेत.

# पंकजा मुंडेंना मुख्यमंत्री करा..

### मंगेश ससाणे यांची मागणी

■ वृत्तसंस्था, बीड, दि. २६ :

देवेंद्र फडणवीस यांच्याऐवजी पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री करावे, अशी मागणी ओबीसी आरक्षण बचाव समितीचे नेते मंगेश ससाणे यांनी केली आहे.

ओबीसींना विरोध करणारा मुख्यमंत्री आम्हाला नको आहे. मनोज जरांगे पाटीलचा खुटा ओबीसीने उपटला आहे. महायुतीसाठी ओबीसी समाज निर्णायक ठरला आहे. ओबीसी समाज्याला मुख्यमंत्री पद द्यावं, असे ससाणे यांनी म्हटले आहे .

छगन भुजबळ किंवा पंकजा मुंडे यांना मुख्यमंत्री कराव अशी आम्ही मागणी करतो . महायुतीने याचा विचार करावा अन्यथा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीला फटका बसेल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती असताना मंगेश ससाणे यांनी ही नवी मागणी पुढे रेटल्याने नवा वाद निर्माण झाला आहे.

## केडीके कॉलेजच्या एमसीए विभागाकडून
# बीसीए विद्यार्थ्यांसाठी फ्रेशर्स पार्टी




■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. २६ :

विद्यार्थ्यांसाठी एक सहयोगी आणि आकर्षक व्यासपीठ निर्माण करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या ओएक्सएम या मंचाचे उद्घाटन आले. विद्यार्थ्यांसाठी विचारांची देवाणघेवाण करणे, विचारप्रवर्तक चर्चांमध्ये गुंतवणे आणि विविध विषयांमध्ये नाविन्यपूर्ण आणि उत्कृष्टतेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र म्हणून काम करणे, या उद्देशाने मंचाची स्थापना करण्यात आली आहे.

संगीत, नृत्य आणि सौहार्द यांनी भरलेला एक चौतन्यशील उत्सव म्हणून नोंद झालेल्या या कार्यक्रमाने नवोदितांना जीवंत संस्कृती आणि आत्म्याशी परिचित होण्यासाठी एक परिपूर्ण व्यासपीठ प्रदान करण्याचा प्रयत्न केला. गौरव कापसे हे मंचचे अध्यक्ष आहेत. एमसीए आणि बीसीए विभागाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. मनीष वंजारी होते. बीसीए मध्ये प्रवेशित नवोदित विद्यार्थ्यांचे एमसीएच्या विद्यार्थ्यांनी स्वागत केले.

डॉ. व्हॅल्सन वर्गीस, प्राचार्य डॉ.ए.एम. बदर, उपप्राचार्य, डॉ.अनुप भांगे यांनी विभागातील नवीन विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. याप्रसंगी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. राजेंद्र मुळक, यशराज आर. मुळक, यांनी सर्व प्राध्यापक सदस्यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले.

### सामान्यातील असामान्य
## काश्मीर ते कन्याकुमारी अंतर १२ दिवसात पार करणारे डॉ.महेंद्र महाजन




सायकलचा प्रवास हा सवार्नाच आवडतो. एक तर मुक्त सैर करता येते आणि, शरीराचा व्यायाम देखील होतो. परंतु, हीच सायकलस्वारी एखाद्या अवलियाने एखाद्या विक्रमासाठी करायची ठरवली तर? नक्कीच तो विक्रम बनणार.

नाशिककर डॉ. महेंद्र महाजन या सायकलिस्टने काही महिन्यापूर्वी काश्मीर ते कन्याकुमारी हे ४ हजार किलोमीटरचे अंतर केवळ १२ दिवसात पूर्ण करून विश्विक्रमच केला आहे. वेगवान सायकलिंगचा विक्रम करणाऱ्या या मोहिमेला 'के टू सायकलिंग चॅलेंज 'असे नाव देण्यात आले होते.

या विक्रमाची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड यूएमसीए रेकॉड्र्समध्ये घेतली गेली आहे. या मोहिमेत 'खेळों इंडिया 'आणि तंबाखू बंद' या उपक्रमांचे समर्थन करण्यात आले. केवळ अभ्यास करूनच करिअर बनवता येते हा समज काढून पालकांनी आपल्या पाल्याना खेळामध्ये करिअर करण्यासाठी प्रोत्साहित करावे असा संदेश या मोहिमेद्वारे देण्यात आला. तर केवळ आरोग्यविषयक जागरूक लोकच मजबूत राष्ट्र निर्माण करू शकतात,या उक्तीप्रमाणे तंबाखू बंद या अभियानाला समर्थन करण्यासाठी या मोहिमेचा वापर केला गेला.

२ नोव्हेंबर रोजी लाल चौक श्रीनगर येथून ही मोहीम सुरु झाली होती. पुढे, श्रीनगर, उधमपूर, पठाणकोट, दाशुआ, होशियारपूर, अंबाला, दिल्ली, बायपास, आग्रा, ग्वाल्हेर, झाशी, सागर, छिंदवाडा, नागपूर, अनंतपूर, बंगळुरू, मदुराई, तिरुनेलवेली मार्गे कन्याकुमारी समुद्रकिनारा येथे [स्वामी विवेकानंद स्मारक ] मोहिमेचा समारोप झाला. या वेगवान सायकल प्रवासात महाजन यांनी भारताच्या जम्मू,काश्मीर, पंजाब, हरियाणा दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तामिळनाडू या १२ राज्यातून प्रवास केला. याच मोहिमे दरम्यान झेलम, चेनाब, तावी, बीस, सतलज, कृष्ण, कावेरी या नद्या महाजन यांनी पार केल्या आणि हिमालय, विंध्याचल, चंबळ, सातपुडा या महत्वाच्या भारतीय पर्वत रांगांतून हा रोमहर्षक वेगवान सायकल प्रवास घडला आहे.

रोज ३५० ते ४०० किलोमीटरचा सायकल प्रवास महाजन यांनी या मोहिमेत केला आहे. या व्यायामासाठी त्यांना प्रशिक्षक मातें ठक्कर यांचे मार्गदर्शन लाभले. या मोहिमेत महाजन यांच्या सोबत कबीर रचुरे, किशोर काळे, राहुल ओढेकर, दत्त चकोर, विजय काळे हे सदस्य कृ मेम्बर्स म्हणून सहभागी झाले होते. ■ ■ ■

### माझं मत
## नवनिर्वाचित सरकारकडून आपल्या अपेक्षा काय?

**१) जितेंद्र महाडिक ( विद्युत कर्मचारी)**

नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपा प्रणित महायुतीचे सरकार स्थापन झालेले आहे.आता या नव्या सरकारने आपल्या लाडक्या बहिणींना जी योजना पुढे सुरू ठेवणार असल्याचे आश्वासन दिलेले आहे,ते पूर्ण करावे.आणि लाडक्या बहिणींना जो १५०० रुपयांचा मासिक हफ्ता दिला जातो त्यामध्ये २१०० रुपयांची वाढ करावी, असे वाटते.

**२) शैला बछाव (गृहिणी)**

नवनिर्वाचित युती सरकारच्या पुढे आता पुढील पाच वर्षात खूप आव्हान असणार आहेत.मला एक सामान्य गृहिणी म्हणून असे प्रामाणिकपणे वाटते की, महिलांना दरमहा फुकट पैसे वाटण्यापेक्षा भाज्यांचे दर, सिलिंडरच्या किमती कमी कराव्यात, तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात.

**३) विजय तिरमारे (रिक्षाचालक)**

भाजपचे नेतृत्वाखाली नव्यानेच महाराष्ट्रात आलेल्या युती सरकारने आता सामान्यांना जी आश्वासन दिलेली त्याची प्रामाणिक पूर्तता करावी. इंधनाचे दर स्थिर ठेवावेत. प्रवास दर कमी करावा. भाज्यांचे दर कमी करावेत. सामान्य गोरगरिबांना आधार आणि आदर वाटावा असे काम करून दाखवावे ही अपेक्षा.

**४) नाथराव कराड (शेतकरी)**

सध्या शेतकरी विविध कारणांमुळे खूपच त्रस्त आहे.कांदा आणि लसणाचे भाव गगनाला भिडले आहे, ज्यामुळे सामान्यांना जगणे नकोसे झाले आहे. त्यामुळे आता शेतमालाचे हमीभाव सरकारने पाच वर्ष स्थिर ठरवून द्यावेत. आपत्कालीन संकटामुळे शेतीचे जे नुकसान होते त्याचा त्वरित पंचनामा करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत वेळेवर करून द्यावी.

## वर्ल्डलाइन इंडियाच्या जल संजीवनी प्रकल्पातंर्गत महाराष्ट्रातील २६ जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन

वर्ल्डलाइन इंडियाने त्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कार्यक्रमांतर्गत जल संजीवनी उपक्रमासाठी सतत पाठिंबा जाहीर केला आहे, ज्याने ग्रामीण महाराष्ट्रातील जलसंधारण आणि जीवनमान सुधारण्यासाठी महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे.

शाश्वत विकासाच्या वचनबद्धतेचा एक भाग म्हणून, वर्ल्डलाइन इंडियाच्या उरफआर्मने 26 जलस्त्रोतांचे निर्जंतुकीकरण आणि पुनरुज्जीवन करण्यास सक्षम केले, 29.5 कोटी लिटर (295 दशलक्ष लिटर) पाणी साठवण क्षमतेत योगदान दिले. या उपक्रमाने भूजल पातळी वाढवण्यात, 2,000 हून अधिक शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यात आणि शेतीसाठी समृद्ध गाळाचा वापर करून 285 शेतकऱ्यांना थेट सकारात्मक परिणाम प्रदान करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

इंडिविश वेलफेअर फाउंडेशनच्या नेतृत्वाखालील हा प्रकल्प एप्रिल 2023 मध्ये सुरू झाला आणि मुरबाड, मराठवाडा आणि इतर भागांसह संपूर्ण महाराष्ट्रात अनेक क्षेत्रांमध्ये पसरला. या हस्तक्षेपामुळे शेती, पशुधन आणि मासेमारीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारणे अपेक्षित आहे आणि कोरड्या हंगामात शेतकऱ्यांना दुसऱ्या पिकासाठी अत्यंत आवश्यक असलेले पाणी मिळण्यास मदत होईल.

वर्ल्डलाइन इंडियाने मार्च 2024 मधील योगदानासह प्रकल्पासाठी दिलेला पाठिंबा, अर्थपूर्ण, शाश्वत उपक्रमांद्वारे सकारात्मक सामाजिक प्रभाव पाडण्यासाठी कंपनीचे सुरू असलेले समर्पण प्रतिबिंबित करते.

स्थानिक समुदाय, स्वयंसेवक आणि सरकार यांच्याशी भागीदारी करून, वर्ल्डलाइन इंडिया या प्रदेशातील समुदायांसाठी अधिक जल-सुरक्षित भविष्य निर्माण करण्यात मदत करत आहे.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

# लाडक्या बहिणांना लवकरच रिटर्न गिफ्ट

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला बंपर विजय मिळाला आहे. या विजयात लाडक्या बहिणींचा मोठा वाटा आहे. त्यामुळे या लाडक्या बहिणींना रिटर्न गिफ्ट देण्याची सरकारची तयारी सुरु झाली आहे.

राज्यभरातील 13 लाख महिलांना हे रिटर्न गिफ्ट मिळणार आहे. या महिलांचे अर्ज बँक खाते आधारशी लिंक नसल्यामुळे प्रलंबित होते. परंतु आता त्यांचे अर्ज मंजूर करण्यात येणार आहे. राज्यातील 2.34 कोटी महिला या योजनेचा लाभ घेत आहे. त्यांना दर महिन्याला 1,500 रुपये सरकारतर्फे दिले जात आहे. ही रक्कम वाढवून 2,100 रुपये करण्याचे आश्वासन महायुतीने निवडणूक जाहीरनाम्यात दिले होते.



वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले की, राज्यातील 2.34 कोटी महिलांना लाडक्या बहीण योजनेचा लाभ मिळत आहे. या योजनेसाठी आलेल्या 13 लाख बहिणींचे अर्ज प्रलंबित होते. ते अर्जही आता निकाली काढण्यात येणार आहे. डिसेंबर महिन्यांपासून त्यांना रक्कम मिळण्यास सुरुवात होणार आहे.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी राज्य सरकारने यापूर्वी 35,000 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या तरतुदीत लाडक्या बहिणांना महिन्याला 1,500 रुपये दिले जात आहे. परंतु महिन्याला 2,100 रुपये देण्यासाठी ही तरतूद वाढवावी लागणार आहे. त्यासाठी नवीन सरकारला हिवाळी अधिवेशनापूर्वीच मोठ्या हालचाली कराव्या लागणार आहे.

# सत्ता स्थापनेचा हक्क भाजपकडेच

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २६ :

भाजपकडे स्वतःचे बहुमत आहे. त्यामुळे असे वाटते की भारतीय जनता पक्षाचा जो सरकार स्थापनेचा हक्क आहे तो तसाच राहील, असे मला वाटते, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे. तर राज्यात कोण मुख्यमंत्री होणार यात मला रस नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

उद्धव ठाकरे आणि शिवसेनेला त्रास देत पक्ष फोडण्यासाठी त्यावेळी अडीच वर्षांचा फॉम्युला पाळला नाही. आता ते सर्वकाही करायला तयार आहे. यातून त्यांचा शिवसेनेवरचा आणि महाराष्ट्रावर किती द्वेष आहे हे लक्षात येते.

एकनाथ शिंदे हे घटनाबाह्य असले तरी मुख्यमंत्री आहेत. ते आता पुन्हा न्वयाने निवडून आले आहेत. आता जर ते मुख्यमंत्री झाले तर ते घटनेनुसार मुख्यमंत्री होतील. पण आतापर्यंत ते घटनाबाह्य मुख्यमंत्रीच होते, असा टोला राऊत यांनी लगावला आहे.



महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ बुधवार, दि. २७ नोव्हेंबर २०२४ ■

# सुगंधीत तंबाखुची वाहतुक करणारे अटकेत

■ **महासागर प्रतिनिधी, कन्हान, दि. २६ :**
मोपेडद्वारे सुगंधीत तंबाखुची वाहतुक करणाऱ्यांना कन्हान पोलीसांच्या डीबी पथकाने पकडुन दोन आरोपींना अटक करुन ४७ सुगंधित टिनाचे डब्बे आणि वाहनासह ८७,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे .

कन्हान पोलीस डीबी पथक परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना कामठी कडुन दोन इसम मॅस्ट्रो मोपेडने प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु घेऊन कन्हान कडे येत असल्याची माहिती मिळाली. पोलीसांनी जुने पोलीस स्टेशन कन्हानच्या बाजुला नाकाबंदी करुन मॅस्ट्रो मोपेड वाहनाला थांबवून पाहणी केली असता दोन पिशव्यात सुगंधीत तंबाखुचे ४७ टिनाचे डब्बे मिळुन आले .

कन्हान पोलीसांनी आरोपी जकाउर लतीफ शेख (वय ३९), विवेक गुप्तपाल मेश्राम (वय ३६) यांना अटक करुन त्याचा जवळून ४७ सुगंधित टिनाचे डब्बे आणि मोपेड वाहन असा एकुण ८७,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष गायकवाड, पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनात सहायक पोलीस निरीक्षक राहुल चव्हाण, हरिष सोनभद्रे, महेश बिसेन, अमोल नागरे, अश्विन गजभिये, आकाश सिरसाट यांच्यासह पोलीस कर्मचारी यांनी ही कारवाई यशस्वीरित्या पार पाडली. आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सरस्वती शाळेच्या बसचा भीषण अपघात

## विद्यार्थिनी ठार, अनेक विद्यार्थी गंभीर जखमी

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :**
हिंगणा परिसरातील सरस्वती माध्यमिक विद्यालयाची शाळेची बस पर्यटनाला जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने अपघात झाला.

बस रस्त्याच्या बाजूला असलेल्या खड्ड्यात खाली कोसळली. या विचित्र अपघातात एक विद्यार्थी ठार झाला तर ८ ते १० विद्यार्थी गंभीर जखमी झाले. हा अपघात मंगळवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास झाला. जखमी विद्यार्थ्यांना एम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.

या अपघाताची माहिती मिळताच हिंगण्याचे ठाणेदार जितेंद्र बोबडे हे ताफ्यासह घटनास्थळावर पोहचले. त्यांनी जखमी विद्यार्थ्यांना रुग्णालयात पोहचविण्याची व्यवस्था केली. अपघात होताच रस्त्यांनी जाणाऱ्यानी गर्दी केली. त्यामुळे वाहतूक विस्कळित झाली होती.



सरस्वती माध्यमिक विद्यालयाच्या पाच बसेस विद्यार्थ्यांना घेऊन वर्धा जिल्ह्यातील बोरधरण जात होते. देवळी परिसरात बसचा अपघात झाल्याची माहिती मिळताच विद्यार्थ्यांच्या पालकांनी एम्स रुग्णालयात धाव घेतली.

अनेक पालक सकाळी रुग्णालयात पोहचले. आपापल्या मुलाची विचारणा शिक्षकांना करीत होते. त्यामुळे रुग्णालयातही गोंधळ उडाला होता.

हिंगणी रस्त्यावरून कवडसकडे जाताना पेंढरी देवळी गावाजवळ अपघातप्रवण वळण आहे. या वळणावर गेल्या तीन वर्षात २८० पेक्षा जास्त अपघात झाले आहेत. गेल्या महिन्यात ८ अपघात झाले. हा वळण रस्ता सरळ करण्यासाठी गावकऱ्यांनी वारंवार निवेदने देऊन प्रयत्न केले आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभाग आणि वन विभाग यांच्यात वाद सुरू आहे. त्यामुळे या रस्त्याच्या दुरुस्तीचे काम रखडलेले आहे. हा रस्ता दुरुस्त करावा, अन्यथा रस्ता बंद करू असा आक्रमक पवित्रा पेंढरी- देवळी गावकऱ्यांनी घेतला आहे.

या अपघातात निर्वाणी शिवानंद बागडे (१५, रा. सिमटाकळी,एमआयडीसी)ही विद्यार्थिनी ठार झाली असून जखमी झालेल्या ४४ विद्यार्थ्यांना एम्स रुग्णालयात, ७ विद्यार्थ्यांना निम्स रुग्णालयात तर एका विद्यार्थ्यार्ला प्लाटिना रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघातात दोन शिक्षक, एक कर्मचारी आणि बसचालकसुद्धा जखमी झाले आहेत. रुग्णालयात पालक, नागरिक, नातेवाईक, शाळेतील शिक्षकांसाठी मदत केंद्र तयार करण्यात आले आहे.



मृतक निर्वाणी बागडे

**बस चालकावर गंभीर गुन्हे दाखल**

सरस्वती शाळेच्या ५२ विद्यार्थ्यांना घेऊन बोरधरण येथे सहलीला घेऊन जाणाऱ्या बसचा देवळी-पेंढारी गावाजवळील वळणावर भीषण अपघात झाला. हा अपघात बसचालकाच्या चुकीमुळे झाला आहे. त्यामुळे हिंगणा पोलीस ठाण्यात बस चालकाविरुद्ध गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# जखमी विद्यार्थ्यांना तातडीने एम्समध्ये शस्त्रक्रियेसाठी हलवले

सरस्वती माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी सहलीला जात असतांना बस चालकाचे नियंत्रण सुटून बस हिंगणा परिसरात उलटली. या अपघातात एका विद्यार्थीनीचा मृत्यू झाला तर अनेक विद्यार्थी जखमी झाले. सर्व जखमींवर नागपुरातील एम्स रुग्णालयात उपचार सुरू करण्यात आले आहेत. जखमी झालेल्या एका विद्यार्थ्याला शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आले आहे.

एम्स प्रशासनाच्या माहितीनुसार, हिंगणा परिसरात घडलेल्या अपघातानंतर सुमारे ४८ विद्यार्थ्यांना तातडीने एम्समध्ये हलवण्यात आले. तेथील आपत्कालीन विभागात दोन वार्ड या विद्यार्थ्यांसाठी तडका- फडकी उघडून सर्व तपासणीची सोय करण्यात आली.

येथे तातडीने शस्त्रक्रिया, औषधशास्त्र, क्ष-किरणशास्त्रसह सगळ्याच विभागातील डॉक्टरांना पाचारन करून झटपट तपासणी सुरू केली गेली. त्यात एका विद्यार्थीनींचा आधीच मृत्यू झाल्याचे पुढे आले.

वैद्यकीय तपासणीत आणखी एका विद्यार्थ्याच्या पोटाला गंभीर इजा झाल्याचे पुढे आले. त्याला तातडीने शस्त्रक्रियेसाठी शल्यक्रियागृहात हलवण्यात आले तर इतर रुग्णांचीही तातडीने त्रास बघत तपासणीचे काम सुरू होते. दरम्यान येथील सर्व विद्यार्थ्यांना मानसिक धक्का बसल्याने येथे मानसोपचार तज्ज्ञांचीही चमू तैनात करण्यात आली आहे.

दरम्यान विद्यार्थ्यांच्या पालकांसह नातेवाईकांना माहिती मिळाल्यावर त्यांनीही एम्समध्ये गर्दी केली आहे. त्यांना एम्स प्रशासन, शालेय प्रशासनासह पोलिसांकडून समजावण्याचे प्रयत्न सुरू आहे. हे सर्व विद्यार्थी सातवी ते दहावी वर्गातील आहेत.

### बसमधील विद्यार्थ्यांची नावे

बसमध्ये मृतक निर्वाणी शिवानंद बागडे व अतिदक्षता विभागात उपचार घेतलेल्यांसह विद्यार्थी अदिती पटेल, अनुष्का शर्मा, एकता बैंगणे, गीत गोलेलवार, गुंजन बोरकर, गुंजन मेश्राम, हर्षिका हिरणवार, हिमांशी सराटे, कोमल खराबे, लावण्या गेडाम, मुग्धा कांबळे, निधी गाठीबांधे, प्रतिज्ञा राऊत,पूर्वा कडवं, सलोनी पांडे, श्रावणी पाटील, त्रिशा मंथनवार,वंशिका वघाडे,यशश्री पिंगे, अध्ययन गुरनुले, अध्ययन रंगारी, आदित्य भड, अद्वैत नरड, अनय माणुसमारे ,अंश वडपल्लीवार,अथर्व ससाणे, भार्गव लांजेवार, चिन्मय सोंधिया,धैर्य माने, दिव्येश साकुरे, गौरव साहू, गुरुप्रीतसिंग चव्हाण, हर्ष सांभारे, जयेश मेश्राम, मंथन नेवारे, मिहुल वानखेडे, मो. अर्शन खान, मोहित चुडासामा, ओम नानोटी,ओम पथरीया, पवन यादव, प्रसन्न गुंफावार, प्रथम पाटील, प्रितेश मिश्रा, प्रियांशु निघोट, रिशलाभ सिंह, रिशित शेलवटकर, रेयान रणधीर, सम्यक लाडे, सार्थक खराळे, यदणेश वालटकर, शौर्य श्रीवास, सुजल ढोके व युवराज माहुले या विद्यार्थ्यांचा समावेश होता.

घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर एम्स रुग्णालयात पोहोचले. त्यांनी उपचारासंदर्भात माहिती जाणून घेतली. सोबतच विद्यार्थ्यांसोबत संवादही साधला. मृत मुलीच्या पालकांना योजनेतून भरपाई मिळवून द्यावे, सोबतच जखमी विद्यार्थ्यांवर योग्य उपचार करावेत. निधीची चिंता नको, गरजेनुसार अन्य हेडचा निधी खर्च करण्याची सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना केली.

# हिवाळी अधिवेशनात नवा गडी नवा राज



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :**
विधानसभा निवडणुकीत महायुतीला दणदणीत यश मिळाल्याने सध्या चर्चा नवा मुख्यमंत्री कोण असणार? याबाबतत होत आहे. येत्या काही दिवसात नवा मुख्यमंत्री ठरल्यानंतर लगेचच म्हणजे डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात नागपुरात हिवाळी अधिवेशन होणार असून त्याला नवे मुख्यमंत्री सामोरे जाणार आहेत.

सध्याच्या सरकारचे नेतृत्व एकनाथ शिंदे यांच्याकडे होते व नागपूरकर देवेंद्र फडणवीस व अजित पवार हे दोन उपमुख्यमंत्री होते. आता नागपूर अधिवेशनाला मुख्यमंत्री म्हणून पुन्हा शिंदेच नागपुरात येतात की, देवेंद्र फडणवीस यांच्या गळ्यात ही माळ पडते याकडे नागपूरकर नागरिकांसह अधिवेशनाची तयारी करणाऱ्या प्रशासनाचेही लक्ष लागले आहे.

यापूर्वी २०१४ ते २०१९ या पाच वर्षात मुख्यमंत्री म्हणून फडणवीस यांनी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनाला तोंड दिले होते. त्यानंतर महाविकास आघाडी सरकारचा अपवाद सोडला तर ते उपमुख्यमंत्री म्हणून नागपूर अधिवेशनात उपस्थित राहात होते. हे येथे उल्लेखनीय. नवे मंत्रिमंडळ स्थापन झाल्यावर त्यात विदर्भ आणि नागपूरचे किती मंत्री असतात हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

**अधिवेशनाची तयारी सुरू**

सामान्यपणे डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून नागपूर हिवाळी अधिवेशनाला सुरुवात होते. दोन आठवडे चालते. त्याच्या तयारीला सुरुवात झाली आहे. अधिवेशनासंबंधीची सर्व कामे ९ डिसेंबरपर्यंत पूर्ण करा, असे आदेश विधिमंडळ सचिवालयाने नागपूरच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले आहे. सध्या विधिमंडळातील आसन व्यवस्थेच्या देखभाल दुरुस्तीचे काम सुरू असून विधानभवनाच्या बाहेर फर्निचर ठेवण्यात आले आहे.

मंत्र्यांचे बंगले, कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था आणि अन्य देखभाल दुरुस्तीचे कामे निवडणूक काळापासूच सुरू आहे. आचारसंहिता लागण्यापूर्वीच कार्यादेश देण्यात आले होते. मात्र, निवडणुकांमुळे काही कामांना विलंब होण्याची शक्यता लक्षात घेऊन पुढच्या काळात याला गती देण्यात येणार आहे.

**प्रशासकीय यंत्रणेची धावपळ**

एक महिन्यापासून संपूर्ण महसूल व अन्य प्रशासकीय यंत्रणा निवडणुकीच्या कामात व्यस्त होती. दोनच दिवसांपूर्वी मतमोजणी झाल्यानंतर त्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. मात्र पुढच्या महिन्यात हिवाळी अधिवेशन असल्याने त्याच्या तयारीला ही यंत्रणा लागणार आहे. अधिवेशनासाठी लागणाऱ्या वाहनांची जुळवाजुळव करण्यासाठी विविध जिल्ह्यांना यापूर्वीच पत्र पाठवण्यात आले आहे. साधारणपणे बाहेरून वाहने मागवताना त्यावर स्थानिक चालकांची नियुक्ती करावी, अशा सूचनाही सर्वसंबंधितांना देण्यात आल्या आहेत.



■ **नागपूर :** सरस्वती शाळेची बस उलटून झालेल्या अपघाताची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. विपीन ईटनकर तातडीने एम्स रूग्णालयात पोहचले. त्यांनी जखमी विद्यार्थ्यांची भेट घेत पालकांशी चर्चा केली. उपचारात कोणतीच हयगय केली जावू नये, आवश्यक त्या सोयी सुविधा पुरवा असे सांगत त्यांनी निर्देश दिले गरज पडत असेल तर इतर शिर्षाचा निधी वापरा, मृत मुलीच्या पालकांना भरपाई मिळवून देण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



## ट्रॅव्हल्सच्या सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :**
सरस्वती शाळेकडून विद्यार्थ्यांच्या सहलीसाठी खासगी ट्रॅव्हल्सची नोंदणी केली गेली होती. त्यानुसार विद्यार्थी व शिक्षक बसने निघाले. परंतु अपघात झाल्याने या खासगी बसेसच्या दर्जासह शाळेकडून खासगी बसेसची निवड कशी केली जाते? हा प्रश्न उपस्थित झाला आहे. खाजगी ट्रॅव्हल्सकडून नियमांचे पालन केले जात नाही, चालक अनेकदा दारूच्या नशेत असतात, बसच्या वेगावर नियंत्रण ठेवत नाहीत, असेही अनेक अपघातातून समोर आले आहे.

दुसरीकडे, राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडूनही (एसटी) बसेस शैक्षणिक सहलीसाठी उपलब्ध केल्या जातात. या बसेसमध्ये गर्ती मर्यादा, प्रशिक्षणीत चालक- वाहकासह इतरही नियमांचे पालन केले जाते. त्यानंतरही शाळांकडून या बसेसला प्राधान्य का दिले जात नाही? हा प्रश्न अनुत्तरित आहे.



■ **नागपूर :** शाळेची बस उलटून झालेल्या अपघातात जखमी विद्यार्थ्यांवर एम्समध्ये तातडीने उपचार सुरू करण्यात आले. अपघातात जखमी शिक्षकांनाही रूग्णालयात नेण्यात आले.

# भाजप महिला आघाडीचे टेकडी गणपतीला साकडे

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :**
राज्यात महायुतीला बहुमत मिळाले असून मुख्यमंत्री कोण होणार याबाबत जनतेमध्ये उत्सुकता आहे. नागपूरच्या भाजप कार्यकर्त्यांना देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत अशी इच्छा आहे. त्यासाठी पक्षाच्या महिला आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी सकाळी आमचे देवा भाऊ मुख्यमंत्री व्हावे, यासाठी टेकडी गणपतीला साकडे घातले.

विधानसभा निवडणुका मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात लढवल्यानंतर राज्यात महायुतीला भरघोस असे यश मिळाले. महायुतीत भारतीय जनता पक्ष मोठा भाऊ ठरला आहे. भाजपने एकहाती १३२ जागांवर विजय मिळवला आहे. त्यामुळे महायुतीसह भाजपच्या पदाधिकाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

एकनाथ शिंदे हेच मुख्यमंत्री व्हावे अशी मागणी करत त्यांच्या समर्थकांकडून सोमवारी ठाण्यात मंदिरात आरती करण्यात आली. मंगळवारी नागपुरात भारतीय जनता पक्षाकडून फडणवीस मुख्यमंत्री व्हावेत म्हणून मंदिरात पूजा अर्चा आणि आरती करुन साकड घातले. जनतेच्या हृदयस्थानी ते महाराष्ट्राच्या राजसिंहासनावर पुनर्प्रतिष्ठित, मुख्यमंत्री व्हावे अशी कामना करत महिला आघाडीच्या शहर अध्यक्ष प्रगती पाटील यांच्या नेतृत्वात महिला पदाधिकाऱ्यांनी टेकडी गणपती मंदिर येथे महाआरती केली.



आमच्या लाडक्या भावालाच (देवेंद्र फडणवीस) मुख्यमंत्री करा, अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी प्रगती पाटील म्हणाल्या, देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे आधुनिक अभिमन्यू आहेत . महाराष्ट्रभर महायुतीचा त्यांनी प्रचार केला. त्यामुळे महाराष्ट्राच्या जनतेनी ठरवल आहे की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच व्हावे यासाठी आम्ही टेकडी गणपतीला साकडे घातले आहे. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होईल असा विश्वास महिलांनी व्यक्त केला.

यावेळी चेतना टांक, प्रीती राजदेरकर, निकिता पराये, माजी नगरसेविका, मीनाक्षी तेलगोटे वर्षा ठाकरे, डॉ. माधुरी इंदुरकर,शालिनी बुल्ले, मंजुषा भुरे, प्रतिभा वैरागडे,रुपल दोडके, संध्या चतुर्वेदी, डॉ कामला मोहता, वर्ष चौधरी, नीरजा पाटील, वर्षा भड, लता अवधाने, योगिता झरारिया आदी महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होत्या.

दक्षिण- पश्चिम आणि पूर्व नागपुरात महिला आघाडीच्यावतीने देवा भाऊ मुख्यमंत्री व्हावे यासाठी आरती करण्यात आली. दरम्यान भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने शहरातील विविध भागात आमचे देवाभाऊ महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री असे मोठमोठे फलक ठिकठिकाणी लावले आहे. महालातील कल्याणेश्वर मंदिरात युवा मोर्चाच्यावतीने महादेवाला साकडे घालण्यात आले आहे.

# हातोडी येथे भगवान बिरसा मुंडा जयंती साजरी



■ महासागर प्रतिनिधी
**रामटेक , २६ :**
धरती आबा भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती अन्नपूर्णा टोली,हातोडी येथे संपन्न झाली.सुरवातीला रैली काढून भगवान बीरसा मुंडा यांच्या फोटो ला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.भगवान बिरसा मुंडा यांचा जीवनावर प्रकाश प्रमुख पाहुण्यांनी टाकला.
याप्रसंगी माजी पं.स. सभापती किरण धुर्वे,राहुल किरपान,सरपंच राजेश कुंभरे,नंदकिशोर कोहळे,खुशाल घरजाळे,सदाराम गाथे,अरुण कवास,अजय मरसकोल्हे,रत्ना मडावी, दुर्गाप्रसाद उईकें,विशाल सराटे,गुलाब सराटे,पालिकराम गाथे,सह हातोडी येथील आदिवासी बांधव व गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# भरधाव कार रेलिंगमध्ये शिरली ; तरुणाचा मृत्यू

## दोघे जखमी

## कामठी-नागपूरमहामार्गावरील अपघात



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर , २६ :**
अनियंत्रित कार रेलिंगमध्ये शिरल्याने एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दोघे गंभीर जखमी झाले. ही घटना कामठी-नागपूर महामार्गावर मंगळवारी पहाटे ५ वाजताच्या सुमारास घडली. ही धडक इतकी जबरदस्त होती की, लोखंडी रेलिंग कारच्या समोरील भागातून शिरून मागच्या भागातून निघाली. या अपघातात रोशन निलांबर नाइक (२६, रा.गुड शेड रोड, तिरंगा चौक, रामगड, नवीन कामठी) यांचा मृत्यू झाला तर सय्यद आमीर शहजाद सय्यद साबीर (२६, फुटाना ओळी, काल भैरव मंदिर, कामठी) व अभिषेक शिवनारायण परमान (२८, रा.नवीन येरखेडा दुर्गा सोसायटी, कामठी) हे दोघे गंभीर जखमी झाले. रोशन हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर विमानतळ, नागपूर येथे इंडिगो एयरलाइन्समध्ये एग्जिक्युटिव्ह सिक्युरिटी ऑफिसर म्हणून कार्यरत होता. रोशन आणि त्याचे दोन्ही मित्र नेहमी दुचाकीने ड्युटीवर जात होते. मात्र, मंगळवारी पहाटे ते एमएच-४०/सीक्यू-३८०४ क्रमांकाच्या कारने ड्युटीला जात होते. महामार्ग-४४च्या गरुड चौकातून नागपूरकडे जात असताना मिशनरी कब्रिस्तानाजवळ त्यांची कार रेलिंगमध्ये शिरली. अपघात इतका भयावह होता की, कारच्या समोरील भागाला जोरदार धक्का बसला आणि लोखंडी रेलिंग समोरून मागच्या दिशेने जात मागून निघाली. घटनेची माहिती नवीन कामठी पोलिसांना मिळताच, त्यांनी घटनास्थळ गाठून जखमींना कामठीच्या शासकीय उपजिल्हा रुग्णालयात हलवले. जिथे डॉक्टरांनी रोशन नायकला मृत घोषित केले. जखमींना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनास्थळी रेलिंगमध्ये अडकलेली कार पाहून मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी जमली होती. या अपघाताचे व्हिडिओ सुद्धा व्हायरल झाले आहेत, ज्यामुळे अपघाताची भयानकता दिसून आली. पोलिसांनी मशीनची मदत घेत कार रेलिंगमधून बाहेर काढली आहे. या अपघाताचे कारण अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही.

# विधानसभा मतदारसंघात विकासकामांना गती मिळाली आहे

## बावनकुळेंवर बेसा, बहादूरा न.प. परिसरातून मतांचा पाऊस



■ महासागर प्रतिनिधी
**हिंगणा , २६ :**
शनिवारी सकाळी ७ वाजल्यापासूनच लोक टीव्हीसमोर उभे राहून निवडणूक जिंकण्याची आणि हरण्याची प्रक्रिया पाहत होते. बेसा नगर पंचायत क्षेत्रातील सर्व रस्ते सुनसान झाले होते. मानेवाडा-बेसा रोड, बेसा, पिपळा वेळ, बहादुरा, हुडकेश्वर खुर्द, विहीरगाव यासह अनेक ठिकाणी पक्षाचे कार्यकर्ते जल्लोष करताना दिसले. सायंकाळी ६ च्या सुमारास झालेल्या मतमोजणीत भाजप महायुतीचे चंद्रशेखर बावनकुळे यांना १,७३,५७६ तर काँग्रेस महाआघाडीचे सुरेश भोयर यांना १,३२,८३८ मते मिळाली. तोपर्यंत बावनकुळे ४० हजार मतांनी आघाडीवर होते. बेसा येथील चंद्रशेखर बावनकुळे यांचे कार्यकर्ते मुकेश काळे म्हणाले की, बेसा नगर पंचायत संकुल व बहादूरा न.प.संकुलातील जनतेच्या पाठिंब्यामुळे निवडणुकीत बावनकुळे यांच्यावर मतांचा चांगला पाऊस पडला. माहितीनुसार भाजपला बेसामधून ५,३०० आणि बहादुरा येथून ५,७०० मते मिळाली. बावकुळे ४०,८३४ मतांनी विजयी झाले. बावनकुळे यांना विजयी करण्यासाठी वेळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सचिन इंगळे, पिपळा ५चे माजी सरपंच नरेश भोयर, हुडकेश्वर खुर्दचे कमलाकर शेंडे, विहीरगावच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ४९ प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई





■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर , २६ :** नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५१ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. मंगळवार (२६) रोजी शोध पथकाने ४९ प्रकरणांची नोंद करून ३८,८००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १७ प्रकरणांची नोंद करून ६,८००/- रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत ३ प्रकरणांची नोंद करून ६,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १० प्रकरणांची नोंद करून १९,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वर्कशाप, गॅरेजेस व इतर दुरुस्तीचे व्यवसायीकांने रस्ता, फुटपाथ मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत १ प्रकरणांची नोंद करून १,०००/ रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १५ प्रकरणांची नोंद करून ३,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ३ प्रकरणांची नोंद करून ३,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने गांधीबाग झोन अंतर्गत मे. राज स्वीट मार्ट यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे. गुप्ता नमकीन यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. लकडगंज झोन अंतर्गत मे. हाय ट्रेक ट्युशन क्लासेस यांनी मनपा विरूध्द विनापरवानगीशिवाय विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी रु. ५,०००/-चे दंड वसुल करण्यात आला. मंगळवारी झोन अंतर्गत मे. ब्लीस वन अपार्टमेंट यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. उपद्रव शोध पथकाने ४ प्रकरणांची नोंद करून रू. २५,०००/-दंड वसूल केला.

# शालेय विद्यार्थांचा पालकांना जॉकेट वितरण

## रामकृष्ण मठ चे सेवाभावी उपक्रम




**कन्हान :** कन्हान शहरातील सुरेश नगर येथील आयडियल एज्यूकेशन संस्था द्वारे संचालित आदर्श हायस्कूल शाळेच्या प्रांगणात संस्थेचे सचिव भरत सावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मुख्याध्यापक गिरिजाशंकर यादव यांच्या अध्यक्षतेखाली रामकृष्ण मठ द्वारे शालेय विद्यार्थांचा पालकांना जॉकेट वितरण आले .कार्यक्रमाची सुरुवात शारदा माता आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन करुन करण्यात आली . रामकृष्ण मठ चे सदस्य विजय महाराज यांनी विद्यार्थांना ,पालकांना , शिक्षकांना मार्गदर्शन केले . रामकृष्ण मठ चे विजय महाराज आणि त्यांचे सहकारी यांच्या हस्ते शाळेतील विद्यार्थ्यां च्या सत्तर पालकांना थंडीपासून बचाव करणाऱ्या जॉकेट चे वितरण करण्यात आले . कार्यक्रमात हिंदी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका लता पेटकर प्रामुख्याने उपस्थित होते . कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार प्रदर्शन शिक्षक मनोज डोंगरे यांनी केले.

# इमामवाडा पोलिसांची जुगारावर धाड

## ६ आरोपी अटकेत

**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** इमामवाडा पोलिसांनी गोपनिय माहितीच्या आधारावर जाटतरोडी परिसरात सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकून ६ जणांना रंगेहात अटक केली. अभिषेक रवींद्र बोरकर (२०), सोहिल जयस्वाल तांडेकर (२२) दोन्ही रा. इंदिरानगर, राजेश दत्तू फेंडर (४०) रा. शिवांगीनगर, हुडकेश्वर, रोहित कन्हैयालाल डेकाटे (२३) रा. श्रीकृष्णनगर, मानेवाडा, निखिल प्रकाश वासनिक (३१) आणि संतोष रामप्रदेश वर्मा (३५) दोन्ही रा. जाटतरोडी अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. सोमवारी सायंकाळी जाटतरोडीच्या म्हाडा क्वॉर्टर परिसरात जुगार सुरू असल्याची माहिती इमामवाडा पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी सापळा रचून तेथे धाड टाकली असता वरील आरोपी जुगार खेळताना मिळाले. पोलिसांना पाहताच आरोपींमध्ये खळबळ उडाली. त्यांनी पळून जाण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी त्यांना पकडले. त्यांच्याकडून जुगारावर लावलेले पैसे आणि मोबाईल फोनसह एकूण ७९,८४० रुपयांचा माल जप्त करण्यात आला.

# समाजाला सशक्त करण्याचा ध्यास घेऊन कार्य करणारी कर्मयोगगिनी अहिल्याबाई होळकर



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर , २६ :**
ज्या काळात समाज शास्त्रांचा मथितार्थ योग्य रीतीने समजून न घेता चुकीचे पायंडे लावून विघटन करत होता त्याचवेळी धर्मपंडितांना आणि समाजातील राजकीय वरिष्ठांना न दुखवता शास्त्रांमधील विचारांची योग्य मांडणी करून विचारधारेत आमुलाग्र बदल अहिल्याबाई होळकर यांनी केला. स्त्री ला अबला न म्हणता तिला तिच्या स्वकर्तृत्वावर जगता यावं यासाठी आणि परिसरात जीवनसुधाराच्या आवश्यक गोष्टींची रुजूवात करुन समाजाला सशक्त करण्याचा ध्यास घेऊन अहिल्याबाई होळकर यांनी कार्य केले म्हणून त्या कर्मयोगगिनी ठरल्या. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाच्या निमित्ताने त्यांच्या कर्तृत्वाची, निष्ठेने आणि अत्यंत कुशलतेने केलेल्या राज्यकारभाराची तसेच धर्माधिष्ठित न्यायव्यवस्थेने कार्य करण्याची गाथा सर्वांना पुन्हा एकदा कळावी या उद्देशाने मानिनी बहुउद्देशीय संस्था निर्मित आणि नटराज आर्ट्स ऍण्ड कल्चर सेन्टर नागपूर द्वारा प्रस्तूत कर्मयोगिनी अहिल्याबाई होळकर या एकपात्री प्रयोगाचे आयोजन नुकतेच धरमपेठ येथील नटराज आर्ट्स एँड कल्चर सेन्टर येथे करण्यात आले. डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनी याचे लेखन करुन अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनातील विविध पैलूंचे प्रकटीकरण केले ज्याचे सादरीकरण नागपुरातील जाणत्या अभिनेत्री डॉ. दीपलक्ष्मी दिलीप भट यांनी अत्यंत चपखलपणे करून उपस्थित समुदायाची प्रशंसा मिळविली.
या एकपात्री दीर्घांकाचे योग्य दिग्दर्शन आणि नेपथ्य स्वप्निल बोहटे यांनी केले, संगीत अनिल इंदाणे यांचे तर प्रकाशयोजना वैदेही चवरे याची होती कार्यक्रमाला धरमपेठ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. उल्हास औरंगाबादकर विशेषत्वाने उपस्थित होते. यावेळी डॉ. मंजुश्री सरदेशपांडे यांनी कर्मयोगिनी या संज्ञेची उकल त्यानिमित्ताने केली.
अत्यंत प्रभावीपणे सादर झालेल्या या सादरीकरणाला नटराज आर्ट्स ऍण्ड कल्चर सेन्टर नागपूर चे प्राचार्य डॉ. रविन्द्र हरदास आणि धरमपेठ शिक्षण संस्थेचे सर्व पदाधिकाऱ्यासह रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.

# कन्हान येथे रिपब्लिकन सांस्कृतिक संघा द्वारे सविधान दिन साजरा



**कन्हान : २६ नोव्हेंबर** संविधान दिना निमित्त रिपब्लिकन सांस्कृतिक संघाच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक कन्हान येथे संविधान दिवस व संविधान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
मंगळवार दि. नोव्हेंबर ला सकाळी १० वाजता रिपब्लिकन सांस्कृतिक संघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भिमटे यांच्या हस्ते विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. व संघाचे पदाधिकारी व नागरिका सह उपस्थितीत भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करण्यात आले.
यावेळी रिपब्लिकन सांस्कृतिक संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भिमटे यांनी उपस्थितीना संविधान दिनविशेषाचे महत्व सांगितले की आज २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधान दिन याच दिवशी भारतीय राज्यघटना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संसदीय विधीमंडळात स्विकारल्या गेली म्हणूनच आज संविधान दिन साजरा करतात. आजच्या या दिनी ज्यांनी संविधान लिहिले त्या महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर व संविधाना बद्दल नागरिकांमध्ये जनजागृती करण्यासाठी आजचा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो. असे मार्गदर्शन केले. यावेळी मनोज गोंडाने,चेतन मेश्राम, राजेश फुलझेले, शरद मेश्राम, सुशील डोंगरे, आकाश कोटांगडे, महेश चव्हाण, दिवाळी मेश्राम, अभिजीत चांदुरकर सह उपस्थित होते, आभार प्रदर्शन रोहित मानवटकर यांनी केल.

# संविधान दिन, बसपा ने बाबासाहेबांना अभिवादन केले



■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर , २६ :**
संविधान दिनानिमित्त बहुजन समाज पार्टीने कही एम भूल न जाये या राष्ट्रीय अभियानांतर्गत आज बसपा नेते उत्तम शेवडे, प्रा सुनील कोचे, रंजना ढोरे, चंद्रशेखर कांबळे, अभिलेश वाहने, रामकुमार गोणेकर, किशोर गेडाम, राहुल सोनटक्के, अमित सिंग यांच्या नेतृत्वात संविधान चौकातील बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला माल्यार्पण व अभिवादन करून भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे जाहीररीत्या वाचन केले. आजपासून ७५ वर्षांपूर्वी २६ नोव्हेंबर रोजी भारतीय संविधानाचा देशाने स्वीकार केला. त्या निमित्ताने आज संविधान चौकात मोठ्या प्रमाणात संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी बसपा नेत्यांनी शासनाची हरघर, घरघर संविधान ही घोषणा फक्त घोषणा न राहता प्रत्यक्ष अमलात आणावी असे आवाहन केले.

## मूळ संविधानाची प्रदर्शनी

मान्यवर कांशीरामजी रिसर्च सेंटर चे संचालक उत्तम शेवडे यांनी आज संविधान चौकात संविधान प्रदर्शनीचे अनोखे आयोजन केले होते. या संविधान प्रदर्शनीत केंद्र सरकारने प्रकाशित केलेल्या भारताच्या इंग्रजी व हिंदीतील संविधानाच्या मूळ प्रती, तसेच कॉन्स्टिट्यूट असेंबली डिबेट्स हिंदी, इंग्रजी, मराठीच्या प्रती, तसेच आतापर्यंत शासनाने, अन्य व्यक्ती व संस्थांनी सुद्धा प्रकाशित केलेल्या विविध प्रकारच्या, विविध भाषेतील भारतीय संविधानाच्या २५ पेक्षा जास्त प्रती. या संविधान प्रदर्शनीत ठेवल्या होत्या. या प्रसंगी उत्तम शेवडे यांनी संविधान बनविण्या पूर्वीच्या प्रक्रियेपासून तर संविधान बनेपर्यंतच्या सर्व प्रक्रियेची उपस्थितांना व प्रदर्शनीला भेट देणाऱ्यांना दिवसभर माहिती दिली. या प्रदर्शनीचे लोकार्पण बामसेफचे सीनियर कार्यकर्ते भानुदासजी ढोरे यांच्या हस्ते करण्यात आले.
याप्रसंगी प्रामुख्याने बसपाचे युवा नेते सदानंद जामगडे, महेश सहारे, संदीप मेश्राम, दिलीप कांबळे, विलास सोमकुवर, शशिकांत मेश्राम, सुरेंद्र डोंगरे, मनोज सांगोळे, मुकेश मेश्राम, प्रकाश गजभिये, संभाजी लोखंडे, वीरेंद्र कापसे, सचिन मानवटकर, कविताताई लांडगे, मायाताई उके, वर्षा सहारे, बुद्धम राऊत, अविनाश गेडाम, विजय मेंढे, सिद्धार्थ रामटेके, प्रवीण पाटील, प्रकाश फुले, अमित गजभिये, राजेंद्र सुखदेवे, प्रफुल पाटील, अंकित थुल, प्रतीक हजारे, अमित धोपटे, महिपल सांगोडे, स्वप्निल धावडे, मनोज गजभिये, विलास मुन, ओमप्रकाश शेवाळे, प्रेम पाटील, असीत दुर्गे, प्रताप तांबे, आदि प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी संविधानाची तांत्रिक व व्यवहारिक माहिती सुद्धा देण्यात आली.
या संविधान प्रदर्शनीला विविध क्षेत्रातील इमो नारनवरे, प्रकाश बनसोड, आशिष फुलझेले, अशोक जांभुळकर यांच्या सोबतच प्रामुख्याने सरकारी कर्मचारी, अधिकारी यांनी भेटी देऊन मूळ संविधानातील रहस्य जाणून घेतली.

# भिसीच्या नावावर ३.७४ लाखांचा गंडा

## व्यावसायिकाला शिविगाळ अन मारण्याची धमकी




**नागपूर, क्राईम रिपोर्टर.** भिसीत पैसे गुंतवून नफा कमावण्याचे आमिष दाखवून एका हॉटेल व्यावसायिकाने दुसऱ्या व्यावसायिकाला ३.७४ लाख रुपयांचा चुना लावला. हॉटेल व्यावसायिकाने अशाच प्रकारे अनेकांना जाळ्यात अडकवून चुना लावला असल्याची माहिती मिळाली आहे. या प्रकरणी सदर पोलिसांनी देवेंद्र इंद्रकुमार कोठारी (४६) रा. नेलसन चौकच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. मनप्रितसिंग अलग रा. कश्मिरी गल्ली, पाचपावली असे आरोपी व्यावसायिकाचे नाव आहे.
देवेंद्र हेल्थकेअर उत्पादनांचा व्यवसाय करतात. आरोपी मनप्रित हॉटेल व्यवसायी असून भिसीही चालवतो. मनप्रितचा मोठा भाऊ हरप्रित आणि देवेंद्र हे मित्र होते. ५ जुलै २०२२ रोजी मनप्रितने देवेंद्र यांची भेट घेतली. भिसीत पैसे गुंतविल्यास दरवर्षी २० टक्के नफा होण्याची माहिती दिली. त्याच्यावर विश्वास ठेवून देवेंद्र यांनी जुलै २०२२ ते जून २०२३ पर्यंत मनप्रितच्या खात्यात ऑनलाईन २.१८ लाख रुपये जमा केले. तर १.५६ लाख रोख स्वरुपात दिले. भिसीचा कालावधी संपल्यानंतर देवेंद्रने पैसे परत मागितले असता मनप्रित वेगवेगळे बहाणे करू लागला. या दरम्यान मनप्रित आणि हरप्रितविरुद्ध अनेकांनी लाखो रुपये बुडविल्याची तक्रार केली असून या प्रकरणात दोघेही जामीनावर बाहेर आल्याची माहिती देवेंद्र यांना मिळाली. त्यांनी मनप्रितची भेट घेऊन तत्काळ पैसे परत करण्याची मागणी केली. मात्र पैसे देण्याऐवजी मनप्रितने त्यांना शिविगाळ केली आणि मारण्याची धमकी दिली.

# भाजपा अनुसूचित जाती मोर्चा द्वारे संविधान दिवस साजरा



■ **महासागर कन्हान , २६ :** भाजपा अनुसूचित जाती मोर्चा कन्हान द्वारे संविधान दिवस साजरा करण्यात आला . कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हा महामंत्री रिंकेश चवरे यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प हार अर्पण करुन कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली . कार्यक्रमात कन्हान -पिपरी नगर परिषद माजी उपाध्यक्ष डॉ मनोहर पाठक , भाजपा कन्हान शहर अध्यक्ष विनोद किरपान , भाजपा अनुसूचित जाती मोर्चा कन्हान शहर अध्यक्ष अमन घोडेस्वार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करुन संविधान दिनाच्या शुभेच्छा दिल्या . त्यानंतर भारतीय संविधानाचे वाचन करण्यात आले . कार्यक्रमात प्रामुख्याने उपस्थित भाजपा पदाधिकार्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पित करुन विनम्र अभिवादन करीत संविधान दिवस थाटात साजरा करण्यात आला.

# राज्यघटनेची सर्व मूल्य समाजातील प्रत्येक घटकांपर्यंत पोहचविणार

## देवेंद्र फडणवीस यांचा विशेष संदेश : घर घर संविधान उपक्रमाचा नागपूर येथे प्रारंभ

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** भारतीय संविधानाने प्रत्येक व्यक्तीला बहाल केलेले बहुमोल स्वातंत्र, समान न्यायाचे तत्व, नागरिक म्हणून दिलेले अधिकार व यासमवेत दिलेली कर्तव्याची जबाबदारी याबाबत समाजातील प्रत्येक घटकात जनजागृती होणे आवश्यक आहे.

भारतीय संविधान आपण अंगिकारुन आज 75 वर्ष झाली असून या औचित्याने शासनाने घर घर संविधान हा घेतलेला उपक्रम तेवढाच महत्वाचा असल्याचे प्रतिपादन आदिवासी व सामाजिक न्याय विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी केले. यावेळी त्यांनी माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या शुभेच्छा संदेशाचे वाचन केले.

संविधान दिनाच्या अमृत महोत्सवानिमित्त घर घर संविधान उपक्रमाचा आज नागपूर येथे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. या आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाबासाहेब देशमुख, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उप संचालक विजय वाकुलकर, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त डॉ. मंगेश वानखेडे, सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे, जिल्हा समाज कल्याण अधिकारी किशोर भोयर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ज्येष्ठ नागरिक, तृतीयपंथी, दिव्यांग यांचा प्रातिनिधीक सन्मान करण्यात आला.






**घर घर संविधान पोहचविण्याचा निर्धार**

भारतीय संविधानातील स्वातंत्र्याचे, सामाजिक जबाबदारीचे, कर्तव्य तत्परतेचे, नागरिक म्हणून देशाप्रती असलेल्या आपल्या कर्तव्याचे मोल विभागातील सर्व जिल्ह्यात पोहचविण्यासाठी आपण विविध उपक्रम हाती घेणार आहोत.

यात शालेय विद्यार्थ्यांपासून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांपर्यंत, ग्रामपंचायतीपासून जिल्हा परिषदेपर्यंत व याच बरोबर प्रशासकीय यंत्रणेतील प्रत्येकापर्यंत भारतीय राज्य घटनेचे मूल्य पोहोचविले जाणार असल्याचे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी सांगितले.

### देवेंद्र फडणवीस यांचा विशेष संदेश



भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त आपण पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या मार्गदर्शनात हर घर तिरंगा अभियानाच्या माध्यमातून स्वातंत्र्याचे मोल प्रत्येक गावांमध्ये पोहचविण्यात यशस्वी झालो.

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षापाठोपाठ आपण आणखी एका महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनेचे अमृतमहोत्सवी वर्ष साजरे करण्यास सिध्द झालो आहोत. भारतातील प्रत्येक नागरिकाला अभिव्यक्ती स्वातंत्र्यासह मुलभूत स्वातंत्र्य बहाल करणारी राज्यघटना आपल्याला महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडून मिळाली.

26 नोव्हेंबर रोजी ती स्वीकारण्याच्या घटनेला 75 वर्ष होत आहेत. राज्यघटना आपण अंगिकारली आहे, याचाच अर्थ यातील सर्व मूल्य, आपल्या अधिकारासह राष्ट्राप्रती संविधानाने दिलेली कर्तव्याची भावना आपण स्वीकारली आहे. याच बरोबर सामाजिक न्याय, राष्ट्रीय एकात्मता, धर्मनिरपेक्ष मूल्याचा प्रचार व प्रसार ही सारी जबाबदारी, भावना यात अंतर्भूत आहे.

या सर्व भावभावना, शेवटच्या व्यक्तीला न्याय देण्याचा संविधानातील संकल्प, समता, विवेक ही सारी मूल्य आपण संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षांमध्ये सर्व घटकांपर्यंत अधिकाधिक रुजविण्यासाठी कटिबध्द होऊ या, अशा भावना माजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या संदेशात व्यक्त केल्या.

# नागपूर रेल्वे स्थानक झाले स्मार्ट

## मार्गदर्शक क्यूआर आधारित वेफाइंडरचे उद्घाटन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** नागपूर स्थानकातून प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा अनुभव सुधारण्यासाठी मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. मार्गदर्शक क्यूआर आधारित 3डी /2डी वेफाइंडर वेब पोर्टलचे आज उद्घाटन करण्यात आले.

या अभिनव उपक्रमाचे उद्घाटन मध्य रेल्वेचे महाप्रशासक धरमवीर मीना आणि नागपूर विभागाचे विभागीय रेल्वे प्रशासक मनीष अग्रवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आले. क्रांती घडवेल यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवासी श्रीमती मयुरी अग्रवाल आणि सुरेश बाबू यांनी डिजिटल सोल्युशनचे औपचारिक उद्घाटन केले.

मार्गदर्शक क्यूआर कोड हे एक अत्याधुनिक उपकरण आहे, जे प्रवाशांना त्या ठिकाणाहून सहज मार्गदर्शन करण्यासाठी डिझाइन केलेले आहे. कव्हर केलेल्या किओस्कवर क्यूआर कोड स्कॅन करून स्थलांतरित स्थानानुसार सहजपणे




आपल्या प्रवासाची योजना करणे, रिअल-टाइम मार्गदर्शन आणि सूचना मिळवणे, स्थानकातील आपले स्थान सहज शोधणे, रात्री लवकर सुरक्षा बिंदू आणि आपत्कालीन मार्ग शोधणे अशा सेवांचा लाभ घेऊ शकतातः

हे सर्वसमावेशकतेला ध्यानात घेऊन डिझाइन केले आहे, जे अपंग आणि ज्येष्ठ नागरिकांसह सर्व प्रवाशांना प्रवेशयोग्य अनुभव प्रदान करते. व्हीलचेअर, स्ट्रेचर किंवा वैद्यकीय मदत यासारख्या सेवा मिळवता येवू शकतात महाव्यवस्थापक धरमवीर मीणा यांनी तंत्रज्ञानाला महत्त्व देताना सांगितले की, ह्रमार्गदर्शकह्र हा मध्य रेल्वेच्या प्रवाशांना उत्कृष्ट आणि सोयीस्कर सेवा देण्याच्या बँडच्या बांधिलकीचा पुरावा आहे. या उपक्रमाचा नागपूर विभागातील इतर ठिकाणी विस्तार करण्याची योजना असून त्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ आणि सोयीस्कर होईल.

# रेल्वेत दहा वर्षात ५ लाख जणांना नोकऱ्या

### रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचा दावा



■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :** भारतीय रेल्वेच्या इतिहासात पहिल्यांदा सरकारने कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी वार्षिक भरती कॅलेंडर सुरू केले आहे. त्यामुळे पदभरती प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे, असे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले.

अखिल भारतीय एससी-एसटी रेल्वे कर्मचारी संघातर्फे नागपुरातील अजनी रेल्वे मैदानावर राष्ट्रीय संमेलन आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी संघाचे अध्यक्ष बी.एल. भैरव, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धरमवीर मीना आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापक नीनू उपस्थित होते.

वैष्णव यांच्या हस्ते कर्मचारी संघाच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

रेल्वेमध्ये पारदर्शक पद्धतीने कर्मचारी भरती करण्यात येत असून गेल्या १० वर्षांत पाच लाख नोकऱ्या देण्यात आल्या आहे, असा दावा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केला.

मागील दशकात पाच लाख कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. तर २००४ ते २०१४ या कालावधीत ४ लाख ४ हजार कर्मचारी भरती झाली होती. तसेच रेल्वे प्रवाशांना अधिक सुविधा देण्यासाठी अत्याधुनिक रेल्वेडबे तयार करण्यात येत आहेत. यात १२ हजार सर्वसाधारण रेल्वेडब्यांचा समावेश आहे, असेही ते म्हणाले.

## तलवारीच्या धाकावर गुंडाचा हैदोस

■ **महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. २६ :** वाठोडा पोलिसांनी गस्तीदरम्यान एका गुंडाला तलवारीचा धाक दाखवून हैदोस घालताना अटक केली.

अजय गंगाधर ढवळे (46) रा. जुनी वस्ती, दिघोरी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. वाठोडा ठाण्याचे डीबी पथक सोमवारी रात्री 8 वाजताच्या सुमारास ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान उमरेड मार्गावर दिघोरी चौकात एक व्यक्ती तलवारीचा धाक दाखवून परिसरात हैदोस घालत असून रस्त्याने ये-जा करणाऱ्या लोकांना धमकावत असल्याची माहिती मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी घटनास्थळ गाठले. घेराबंदी करून अजयला पकडले. तलवार जप्त करून त्याला अटक केली. त्याच्याविरुद्ध आर्म्स ॲक्ट आणि मनाही आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# उभ्या क्रेनला ऑटोची धडक

# २ महिला ठार, ६ जखमी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** महामार्ग-44 वर मंगळवार हा अपघात वार ठरला. पहाटे 5 वाजण्याच्या सुमारास महामार्गाच्या कडेला असलेल्या रेलिंगला एक कार धडकली.

या अपघातात कामठी येथील एका अविवाहित तरुणाचा मृत्यू झाला असून अन्य दोन साथीदार गंभीर जखमी झाले आहेत. त्यानंतर आज दुपारी चारच्या सुमारास हायवे रोडवरील खैरी परिसरात पुलाचे काम सुरू असताना नागपूरहून कामठीच्या दिशेने येणाऱ्या प्रवासी ऑटोची उभ्या असलेल्या क्रेनची धडक बसली. यात ऑटोतील दोन महिलांचा मृत्यू झाला असून ऑटोचालकासह अन्य पाच महिला जखमी झाल्या आहेत.

या अपघातातील मृतांमध्ये निर्मला लक्ष्मण जुमडे (वय 50, रा. तांडापेठ, वैशाली नगर, नागपूर) आणि कौशल कुहीकर (वय 60, रा. प्रेमनगर साईबाबा मंदिर, नागपूर यांचा समावेश आहे. जखमींमध्ये बेबी मोतीराम आसोले (60), दुर्गा नरेंद्र वैरागडे (50), इंदुमती बिकाजी भैसारे (65), विमल गोपाळ गाते (60), रेखा कृष्णराव पराते (50) सर्व रा. पाचपावली, नागपूर आणि ऑटोचालक सतीश गोमकळे (वय 36) रा. झेंडा चौक, येरखडा यांचा समावेश आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एमएच 49/सीएफ-1250 क्रमांकाच्या ऑटोचा चालक सतीश गोमकाळे हा नागपूरच्या लग्नसमारंभात काम करणाऱ्या 7 महिलांना घेऊन पाचपावली चौकातून कामठीच्या दिशेने येत होता.

येथे महामार्गावर क्रेनच्या सहाय्याने पुलाचे काम सुरू होते. दरम्यान, ऑटो बाहेर काढत असताना उभ्या असलेल्या क्रेनवर आदळला. त्यात ऑटोमध्ये प्रवास करणाऱ्या सातही महिला आणि चालक जखमी झाले.

जुनी कामठी पोलिस ठाण्याला घटनेची माहिती मिळताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. जखमींना कामठी रोडवरील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी पाठवण्यात आले. तेथे डॉक्टरांनी दोन महिलांना मृत घोषित केले. ऑटोचालकासह अन्य पाच महिलांवर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी दोन्ही मृत महिलांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी कामठीच्या शासकीय उपजिल्हा रुग्णालयात पाठवले.

नागपूर शहरात आणि शहराच्या बाहेरच्या भागात ट्रक, खाजगी ट्रॅव्हल्स बसेस अशी वाहने रस्त्यावर किंवा कडेला राजरोसपणे उभी केली जातात. यामुळे अपघाताचे प्रमाण वाढले आहे. पोलिसांचे मात्र याकडे कायम दुर्लक्ष होत आहे.

## संविधान दिनानिमित्त रिपब्लिकन मोर्चातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** संविधानाच्या ७५ व्या दिनानिमित्त नागपूर येथील संविधान चौकात डॉ . बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे, राष्ट्रीय संघटक देवेंद्र बागडे, प्रदेश उपाध्यक्ष नामदेवराव निकोसे, जेष्ठ नेते मामासाहेब मेश्राम, शहराध्यक्ष प्रा. रमेश दुपारे, शहर उपाध्यक्ष के. टी. कांबळे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष राजु पांजरे, पदाधिकारी शालिक बांगर, अतुल गंगापूरकर, मनोहर इंगोले, रामभाऊ वाहणे, चरणदास गायकवाड, राजु कांबळे, भाऊराव बोरकर, प्रकाश कांबळे, वैशाली तभाने, संगिता चंद्रीकापुरे, सुनिता चांदेकर, डॉ सुधा जनबंधू, संगीता वासनिक रूबीना शेंख सलिम खान, सुधाकर बोरकर, भागनबाई मेश्राम, पुनम शर्मा, वंदना डोये, महानंदा ईलमकर, ज्ञानेश्वर ढेंगरे रोहन बागडे, उपस्थित होते.



# कोर्टाने मुन्नीबाईला सुनावली
## २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** सातव्या वर्गात शिकणाऱ्या दोन अल्पवयीन मुलींना एका महिलेने देहव्यापारात ढकलले. आंबटशौकीन ग्राहकांना बोलावून घरातच देहव्यापाराचा अड्डा सुरु केला.

गुन्हे शाखेने या अड्ड्यावर छापा घालून महिलेला अटक केली तर दोन्ही मुलींना पोलिसांनी देहव्यापाराच्या दलदलीतून बाहेर काढले. या प्रकरणात आरोपी दलाल महिलेला न्यायालयाने २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा आणि ७ हजार रुपये दंड ठोठावला. मुन्नीबाई असे शिक्षा सुनावलेल्या महिलेचे नाव आहे.

**घरातच सुरू केला देहव्यापाराचा अड्डा**

मुन्नीबाईची विवाहित मुलगी प्रियकरासोबत पळून गेली. त्यामुळे तिची मुलगी मुन्नीबाईच्या घरी राहत होती. तसेच तिच्या वर्गमैत्रिणीची आईसुद्धा प्रियकरासोबत पळून गेली. त्यामुळे ती दारुड्या वडिलासोबत राहत होती. तिचे वडिल बेरोजगार असल्यामुळे शाळेचे शुल्कसुद्धा भरत नव्हते. त्यात मुन्नीबाईने तिला दररोज ५०० रुपये पैसे देऊन जाळ्यात अडकवले होते. म्हणून दोन्ही मुली देहव्यापाराच्या दलदलीत अडकल्याची माहिती पोलिसांनी दिली.

मुन्नीबाई ही ताजनगरमध्ये राहत असून देहव्यापारात सक्रिय होती. तिने १४ वर्षीय नात आणि तिची वर्गमैत्रिण यांना देहव्यापाराच्या दलदलीत ओढले होते. सातव्या वर्गात शिकणाऱ्या दोघीही मुन्नीबाईच्या घरी अभ्यास करायच्या. मुन्नीबाईने सुरुवातीला दोघींनाही नवीन कपडे घेऊन दिले. पहिल्यांदा एकीला ५०० रुपये देऊन एका आंबटशौकीन युवकाशी शारीरिक संबंध ठेवण्यासाठी बळजबरी केली.

त्यानंतर मुन्नीबाई या दोघींसाठी ग्राहक शोधायची आणि त्यांच्याकडून देहव्यापार करवून घ्यायची.

मुन्नीबाई ही नेहमी ५०० रुपये देत असल्यामुळे दुसरी मुलगीही झटपट पैसे कमविण्याच्या नादात मुन्नीबाईच्या जाळ्यात अडकली.

त्यामुळे मुन्नीबाई दररोज ग्राहक बोलावायला लागली. या प्रकाराची माहिती गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभागाच्या तत्कालिन पोलीस निरीक्षक रेखा संकपाळ यांना मिळाली. त्यांनी सापळा रचून बनावट ग्राहक पाठवला आणि छापा टाकण्याची तयारी केली.

बनावट ग्राहकाने मुन्नीबाईची भेट घेऊन ७ हजार रुपयांत सौदा केला. त्यानंतर पोलिसांनी छापा घातला. या छाप्यात दोन्ही मुलींची सुटका करण्यात आली तर मुन्नीबाईला अटक करण्यात आली. या प्रकरणात अजनीचे पोलीस निरीक्षक सार्थक नेहते यांनी न्यायालयात आरोपपत्र दाखल केले.

ॲड. आसावरी परसोडकर यांनी या प्रकरणात सक्षमपणे बाजू मांडली. न्यायधीश आर.पी. पांडे यांनी आरोपी मुन्नीबाईवर दोष सिद्ध झाल्याने २० वर्षे सश्रम कारावास आणि ७ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली.

# महावितरणमध्ये संविधान प्रस्ताविकेचे वाचन

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २६ :** भारतीय संविधानाला स्विकृती मिळाल्याचा दिवस म्हणून महावितरण नागपूर परिमंडलाच्या विद्युत भवन कार्यालयात संविधानाच्या प्रस्ताविकेचे जाहीर वाचन आणि मुंबई येथे २६ नोव्हेंबर रोजी झालेल्या भ्याड आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या मुंबई पोलीस, अधिकारी, जवानांना व निष्पाप नागरिकांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली.



नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या प्रमुख उपस्थितीत संविधानाच्या प्रस्ताविकेचे जाहीर वाचन करण्यात आले. यावेळी अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य, संजय वाकडे, मधुकर घुमे, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) अतुल राऊत, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, उप विधी अधिकारी सुनिल उपाध्ये, महानिर्मितीचे उप मुख्य अभियंता अंकुर जोशी, अधीक्षक अभियंता किशोर सूर्यवंशी आणि सहाय्यक महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) महेश शहा यांचेसह अभियंते, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते,